मंगळवार
२४
मार्च २०२६
अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३७६
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com


बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



पांड्या कर्णधारपद सोडणार?
(पान ७ वर)

## थोडक्यात

### तापमान वाढीचे संकट! यंदा 'एल निनो' सक्रिय होण्याची शक्यता




**मुंबई :** जागतिक पातळीवर हवामानात झपाट्याने बदल होत असून याचा परिणाम म्हणून नागरिकांना आपल्या दैनंदिन जीवनात हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जावे लागत आहे. सध्या पृथ्वीच्या हवामानाचे संतुलन बिघडले आहे. आतापर्यंत इतिहासात अशा प्रकारच्या असंतुलित हवामानाची नोंद झाली नाही यामुळे ही धोक्याची घंटा असल्याचा इशारा नुकताच संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान संस्थेने दिला आहे.वर्ल्ड मेटेरोलॉजिकल ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएमओ) च्या मते, पृथ्वी ज्या प्रमाणात उष्णतेचे उत्सर्जन करू शकते त्याहून कितीतरी पट अधिक उष्णता साठवून ठेवत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे हरितगृह वायूंचे विशेषतः कार्बन डायऑक्साइडसारख्या उष्णता वाढवणाऱ्या वायूंचे उत्सर्जन. अशाप्रकारच्या 'ऊर्जा' असंतुलनामुळे गेल्या वर्षी महासागरांचे तापमान इतके विक्रमी पातळीवर पोहोचून त्याचा परिणाम म्हणून पृथ्वीवरील हिमनद्या आणि बर्फ वितळण्याची प्रक्रिया सुरूच राहिली. महासागरातील पाण्याचे तापमान वाढल्यामुळे यंदाही 'एल निनो' सक्रिय होण्याची शक्यता असून यामुळे तापमान वाढीचे विक्रम नोंदले जाऊ शकतात, अशी भीती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

### मी शाहरुख खानकडे लाच मागितली नाही -समीर वानखेडे

**मुंबई :** आर्यन खान याची सुटका करण्यासाठी अभिनेता शाहरूख खान याच्याशी आपण कधीही संपर्क साधलेला नव्हता. तसेच लाचेची मागणी केली नाही आणि घेतलीही नाही, असा दावा केंद्रीय महसूल अधिकारी समीर वानखेडे यांच्यातर्फे सोमवारी उच्च न्यायालयात करण्यात आला.साल २०२१ मधील कॉर्डिलिया क्रुझ प्रकरणी शाहरुख खानकडे लाच मागितल्याचा वानखेडे यांच्यावर आरोप आहे. याप्रकरणी सीबीआयने दाखल केलेला गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी वानखेडे यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका केली होती. न्यायालयानेही याचिकेची दखल घेऊन सीबीआयांच्या संथ तपासावर नाराजी व्यक्त केली होती. तसेच, तपास पूर्ण करण्यासाठी तुम्हाला अजून तुम्हाला किती दिवस लागतील ? असा प्रश्न केला होता.मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे वानखेडे यांच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी, वानखेडे यांच्यातर्फे उपरोक्त दावा करण्यात आला. तथापि, सीबीआयचे वकील सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी मंगळवारी ठेवली.

# युद्धामुळे भारतासमोरही अभूतपूर्व आव्हाने-पंतप्रधान नरेंद्र मोदी

## सरकारकडून होणाऱ्या उपाययोजनांची दीली माहिती

**नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतासमोरही अभूतपूर्व आव्हाने उभी राहिली आहेत, अशी स्पष्ट कबुली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत दिली. पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

पश्चिम आशियातील संकटावर लोकसभेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक आहे. आपल्यासाठी हा प्रदेश आणखी एका कारणामुळेही महत्त्वाचा आहे. या प्रदेशात सुमारे १ कोटी भारतीय राहत आहेत. त्यामुळे भारतीय संसदेनं एकजुटीनं आपला आवाज



दाखविणं आवश्यक आहे. युद्ध सुरू झाल्यापासून प्रत्येक भारतीय आवश्यक ती मदत करत आहे.''
''पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतासमोरही अभूतपूर्व आव्हाने उभी राहिली आहेत. काही भारतीयांचा मृत्यू झाला असून, काही जण जखमी झाले आहेत. बाधित कुटुंबांना आवश्यक ती मदत (पान २ वर)

### मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून प्रयत्न सुरु

पश्चिम आशियातील संघर्षाबाबत बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, ''मुत्सद्देगिरीच्या क्षेत्रात भारताची भूमिका स्पष्ट आहे. सुरुवातीपासूनच, आम्ही या संघर्षाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. मी स्वतः पश्चिम आशियातील संबंधित सर्व नेत्यांशी चर्चा केली आहे. तणाव निवळून हा संघर्ष संपुष्टात आणावा, अशी मी सर्वांना विनंती केली आहे. नागरिकांवर, तसेच ऊर्जा आणि वाहतूक पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांचा भारतानं निषेध केला आहे. व्यापारी जहाजांवर होणारे हल्ले आणि स्ट्रेट ऑफ होर्मुझसारख्या आंतरराष्ट्रीय जलमार्गांची नाकेबंदी करणे हे पूर्णपणे आहे. अमान्य आहे. या युद्धसदृश वातावरणातही, भारतीय जहाजांचा सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्यासाठी भारत मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सातत्यानं प्रयत्न करत आहे. भारतानं नेहमीच मानवतेचे कल्याण आणि शांतता यांचा पुरस्कार केला आहे. संवाद आणि मुत्सद्देगिरी हेच या समस्येवरचे एकमेव उपाय आहेत. या युद्धात कोणाचाही जीव धोक्यात घालणं हे मानवतेच्या हिताचं नाही. म्हणूनच, सर्व संबंधित पक्षांनी लवकरात लवकर एखाद्या शांततापूर्ण तोडग्यावर पोहोचावे, यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचे प्रयत्न भारत करत आहे''.

# युद्धविरामाचे संकेत: ५ दिवसांसाठी वीज प्रकल्पांवरील हल्ल्यांना स्थगिती

**वॉशिंग्टन : दि.२३ वृत्तसंस्था**

मध्यपूर्वेतील वाढता तणाव पूर्णपणे निवळण्याच्या उद्देशाने अमेरिका आणि इराण यांच्यात अत्यंत सकारात्मक चर्चा सुरू झाली असल्याचे संकेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. तसेच चर्चा पुढे सुरू ठेवता यावी यासाठी इराणचे वीज प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर नियोजित असलेले कोणतेही हल्ले पाच दिवसांसाठी स्थगित करण्याचे आदेश दिल्याचे अमेरिकन नेत्याने सांगितले. युद्ध चौथ्या आठवड्यात प्रवेश करत असताना, तणाव कमी होण्याचे हे पहिले सार्वजनिक संकेत मानले जात आहेत.

दरम्यान, इराणकडून अद्याप कोणत्याही अटी स्वीकारल्याचे संकेत मिळालेले नाहीत किंवा औपचारिक चर्चा सुरू असल्याच्या वृत्ताला दुजोराही देण्यात आलेला नाही.ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये

### ट्रम्प यांची मोठी घोषणा



इराणच्या अधिकाऱ्यांनी इशारा दिला होता की, आमच्या भूभागावर पुन्हा हल्ला झाला, तर ते आखाती समुद्रात समुद्री सुरुंग पसरवतील आणि इराणमधील सर्व वीज केंद्रांवर हल्ले करतील. इराणने संभाव्य लक्ष्यांचे नकाशे देखील प्रसिद्ध केले होते. यामध्ये इस्रायलमधील दोन सर्वात मोठे वीज प्रकल्प तसेच सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार आणि कुवेत मधील केंद्रांचा समावेश होता.

म्हटलं आहे की, ''मला कळवताना आनंद होत आहे की, गेल्या दोन दिवसांत युनायटेड स्टेट्स आणि इराणमध्ये मध्यपूर्वेतील शत्रुत्व पूर्णपणे संपवण्याबाबत अत्यंत सकारात्मक आणि विधायक चर्चा सुरु झाली आहे. या सखोल आणि सकारात्मक चर्चेचा कल लक्षात घेता, मी संरक्षण विभागाला इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवरील सर्व लष्करी हल्ले पाच दिवसांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, हे चालू असलेल्या बैठका आणि चर्चेच्या यशावर अवलंबून असेल.''ट्रम्प यांनी यात एक महत्त्वाची अट घातली आहे. हल्ले थांबविण्याबाबत स्थगिती तात्पुरती असून ती पूर्णपणे वाटाघाटींच्या पुढील प्रगतीवर अवलंबून आहे. दुसरीकडे, इराणकडून अद्याप कोणत्याही अटी स्वीकारल्याचे संकेत मिळालेले नाहीत किंवा औपचारिक चर्चा सुरू असल्याच्या वृत्ताला दुजोराही देण्यात आलेला नाही.

# ज्येष्ठ नेते दत्ता मेघे अनंतात विलीन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहिली श्रद्धांजली

**वर्धा : दि.२३**

माजी खासदार तथा माजी राज्यमंत्री दत्ताजी मेघे यांच्या पार्थिवावर त्यांच्या जन्मगावी पवनार येथे आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंत्यविधीला उपस्थित होते. दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहून मुख्यमंत्री व अन्य मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, खा.अमर काळे, आ.अभिजित वंजारी, आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाने, आ.चरण ठाकूर, माजी मंत्री रणजित देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, माजी राज्यमंत्री राजेंद्र मुळक, जिल्हाधिकारी वान्मथी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार



अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्यासह माजी खासदार, आमदार व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दत्ताजी मेघे यांचे काल नागपूर येथे निधन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन पार्थिवाचे दर्शन घेतले होते. आज मुख्यमंत्र्यांनी अंत्यविधीला उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पोलिस दलाच्यावतीने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अन्य मान्यवरांनी दत्ताजी मेघे यांच्या पत्नी शालिनीताई दत्ताजी मेघे, पुत्र सागर मेघे व आ.समीर मेघे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

वर्धा जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते, नागरीक दत्ताजी मेघे यांच्याशी जुळले होते. त्यांनी माझ्यासारखे अनेक आमदार, खासदार घडविले. राजकारणापेक्षा समाजकारणावर त्यांचा अधिक भर होता. प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी हे दाखवून दिले. त्यांच्या जाण्याने (पान २ वर)

# दिल्ली स्फोट प्रकरणी काश्मीर खोऱ्यात एनआयएची कारवाई

## कारवाईत एकूण १२ ठिकाणी छापेमारी

**नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था**

**दिल्लीतील लाल किल्ला स्फोट प्रकरणाच्या तपासात राष्ट्रीय अन्वेषण यंत्रणेने (एनआयए) आज, सोमवारी पहाटे काश्मीर खोऱ्यात मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण १२ ठिकाणी छापेमारी केली.या कारवाईत हंदवाडा, कुपवाडा, कुलगाम, रफियाबाद आणि सोपोर या भागांचा समावेश होता.**

हंदवाडा जिल्ह्यातील गुलोरा परिसरात एका मोठ्या व्यावसायिकाच्या घरावर एनआयएच्या पथकाने छापा टाकला.अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी सखोल झडती घेत कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर संशयास्पद साहित्याची तपासणी केली. सूत्रांच्या माहितीनुसार, पथकाने पहाटेच कारवाई सुरू केली. यापूर्वीही दिल्लीतील स्फोट प्रकरणाच्या अनुषंगाने एनआयएने काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणावर छापेमारी केली होती.काजीगुंड, शोपियां आणि पुलवामा या भागांमध्ये संशयितांच्या ठिकाणांची तपासणी करण्यात आली होती. या कारवाईत डॉ. अदील, जासिर बिलाल, मौलवी इरफान, डॉ. मुझम्मिल आणि आमिर रशीद यांच्याशी संबंधित ठिकाणांचा समावेश होता.दरम्यान, दिल्लीतील लाल किला मेट्रो स्थानकाजवळ १० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यात एका जिहादी दहशतवाद्याने कारमधून स्वतःला उडवून दिले होते. या घटनेनंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या असून तपास यंत्रणा या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी नाही

### अर्थमंत्री निर्मला सीतारामन

**नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था**

देशातील शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफी देण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या केंद्र सरकारच्या विचाराधीन नसल्याची महत्त्वाची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी लोकसभेत दिली.गेल्या काही दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीच्या मागणीवरून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देतानाच, कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकार कर्जमाफीऐवजी इतर आर्थिक उपाययोजनांवर भर देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.शेतकऱ्यांना 'किसान क्रेडिट कार्ड'च्या माध्यमातून वेळेवर आणि पुरेसा कर्जपुरवठा उपलब्ध करून दिला जात असून, सुधारित व्याज सवलत योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज सवलतीच्या दरात दिले जात आहे. याशिवाय शेतीशी संबंधित इतर कामांसाठी विनातारण मिळणाऱ्या अल्पमुदतीच्या कर्जाची मर्यादा १.६० लाखांवरून



२ लाखांपर्यंत वाढवण्यात आली आहे.याच सत्रात सशस्त्र दलांच्या जवानांसाठी एक दिलासादायक घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी 'अपंगत्व निवृत्तीवेतना'वरील कर सवलत कायम राहणार असल्याचे सांगितले.१९२२ पासून सुरू असलेली ही सवलत नव्या आयकर कायदा २०२५ च्या अंमलबजावणीनंतरही तशीच सुरू राहील, यासाठी 'वित्त विधेयक २०२६' मध्ये विशेष तरतूद करण्यात आली आहे.

# शिंदे गटाचे सर्व मंत्री राजीनामा देणार?

## सातारा जिल्हा परिषद निवडणुकीवरून महायुतीतून बाहेर पाडण्याचे दिले संकेत?

**मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था**

सातारा जिल्हा परिषद निवडणुकीनंतर महायुतीतील अंतर्गत वाद आता टोकाला पोहोचला असून संतप्त झालेल्या शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी थेट राजीनाम्याची धमकी दिल्याची माहिती समोर येत आहे. साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि इतर शिवसेना मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.सातारा जिल्हा परिषद निवडणुकीवरून योग्य



कारवाई झाली नाही तर आम्ही राजीनामा देऊ, अशी भूमिका शिवसेना आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. (पान २ वर)

शिवसेना (शिंदे) आणि भाजपामध्ये सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीवरून वाद रंगला आहे. या निवडणुकीवेळी शिवसेनेचे नेते तथा मंत्री शंभूराज देसाई यांना धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप शिंदे सेनेकडून करण्यात आला आहे. या निवडणुकी दरम्यान झालेल्या गोंधळाचे पडसाद आज थेट विधीमंडळात उमटले आहेत.शिवसेना (शिंदे) आणि भाजपामध्ये झालेल्या या वादावरून शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते अनिल परब यांनी शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षावर टीका करत डिवचलं आहे. अनिल परब यांनी शंभूराज देसाई यांचा अप्रत्यक्ष उल्लेख करत आता तुमचे वाघ कुठे गेले? मंत्री मार खातायेत अशी टीका केली. अनिल परबांनी केलेल्या या टीकेला शंभूराज देसाई यांनीही प्रत्युत्तर दिलं. मात्र, यावेळी शंभूराज देसाई यांनी केलेल्या एका वक्तव्याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.




बालसाहित्य लेखनासाठी आवाहन

**विषय: लहान मुलांसाठी विशेष मराठी लेख संग्रह**

नमस्कार लेखक मित्रांनो,
मराठी भाषेचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी आम्ही 'बालविश्व' तसेच अंतर्गत विशेष लेख श्रेणी सुरू करत आहोत.
यासाठी आम्ही कल्पक आणि अनुभवी नवलेखकांकडून खालील विषयांवर मराठीत लेख मागवत आहोत:

लेखनासाठी संभाव्य विषय
**बोधकथा:** संस्कार आणि नीतिमत्ता शिकवणाऱ्या रंजक गोष्टी.
**निसर्ग आणि विज्ञान:** विज्ञानातील कठीण संकल्पना सोप्या भाषेत सांगणारे लेख.
**ऐतिहासिक शूरवीर:** महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची माहिती.
**कोडी आणि खेळ:** मुलांच्या बुद्धीला चालना देणारी शब्दकोडी किंवा गमतीशीर खेळ.
**पर्यावरण भान:** निसर्ग संवर्धन आणि प्रदूषण यावर प्रबोधनपर लेख.
**थोर व्यक्ती :** थोर व्यक्तींची माहिती असलेले लेख.

लेखन नियम व अटी
**भाषा:** शुद्ध, सोपी आणि मुलांच्या वयोगटाला (६ ते १४ वर्षे) समजेल अशी असावी.
**शब्दमर्यादा:** ३०० ते ६०० शब्द. **मौलिकता:** लेख स्वतःचा असावा, कुठेही कॉपी केलेला नसावा.
**चित्र:** लेखाला अनुसरून चित्रे असल्यास प्राधान्य दिले जाईल.

'मुलांसाठी लिहिणे म्हणजे केवळ सोपे लिहिणे नव्हे,
तर त्यांच्या जगात उतरून त्यांच्या नजरेतून लिहिणे होय.'

तुमचे लेख कुठे पाठवाल?
अजिंक्य भारत
तुमचे लेख आम्हाला www.ajinkyabharat.com
7028173880 नंबरवर पाठवू शकता.
निवडक लेखांना आमच्या प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी दिली जाईल.


## दहशतवादामुळे अकराशेवर मृत्यू | जागतिक दहशतवाद निर्देशांकात शिक्कामोर्तब

# पाकिस्तान जागतिक स्तरावर सर्वाधिक दहशतवादग्रस्त देश

**मुंबई : दि.२३ वृत्तसंस्था**

**दहशतवादी आणि दहशतवादी कृत्यांना सातत्याने पाठिंबा देणारा पाकिस्तान बुर्किना फासोला मागे टाकत जगातील सर्वाधिक दहशतवादग्रस्त देश ठरला आहे. क्रमांक मिळवला आहे. इन्स्टिट्यूट फॉर इकॉनॉमिक्स अँड पीसने प्रसिद्ध केलेल्या ताज्या जागतिक दहशतवाद निर्देशांकात (ग्लोबल टेररिझम इंडेक्स) ही बाब स्पष्ट झाली आहे. याच अहवालात भारतात दहशतवादाशी संबंधित मृत्यू आणि हल्ल्यांत घट दिसून आल्याचे म्हटले आहे.**

पाकिस्तानमध्ये गेल्या वर्षी दहशतवादाशी संबंधित १,१३९ मृत्यू आणि १,०४५ घटनांची नोंद झाली. तेथे सलग सहाव्या वर्षी अशा घटनांतील मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे. २०२६ च्या या मूल्यमापनानुसार या बिघडलेल्या परिस्थितीचा



संबंध तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) चे पुनरुत्थान आणि अफगाणिस्तान सीमेवरील वाढत्या अस्थिरतेशी जोडला गेला आहे. अहवालात म्हटले आहे की, २०२१ मध्ये तालिबानच्या सत्तेत परतण्यामुळे टीटीपीला त्यांचा भौगोलिक विस्तार आणि कार्यान्वित कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढवण्यासाठी साधन आणि प्रेरणा मिळाली.जागतिक स्तरावर मागोवा घेतलेल्या चार सर्वांत घातक दहशतवादी संघटनांपैकी टीटीपी ही एकमेव संघटना होती, जिच्यामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत २०२५ मध्ये वाढ झाली. हिंसाचार प्रामुख्याने खैबर पख्तुनख्वा आणि बलुचिस्तानमध्ये केंद्रित होता. पाकिस्तानमधील सर्वाधिक मृत्यू येथेच झाले.

### अफगाण-पाकिस्तान सीमावर्ती भाग केंद्रबिंदू

अफगाणिस्तान – पाकिस्तान सीमावर्ती भाग हा सतत संघर्षाचा केंद्रबिंदू राहिला आहे. येथे सीमापार अतिरेकी कारवायांमुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला या तणावाचे रूपांतर थेट संघर्षात झाले. अफगाण भूभागावर टीटीपीच्या दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप करत पाकिस्तानने काबूल आणि कंदाहारवर हवाई हल्ले केले.

ओलिस ठेवण्याच्या घटनांमध्येही मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने जाफर एक्स्प्रेस रोखून ४४२ लोकांना ओलिस ठेवले गेले होते. दरम्यान, भारतात दहशतवादाशी संबंधित मृत्यू कमी झाले आहेत. जागतिक स्तरावरील एकूण मृत्यूंमध्ये भारतातील मृत्यूचे प्रमाण २ टक्के आहे.

## पान 1 वरून...

### युद्धामुळे भारतासमोरही अभूतपूव...

पुरवत आहोत. बाधित देशांमधील आमची दूतावासे भारतीयांना मदत करत आहेत. ते नियमितपणे मार्गदर्शक सूचना जारी करत आहेत. आम्ही २४७ नियंत्रण कक्ष स्थापन केले आहेत,'' अशी माहिती पंतप्रधान मोदी यांनी दिली. आयात होणाऱ्या एलपीजी आणि कच्च्या तेलावर इराण युद्धामुळे परिणाम होत आहे. त्यावर पंतप्रधान मोदी यांनी आपले सरकार दक्ष असून मदतीसाठी सज्ज असल्याचं सांगितलं. ते म्हणाले, ''कच्चे तेल आणि एलपीजी स्ट्रेट ऑफ होर्मुझ मार्गे भारतात येते. भारत ६० टक्के एलपीजी आयात करतो. त्यामुळे आम्ही देशांतर्गत एलपीजीला प्राधान्य दिलं आहे,'' अशी त्यांनी माहिती दिली. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आपल्या सरकारनं प्रयत्न केल्याचंही पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं. ''गेल्या दशकात देशात युरियाचे सहा प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देत आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे सभागृहाला आश्वास्त करत आहे.''

### काळाबाजार करणाऱ्यांवर ...

'भारतानं एकजुटीनं राहणं गरजेचं आहे. आपण सावध आणि सतर्क राहिलं पाहिजे. काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींवर लक्ष ठेवावे, असे सर्व राज्य सरकारांना आवाहन करत आहे. प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर तिथं तातडीने कारवाई करावी.''

### ज्येष्ठ नेते दत्ता मेघे अनंतात...

सामाजिक, राजकीय क्षेत्रासह वर्धा जिल्ह्याचे कधीही भरुन न निघणारे नुकसान झाले आहे, असे यावेळी शोक संवेदना व्यक्त करतांना राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

### शिंदे गटाचे सर्व मंत्री...

सातत्याने आमची गळचेपी होत आहे यावर बोलले पाहिजे, अशी मागणी देखील शिवसेना आमदारांनी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.शिवसेना मंत्र्यांची नाराजी पाहून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना साताऱ्यातील या प्रकरणावरून आक्रमक भूमिका घेण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्री आणि आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# विधीमंडळात साताऱ्याच्या मुद्द्यावरून खडाजंगी

## उपसभापती गोऱ्हेंकडून पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीच्या वेळी झालेल्या गोंधळीचे विधीमंडळात पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. निवडीच्या राड्यावरून शिवसेना नेते चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी मंत्री शंभुराज देसाई यांनी विधीमंडळात पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

याप्रकरणाची दखल घेत विधान परिषद सभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा पोलीस अधीक्षकांचे निलंबन करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्या दिवशीच्या घटनाक्रमाचे सीसीटीव्ही फुटेज मागवावे. त्याचे फुटेज माध्यमांकडे असू शकतात, असे निर्देश मंत्री शंभुराज देसाई यांच्या तक्रारीनंतर गोऱ्हे यांनी दिले.



या प्रकरणात पुण्याच्या विभागीय आयुक्तांना लक्ष घालून चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी निलंबनाची कारवाई केल्यानंतर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी कडाडून विरोध केला.

जयकुमार गोरेंचा कारवाईला विरोध

सभापती महोदया, तुम्ही निर्देश देण्यापूर्वी वस्तुस्थिती जाणून घेणं गरजेचे होतं तत्पूर्वी तुम्ही निर्देश दिले, असे म्हणत कारवाईला विरोध केला.

''तुमच्या निर्णयावर हरकत नाही. मात्र जो निर्णय झाला आहे तो चुकीचा आहे. कार्यकर्ते कोणी आणले, भाजपवर कसं काय आरोप करता. तिथं जबरदस्ती सीइओंना बैठक कोणी घ्यायला लावली? मंत्री देसाई यांच्या तक्रारीच्या आधारावर कारवाई करत आहात. तीच वस्तुस्थिती मी देखील सांगत आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवेळी जिल्हा अधिकाऱ्यांचे आदेश असताना प्रशासनाची इमारत उघडून आत कोण गेलं, याची चौकशी झाली पाहिजे.

सभापती राम शिंदे दाखल झाल्यानंतर गोरे यांनी निलंबनाला स्थगिती देण्याची मागणी केली. कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्याच काम कुणी केलं. ज्याच्यावर गुन्हा दाखल झाला, त्याला संरक्षण घेऊन इमारतीत घेऊन जात असाल. तर हे कोणत्या कायद्यात बसते. ४ हजार लोक जिल्हा परिषदेत घुसले ते कुणी आणले याच देखील उत्तर द्यायला हवं, असेही गोरे म्हणाले.

दरम्यान, साताऱ्यात शुक्रवारी जिल्हा परिषदेत अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड पार पडली. भाजपकडे संख्याबळ नसताना भाजपचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष झाला. या निवडीदरम्यान झालेल्या गोंधळात मंत्री शंभुराजे देसाई यांना दुखापत झाली. या निवडीदरम्यान पोलिस बळ आणि प्रशासनाला हाताशी धरून निवड केल्याचा आरोप मंत्री देसाईंनी केला. यावेळी देसाई यांनी पोलिसांनी धक्काबुक्की करत २ सदस्यांना ओढून घेऊन गेल्याचा आरोप केला.

### तर आम्ही राजीनामा देऊ

**मुंबई** : सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणूकीवरून शिवसेना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मंत्री शंभूराज देसाई यांनी पोलिस अधिक्षकांवर गंभीर आरोप यावेळी विधीमंडळात केला. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील याप्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. अधिवेशनात सातारा निवडणुकीचे पडसाद उमटल्यानंतर भाजपचे आमदार आणि मंत्र्यांची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात झाली. तर एकनाथ शिंदे यांच्या दालनातही शिवसेनेच्या आमदारांनी आक्रमक भूमिका मांडली. सत्ताधारी मंत्री आणि आमदारांना मिळणारी दुय्यम वागणूक न खपणारी आहे. आम्ही राजीनामा देऊ अशी भूमिका शिवसेना मंत्र्यांने एकनाथ शिंदेच्या समोर बोलून दाखवली. दरम्यान, सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणूकीवरून मंत्री शंभुराज देसाई यांनी विधीमंडळात पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

## दूध भेसळखोरांना सोडणार नाही, कठोर कारवाईसाठी शासन कटिबद्ध

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी राज्य शासन अत्यंत गंभीर असून, या गुन्ह्यांच्या मुळाशी जाऊन कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज विधान परिषदेत दिली. आमदार मनीषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, केवळ गुन्हे दाखल करून न थांबता प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. विशेषतः अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू असून, नुकतेच १९७ नवीन अन्न निरीक्षक प्रत्यक्ष सेवेत रुजू झाले असल्याची माहिती त्यांनी यावेळी सभागृहाला दिली.

आज विधान परिषदेत बोलताना आमदार मनीषा कायंदे यांनी राज्यातील दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील (पनीर, मावा इ.) भेसळीच्या वाढत्या प्रकरणांवर तीव्र चिंता व्यक्त केली.



विशेषतः आंध्र प्रदेशातील रासायनिक भेसळीमुळे झालेल्या मृत्यूंचा संदर्भ देत, महाराष्ट्रातही अशा भेसळखोरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होणार का? असा रोखठोक प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी प्रशासकीय त्रुटींवर बोट ठेवताना सांगितले की, मागील जुलै महिन्यात पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने नवीन कठोर कायदा आणण्याची घोषणा केली होती, परंतु तो कायदा अद्याप का लागू झाला नाही? तसेच, अन्न व औषध प्रशासन विभागात तब्बल ४५% पदे रिक्त असल्याने पुरेसे अन्न निरीक्षक उपलब्ध नाहीत, अशा परिस्थितीत प्रभावी छापे आणि कारवाई कशी होणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अनेक उत्पादनांच्या एक्सपायरी डेट्स आणि लेबल्समध्ये केल्या जाणाऱ्या फेरफारीवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे सांगत, त्यांनी संपूर्ण व्यवस्थेतील गंभीर दोष सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

आमदार मनीषा कायंदे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवळ यांनी सांगितले की, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ ही एक अतिशय गंभीर बाब असून शासन यावर कडक पावले उचलत आहे. त्यांनी वर्सो वा आणि अंधेरी येथील छाप्यांचा संदर्भ देत मान्य केले की, नामांकित ब्रँड्सच्या पिशव्यांमध्ये भेसळयुक्त दूध भरून विकण्याचे प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत १४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून ४ जणांवर तडीपारीची कारवाई प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

मंत्री नरहरी झिरवळ यांनी मान्य केले की, मागील काळात अन्न व औषध प्रशासन विभागात मनुष्यबळाची मोठी कमतरता होती. मात्र, शासनाने यावर तातडीने पावले उचलली असून, नुकतीच १९७ नवीन अन्न निरीक्षकांची भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे. या नवनियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून त्यांना प्रत्यक्ष कामावर पदस्थापना देखील देण्यात आली आहे. विभागाच्या सक्षमीकरणासाठी सध्या असलेल्या १२७१ मंजूर पदांऐवजी २५४४ पदांचा नवा आकृतीबंध अपेक्षित असून, त्यासंदर्भातील प्रस्ताव आणि फाईल सध्या वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. भेसळखोरांवर होणाऱ्या कारवाईबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, शासन केवळ गुन्हे दाखल करण्यापुरते मर्यादित न राहता, या गुन्ह्यांच्या मुळाशी जाऊन कठोर कायदेशीर कारवाई करण्यास कटिबद्ध आहे. विशेषतः नामांकित ब्रँड्सच्या नावाखाली होणाऱ्या भेसळीला आळा घालण्यासाठी प्रशासकीय त्रुटी दूर केल्या जातील आणि भविष्यात रिक्त पदे भरून यंत्रणा अधिक सक्षम केली जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

## अशोक खरात प्रकरणावर राज ठाकरेंची प्रतिक्रिया

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

नाशिकमध्ये स्वयंघोषित ज्योतिषी म्हणून ओळखले जाणारे अशोक खरात यांच्या काळ्या कारनाम्यांचा साखळीप्रमाणे पर्दाफाश होत आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणात अटकेत असलेल्या खरातबाबत नवनवे खुलासे होत आहेत. या प्रकरणात अशोक खरातला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले असून, नाशिक पोलिसांनी त्याला कठोर चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. विशेष तपास पथक () स्थापन करण्यात आले असून, खरातच्या फॉर्महाऊस, कार्यालय आणि मालमत्तेवर छापेमारी सुरू आहे. यापूर्वीच्या गुन्ह्यांमध्येही ५८ हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ जप्त झाले आहेत. या प्रकरणावर अनेक राजकीय नेतेमंडळींनी प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. यानंतर आता मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील भोंदूबाबा अशोक खरातबाबत एक पोस्ट शेअर रत करत या प्रकरणावर पहिल्यांदाच भाष्य



केलं आहे. राज ठाकरे यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले की, ''अशोक खरात प्रकरणातले हिडीस तपशील वाचून, शब्दशः गरगरल्यासारखं झालं. अवघ्या काही दिवसांपूर्वी १९ मार्च २०२६ ला आमच्या पक्षाच्या गुढी पाडवा मेळाव्यातून, महाराष्ट्राला किती सशक्त परंपरा लाभली आहे आणि या महाराष्ट्राने किती अद्वितीय माणसं या देशाला दिली आहेत याचं सादरीकरण केलं होतं. त्यात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम ते संत गाडगेबाबांपर्यंतचा ते अगदी आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे या सगळ्यांनी मराठी मनाची कशी मशागत केली हे दाखवलं होतं. आणि त्याच महाराष्ट्रात जेंव्हा अशोक खरातसारखा नीच माणूस, राजकारण्यांच्या आशीर्वादाने धुमाकूळ घालतो तेंव्हा खरंच, 'कुठे नेऊन ठेवला आहे महाराष्ट्र' हा प्रश्न पडतो.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राजमाता जिजाऊ' एसटी बससेवेचे लोकार्पण



**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

'राजमाता जिजाऊ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अत्याधुनिक एसटी बससेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार २४ मार्च रोजी विधिमंडळाच्या प्रांगणात होणार आहे. या सोहळ्यास विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

'राजमाता जिजाऊ' बससेवेच्या समावेशामुळे एसटीच्या ताफ्यात परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम साधला गेला आहे. लवकरच एसटी महामंडळाच्या ताफ्यात तब्बल ३ हजार 'राजमाता जिजाऊ' या नावाने नव्या स्मार्ट बसेस दाखल होणार असून, त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठे बळ मिळणार आहे. या बसेसना 'राजमाता जिजाऊ' हे नाव देण्यामागे हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणास्थान असलेल्या जिजाऊसाहेबांना अभिवादन करण्याची भावना आहे. स्वराज्याचे शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मागील संस्कारशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ होय. या मातृशक्तीचा गौरव या नावातून अधोरेखित करण्यात आला आहे. एसटी महामंडळाने यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'यशवंती' आणि 'हिरकणी' अशा ऐतिहासिक नावांनी बससेवेला वेगळी ओळख दिली आहे. त्या गौरवशाली परंपरेत आता 'राजमाता जिजाऊ' या नावाची भर पडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान अधिक समृद्ध झाला आहे, असे मंत्री सरनाईक म्हणाले.

'राजमाता जिजाऊ' बससेवा ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान आणि आधुनिकतेचा आत्मविश्वास यांचा संगम आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, सुरक्षित आणि प्रवासी-केंद्रित होईल, असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

बसमध्ये ३२ आसन रचना असून एकूण ५६ आसन क्षमता आहे, जी सध्याच्या बसपेक्षा १६ आसनांनी अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या बसमध्ये ४ सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम तसेच इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि स्मार्ट होणार आहे.

या बसेस प्रामुख्याने दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

## अशोक खरात प्रकरणाचे विधिमंडळात पडसाद उमटणार : नाना पटोले

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याच्या दृष्कृत्यांमुळे राज्यातील राजकारण तापले आहे. याप्रकरणी रूपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोग पदाचा राजीनामा द्यावा लागला. यानंतर आता भोंदूबाबा अशोक खरात याच्या दृष्कृत्यांची चर्चा विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये झालीच पाहिजे, अशी आग्रही मागणी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केली आहे. अशोक खरात प्रकरणी आम्ही विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे. खरात प्रकरणी राज्य सरकारने खुलासा केला पाहिजे. रुपाली चाकणकर एक महिला असल्याने त्यांना टार्गेट केलं जात आहे का? खरातसोबत देशाचे गृहमंत्री अमित शाह आणि राज्यातील अनेक मंत्र्यांचे फोटो, व्हिडिओ समोर येत आहेत. त्यांच्यावर सुद्धा कारवाई होणार का? असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला. तसेच या प्रकाराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अगदी तीन दिवसातच एसटी स्थापन



केली. एसटीची मागणी कुणीही केलेली नसताना राज्य सरकारने एसटी स्थापन का केली?, अशीही विचारणा त्यांनी केली.मागच्या अधिवेशनामध्ये सुद्धा मी नाशिकचाच मुद्दा घेतला होता. आता खरात कोण आहे, ते समोर आलं आहे. मी विधानसभेत पेनड्राईव्ह दिला होता. मात्र, तो मुख्यमंत्र्यांनी का लपवला? प्रकरण तेव्हाच उघडकीस आले असते. राज्याचे मुख्यमंत्री हेच गृहमंत्री असताना त्यांनी सांगितली होती, अशी कुठलीही घटना घडली नाही. खरातच नाही तर, नाशिकमध्ये आणखी एक आहे ज्यामध्ये काही अधिकारी, मंत्री सुद्धा सहभागी आहेत, असा गौप्यस्फोटही पटोले यांनी केलाया. या संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भात आम्ही विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणून राज्य सरकारला खुलासा मागणार असल्याचेही पटोले यांनी स्पष्ट केलं.


### 'हा निव्वळ योगायोग'

**नाशिक** : मधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याच्याविरुद्ध बलात्कार, नरबळी आणि जादूटोण्याचा आरोप असलेल्या प्रकरणात रविवारी एसआयटीने नाशिकमधील ईशानेश्वर महादेव मंदिराचे पुजारी आणि एका सुरक्षारक्षकाची चौकशी केली. या कारवाईमुळे खरातच्या बाबतीतील अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहे. या प्रकरणावरून आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी रुपाली चाकणकरांसह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनाही लक्ष केले आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी आपल्या फेसबुक या सोशल मीडिया माध्यमावर चाकणकर आणि तटकरेंचा वेगवेगळा फोटो शेअर केला आहे. मात्र यातील एक साम्य दाखवणारी गोष्ट त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे. हे फोटो शेअर करी सुषमा अंधारे यांनी 'एकसारखे रुद्राक्ष माळेचे गंडे हा निव्वळ योगायोग आहे,' असा मजकूर लिहला आहे. मुख्य म्हणजे यात सुनील तटकरे आणि रुपाली चाकणकर यांच्या हातात एकसारखे रुद्राक्ष माळ दिसत असून त्यावर लाल रंगाने मार्क करत लक्ष वेधले आहे.

## दोन महिने आधी प्रकरण बाहेर, मात्र खरातला वाचण्यासाठी कुणी ताकद लावली?

**नाशिक, दि. २३** वृत्तसंस्था

लैंगिक शोषण प्रकरणात नाशिक पोलिसांनी अटक केल्यानंतर आता खरातचे विकृत कारनामे समोर येऊ लागले आहेत. अशोक खरातच्या जवळ १०० व्हिडीओ क्लिप पोलिसांच्या हाती लागल्या आहेत. आता आणखी एक नवी माहिती समोर आली आहे. अशोक खरातला पोलिसांकडून काही महिने आधीच अटक झाली असती. मात्र, एका पॉवरफुल व्यक्तीनं त्याच्यासाठी सॉफ्ट कॉर्नर ठेवल्यानं अटक टळली असल्याची माहिती समोर आली आहे. संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या खरात प्रकरणाचा भांडाफोड काही महिने आधीच झाला असता, मात्र एका बड्या पोलीस अधिकाऱ्याच्या आंधळ्या भक्तीमुळे खरातला मोकळे रान मिळाल्याची खळबळजनक चर्चा आता रंगू लागली आहे. गुन्हेगाराला बेड्या ठोकण्याऐवजी त्याला वाचवण्याचा आणि उलट तक्रारदारांनाच धडा शिकवण्याचा सल्ला या अधिकाऱ्याने दिल्यामुळे हे



प्रकरण दडपले गेल्याचे समोर येत आहे. या संपूर्ण प्रकरणात नाशिकमधील एका अतिउच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्याची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे. हा अधिकारी खरातचा इतका मोठा भक्त होता की, खरातच्या मुलीच्या साखरपुड्यात त्याने कौतुकास्पद भाषण केले होते. आपल्या घरचं कार्य असल्यासारखी धडपड, पळापळ या अधिकाऱ्याने केली असल्याचे दिसून आले. ही बाब अनेकांच्या लक्षात आली होती. जेव्हा खरातने या क्लिप्स या अधिकाऱ्याला दाखवल्या, तेव्हा एका कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याने तत्काळ कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, खरातच्या प्रेमापोटी या अधिकाऱ्याने क्लिप्स पाठवणाऱ्यांविरुद्धच खंडणीचा गुन्हा दाखल करण्याचा सल्ला दिला. याच सल्ल्याने खरातचा घात झाला आणि प्रकरणाला वेगळे वळण मिळाले.

खरातला आलेल्या त्या क्लिप्स केवळ एकदाच पाहता येणार होत्या. पुन्हा पाहण्यासाठी सॉफ्टवेअरची गरज होती. खरातने आपला मोबाईल या भक्त अधिकाऱ्याच्या विश्वासातील पोलिसांकडे सोपवला. पोलिसांनी आपले तांत्रिक कसब पणाला लावून जेव्हा त्या क्लिप्स उघडल्या, तेव्हा त्यातील दृश्ये पाहून स्वतः पोलीसही हादरले. आपल्या साहेबांच्या लाडक्या खरातचे हे रूप पाहून सत्य सांगायचे कसे, असा प्रश्न त्यांना पडला होता. अखेर एकाने हिंमत करून सर्व क्लिप्स अधिकाऱ्याला दाखवल्या.

क्लिप्समधील भयानक वास्तव समोर आल्यानंतरही या अधिकाऱ्यातील पोलीस जागा झाला नाही. उलट, ''हे बाहेर आले तर तुमची मोठी बदनामी होईल,'' असा समजुतीचा सूर काढत त्याने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. जर त्याच वेळी या अधिकाऱ्याने कायद्याचा धाक दाखवून खरातवर कारवाई केली असती, तर दोन-चार महिने आधीच या पापाचा घडा फुटला असता.

**कारवाई** | विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांची ग्वाही

# भोंदुबाबा अशोक खरात प्रकरणात कुणालाही सोडणार नाही

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात ऊर्फ कॅप्टन याच्या अघोरी कृत्यांचे आणि लैंगिक शोषणाचे धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर, राज्यभरात खळबळ उडाली. सोमवारी विधानसभेतही या प्रकरणाचे पडसाद उमटले. विरोधकांनी यावर चर्चेची मागणी करत गदारोळ घातला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्ती करत मंगळवारी या प्रकरणावर निवेदन करणार असल्याचे सांगितले. तसेच भोंदुबाबा प्रकरणात कुणालाही सोडणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार यांनी अशोक खरात प्रकरणात सोमवारी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडला. त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, शासन यात कारवाई करत असून शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, असे आदेश दिले. मात्र, त्यानंतरही



विरोधकांनी या प्रकरणावर चर्चा घडवून आणण्याची मागणी कायम ठेवत गदारोळ घातला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी यात हस्तक्षेप करीत सरकारची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''विरोधी पक्षाच्या वतीने जो मुद्दा उपस्थित झाला तो अत्यंत गंभीर आहे. भोंदुबाबा अशोक खरातने आपल्या कथित शक्तींचा दुरुपयोग करत दिशाभूल करून अनेक महिलांसोबत गैरव्यवहार, दुष्कृत्य केल्याचे समोर येत आहे. पोलिसांनी ट्रॅप तयार करून सक्रियपणे यासंदर्भातील कारवाई केली आहे. या प्रकरणात महिला समोर यायला तयार नव्हत्या. पण त्यांना योग्य पद्धतीने धीर दिल्यानंतर आता काही महिलांनी तक्रार केली असून उर्वरित अजून काही महिला तक्रार करतील.'' १० मार्चपासून कारवाईच्या हालचाली ''यासंदर्भात कारवाई आता झाली असली तरीसुद्धा याची तयारी आधीपासूनच सुरू होती. अशोक खरातच्या अटकेच्या अगोदर म्हणजेच दि. १० मार्च रोजी दुसऱ्या जिल्ह्यातून एका तक्रारीचा उपयोग करून त्यांचा एलओसीदेखील काढून ठेवला होता, जेणेकरून त्यांना बाहेर पळता येऊ नये. या प्रकरणात पूर्ण कारवाई सुरु असून मी या सभागृहात उद्या याचे सविस्तर निवेदन करेन. हा कोणासाठीही राजकारणाचा प्रश्न नाही तर, महिलांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. महिलांचा दुरुपयोग करून त्यांचे ब्रेन वॉशिंग करण्यासारख्या अनेक गोष्टी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी याबाबत सखोल निवेदन करेन,'' असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कुणाचा दुरचा संबंध असेल तरीही सोडणार नाही

''मी नेहमी क्लिनचिट देत नाही. जो क्लिन असतो त्यालाच क्लिनचिट मिळते. अशी कुठलीच चिट माझ्याकडे नाही. या प्रकरणात ज्याचा दुरान्वयानेही संबंध असेल त्यालाही सोडले जाणार नाही,'' असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## उद्धव ठाकरेंना भोंदूबाबा प्रकरणात सहआरोपी करायचे का?

**मुंबई, दि. २३** वृत्तसंस्था

भोंदूबाबाचे कारनामे २००३ पासून सुरू होते, मात्र काँग्रेस सरकार आणि महाविकास आघाडी सरकारने त्याला बेड्या ठोकण्याची हिंमत दाखवली नाही. या भोंदूबाबाला पायघड्या घालण्याचे काम, भोंदूबाबाच्या आश्रमाला पाणी पुरवण्याचे काम उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मविआ सरकारने केले. महायुती सरकारमधील नऊ मंत्र्यांना त्यांचे भोंदूबाबासोबत फोटो आहेत म्हणून त्याला आक्षेप घेत सहआरोपी करा अशी मागणी संजय राऊत करत आहेत. मग या न्यायाने उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी करायचे का असा खरमरीत सवाल भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. न्याय सर्वांना एकच असायला हवा असेही ते म्हणाले.

भोंदूबाबाला बेड्या ठोकण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे चार दिवसांपूर्वी अभिनंदन करणारे राऊत आज मात्र या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राजकारण करत आहेत अशी टीका करतात हा विनोदच आहे. भोंदूबाबा मुद्द्यावरून राऊत राजकारण करत आहेत. खोटेनाटे आरोप करणे, भोंदूबाबाला पायघड्या घालणे याला हीन राजकारण करणे म्हणतात असे हीन राजकारण करण्यात राऊतांचा हात कोणी धरणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या कारकीर्दीत भोंदूबाबाच्या काळ्या कृत्याला जे कोणी साथ देत असतील त्या सर्वांवर चौकशीअंती कठोर कारवाई होणार असे बन म्हणाले.

# दिल्लीत थंडीचा कडाका तर उत्तर प्रदेशात पावसाचे सावट

नवी दिल्ली : दि.२३ वृत्तसंस्था

**होळीनंतर देशभरातील उष्णता वाढत चालली आहे. मार्च महिना संपत आला आहे आणि उत्तर भारतासह देशभरात मैदानी प्रदेशात सूर्यप्रकाश पसरू लागला आहे. आज, २३ मार्च २०२६ रोजी, सकाळची सुरुवात आल्हाददायक झाली. पण राजधानी दिल्लीत सततच्या पावसामुळे हवामानात झालेल्या अचानक बदलामुळे लोकांना पुन्हा एकदा थंडी जाणवू लागली आहे. सकाळच्या वेळी दाट धुक्याने लोकांना जानेवारी महिन्यातील थंडीसारखे वातावरण झाले आहे. या पावसामुळे उत्तर प्रदेशसह उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून बदलत्या हवामानाने अनेक विक्रम मोडले आहेत.**



राजधानी दिल्ली आणि एनसीआर प्रदेशात आज हवामान संमिश्र राहण्याची शक्यता आहे. सकाळ आणि रात्री हलका गारवा जाणवेल, तर दुपारपर्यंत तापमान ३० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. आज दिल्लीत आकाश निरभ्र राहील, परंतु अधूनमधून वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांमुळे तापमानात लक्षणीय वाढ होणार नाही.

उत्तर प्रदेशात संमिश्र हवामान

उत्तर प्रदेश आणि बिहारमधील काही भागांमध्ये दुपारच्या वेळी सौम्य उष्णता जाणवत आहे, मात्र पूर्व उत्तर प्रदेशातील जोरदार वाऱ्यांमुळे कडक उन्हापासून काहीसा दिलासा मिळेल. पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे उत्तर भारतातील या मैदानी प्रदेशात ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाची शक्यता आहे.

मैदानी प्रदेशात उष्णतेत वाढ झाली असली तरी पर्वतीय प्रदेशात थंडी कायम आहे. आज हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या उंच भागांमध्ये मुसळधार पाऊस आणि हिमवृष्टीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शिमला आणि नैनितालसारख्या पर्यटन स्थळांमध्ये किमान तापमान ८ ते ११ अंश सेल्सिअसच्या दरम्यान असून, त्यामुळे सकाळ आणि संध्याकाळी थंड वारे वाहत आहेत.

हवामान विभागाने , पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे डोंगराळ राज्यांमध्ये हिमवृष्टी सुरू राहू शकते, ज्यामुळे सखल भागांमध्ये तापमान कमी होण्याचा इशारा दिला आहे. पर्यटकांना उंच ठिकाणी प्रवास करताना हवामानाचा अंदाज लक्षात ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### मेघगर्जनेसह वादळांचा उच्च धोका

हवामान विभागाने २३ ते २६ मार्च दरम्यान उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळांचा इशारा दिला आहे. राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये ताशी ४० किलोमीटर वेगाचे वारे वाहू शकतात. केवळ पर्वतीय प्रदेशातच नव्हे, तर बिहार, झारखंड आणि ओडिशामध्येही २४ ते २८ मार्च दरम्यान विजांच्या कडकडाटासह मेघगर्जनेसह वादळे आणि ताशी ३० ते ५० किलोमीटर वेगाच्या वाऱ्यासह धुळीच्या वादळांचा इशारा देण्यात आला आहे. २६ मार्च रोजी पूर्व राजस्थानच्या जिल्ह्यांमध्येही हलका पाऊस आणि विजांचा कडकडाट अपेक्षित आहे. ही परिस्थिती सूचित करते की येत्या काही दिवसांत हवामान बरेच अस्थिर राहील.

### पश्चिमी वाऱ्यांमुळे हवामानात चढ-उतार

आज दिल्लीत कमाल तापमान ३० अंश आणि किमान १६ अंश राहण्याची शक्यता आहे, तर पाटण्यात पारा ३१ अंशांपर्यंत पोहोचू शकतो. २६ मार्च रोजी जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. हवामानशास्त्रज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत उष्णता हळूहळू वाढेल, परंतु अधूनमधून येणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांमुळे तापमानात चढ-उतार होत राहतील. या बदलत्या हवामानाचे वैशिष्ट्य म्हणजे, नदीकाठच्या भागांमध्ये आणि बिहारच्या काही जिल्ह्यांमध्ये सकाळी हलके धुकेही दिसू शकते.

## महत्त्वाचे

### इराण झुकला की नडला?

**तेहरान :** मध्यपूर्वेतील तणाव आता नव्या निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. अमेरिका-इस्रायलसोबत सुरु असलेल्या युद्धात इराणने आक्रमक पवित्र ठेवला आहे. होर्मुझची खाडी अमेरिका-इस्रायलसाठी बंद केली आहे. तसेच त्यांना साथ देणाऱ्या देशांसाठीही हा मार्ग बंद करण्यात आला आहे. यामुळे जागतिक तेल बाजारात तुटवडा निर्माण होऊन इंधन दर गगनाला भिडले आहे. दरम्यान हा संघर्ष थांबवण्यासाठी जागतिक स्तरावर तुर्कीसारख्या देशांच्या मध्यस्थीने प्रयत्न सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर इराणने युद्धबंदीसाठी तयारी दर्शवली आहे. परंतु आता यासाठी ३ नव्हे, तर ६ अटींचा प्रस्ताव ठेवला आहे. या अटी मान्य न झाल्यास हल्ले सुरुच राहतील असा इशारा दिला आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझचा मार्ग खुला करण्यासाठी ४८ तासांची मुदत दिली होती. असे न केल्यास इराणच्या उर्जा प्रकल्पांवर हल्ल्याची आणि इराणला अंधारात ढकलण्याची धमकी दिली होती. मात्र या धमकीपुढे न झुकता इराणने सडेतोड उत्तर दिले आहे.

### इराणमध्ये 'घोस्ट' राजवट

**नवी दिल्ली:** इराणचे मावळते सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर (२८ फेब्रुवारी २०२६) त्यांचे पुत्र मोजतबा खामेनी यांची नियुक्ती करण्यात आली, तेव्हा जगाला वाटले की इराणमध्ये सत्तेचे संक्रमण शांततेत होईल. मात्र, नियुक्तीला दोन आठवड्यांहून अधिक काळ लोटूनही मोजतबा यांनी एकदाही सार्वजनिक दर्शन दिलेले नाही. इतकेच काय, तर त्यांनी एकही व्हिडिओ किंवा ऑडिओ संदेश जारी केलेला नाही. यामुळे आता एकच प्रश्न विचारला जात आहे इराणचा नवा सर्वोच्च नेता नक्की आहे कुठे? गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या धक्कादायक माहितीनुसार, २८ फेब्रुवारी रोजी ज्या अमेरिकन-इस्रायली हल्ल्यात त्यांचे वडील मारले गेले, त्याच हल्ल्यात मोजतबा देखील गंभीर जखमी झाले होते. काही पाश्चात्य माध्यमांनी असा दावा केला आहे की, मोजतबा खामेनी यांचे दोन्ही पाय कापले गेले असून ते सध्या कोमात आहेत. इराण सरकारने हे दावे फेटाळले असले तरी, त्यांच्याकडे मोजतबा जिवंत असल्याचा कोणताही व्हिडिओ पुरावा नाही. केवळ लिखित संदेशांद्वारे राज्यकारभार चालवला जात असल्याने त्यांना 'कार्डबोर्ड अयातुल्ला' असे हिणवले जात आहे.अमेरिकेची सीआयए आणि इस्रायलची मोसाद या यंत्रणा मोजतबा यांच्या हालचालींवर २४ तास लक्ष ठेवून आहेत. सीआयएच्या एका अधिकाऱ्याने या परिस्थितीला ''बियॉन्ड वेअर्ड'' (अत्यंत विचित्र) असे म्हटले आहे. इराणचे अधिकारी मोजतबा यांच्या भेटीसाठी वेळ मागत आहेत.

# आम्ही धमक्यांना घाबरत नाही

## ट्रम्प यांच्या ४८ तासांच्या अल्टीमेटमवर इराणचा पलटवार

तेहरान: दि.२३ वृत्तसंस्था

मध्यपूर्वेतील अमेरिका-इराण संघर्ष काही थांबण्याचे नाव घेईना. दोन्ही देशांमध्ये केवळ लष्करीच नव्हे, तर एकमेकांवर शाब्दिक वारही सुरु आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्ट्रेट ऑफ होर्मुझवरुन धमकी दिली आहे. त्यांच्या या धमकीवर इराणने पलटवार केला आहे.

ट्रम्प यांनी इराणला 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' हा सागरी मार्ग खुला करण्यास सांगितले आहे. यासाठी त्यांनी इराणला ४८ तासांचा वेळ दिला आहे. जागतिक तेल पुरवठ्यात होणारी अडचण आणि वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर इराणला कडक इशारा दिला होता. त्यांनी म्हटले होते की, ''इराणने पुढील दोन दिवसांत कोणताही अटीशिवाय हा सागरी मार्ग पूर्णपणे खुला करावा, असे न केल्यास अमेरिकन सैन्य इराणच्या वीज प्रकल्पांना उद्ध्वस्त करेल,''



असा थेट इशारा ट्रम्प यांनी दिला होता.

दरम्यान ट्रम्प यांच्या धमकीवर प्रत्युत्तर देताना इराण चे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी, इराण कोणत्याही 'वेड्या' धमकीसमोर झुकणार नाही असे म्हटले. त्यांनी म्हटले की, ''अमेरिका इराणला नकाशावरुन पुसून टाकण्याचे केवळ स्वप्न पाहू शकतो. अशा धमक्यांमुळे आम्ही कमकुवत होत नाही, तर याऐवजी आमचा संकल्प अधिक दृढ होत आहे.''

''आम्ही आमच्या देशाचे, सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यास युद्धभूमीवर कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यास सज्ज आहोत, असे त्यांनी ठणकावून सांगितले.'' पेझेश्कियान यांनी हेही स्पष्ट केले की, ''इराणच्या मित्र राष्ट्रांसाठी, त्यांच्या सार्वभौमत्वाचा आदर करणाऱ्या देशांसाठी होर्मुझचा मार्ग खुला आहे. परंतु शत्रू राष्ट्रांसाठी हा मार्ग कायम बंद राहील.

होर्मुझ हा जगाली सर्वात महत्त्वाचा उर्जा व्यापार मार्ग आहे. या मार्गावरुन जहातील एकूण तेल आणि वायू वाहतूकीपौकी २०% व्यापार होता. हा मार्ग भौगोलिकरित्या इराणच्या नियंत्रणाखाली येतो.

सध्या इराणमध्ये मोठे ब्लॅकआउट होण्याची शक्यता आहे. इराणच्या उर्जा पायाभूत सुविधांवर हल्ला होण्याची भिती वर्तवण्यात आली असून. मोठे वीज संकट येण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर पुढील ४८ तासांसाठी पाण्याचा साठा, मोबाईल फोन, बॅटरी चार्जिंग करुन ठेवण्यास सांगितले आहे.

# इराणने रोखला होर्मुझचा मार्ग

तेहरान: दि.२३ वृत्तसंस्था



मध्यपूर्व आशियातील तणाव आता एका नव्या आणि धोकादायक वळणावर येऊन पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ खुला करण्यासाठी दिलेल्या ४८ तासांच्या अल्टीमेटमला इराणने थेट आव्हान दिले आहे. इराणने थेट होर्मुजमधून जाणाऱ्या प्रत्येक जहाजावर २० लाख डॉलर्स म्हणजेच सुमारे १८.८ कोटी रुपयांचा 'ट्रान्झिट टॅक्स' लागू करण्याचे संकेत दिले आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत मोठी खळबळ उडाली आहे.

इराण च्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे सदस्य अलाउद्दीन बोरुजेर्दी यांनी नुकताच एक खळबळजनक दावा केला आहे. त्यांनी युद्धाशी संबंधित खर्च वसूलण्यासाठी इराणने नवे धोरण स्वीकारले असल्याचे म्हटले. त्यांच्या म्हणण्यानुसार, इराण आपल्या सागरी हद्दीतून जाणाऱ्या जहाजांकडून कर वसूल करणार असून हा त्यांचा सार्वभौम अधिकार आहे. त्यांच्या या विधानामुळे जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ मार्ग खुला करण्यासाठी ४८ तासांचा कालावधी दिला होता. त्यांनी म्हटले होते की, ''इराणने पुढील दोन दिवसांत कोणताही अटीशिवाय हा सागरी मार्ग पूर्णपणे खुला करावा, असे न केल्यास अमेरिकन सैन्य इराणच्या वीज प्रकल्पांना उद्ध्वस्त करेल,'' असा थेट इशारा ट्रम्प यांनी दिला होता.यावर प्रत्युत्तर देताना इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनीही इराण कोणत्याही 'वेड्या' धमकीसमोर झुकणार नाही असे म्हटले आहे. तसेच अमेरिका केवळ इराणला नकाशावरुन पुसून टाकण्याचे स्वप्नच पाहू शकतो.

### इम्रान खान यांचा संयम सुटला

# पाकिस्तानी न्यायव्यवस्थेची लाजीरवाणी अवस्था दाखवली जगाला

नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि 'पीटीआय' पक्षाचे प्रमुख इम्रान खान सध्या रावळपिंडीच्या अदियाला जेलमध्ये बंद आहेत. मात्र, तुरुंगाच्या भिंतीही त्यांचा आवाज दाबू शकलेल्या नाहीत. नुकताच ईदच्या मुहूर्तावर त्यांनी आपल्या मुलांशी फोनवरून संवाद साधला आणि या संवादादरम्यान त्यांनी पाकिस्तानी न्यायव्यवस्थेवर जे ताशेरे ओढले आहेत, त्याने संपूर्ण पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. ''न्यायाधीशांनी आपली सद्सद्विवेकबुद्धी आणि आत्मा विकला आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

इम्रान खान यांनी आपल्या मुलाशी, कासिमशी बोलताना सांगितले की, पाकिस्तानमधील न्यायाधीश आता स्वतंत्र राहिलेले



नाहीत. त्यांच्या मते, न्यायदान करण्याऐवजी न्यायाधीश केवळ तारखांवर तारखा देत आहेत आणि जाणूनबुजून प्रकरणांना विलंब लावत आहेत. इम्रान खान यांच्या मते, न्यायाधीशांनी त्यांच्या विशेषाधिकारांसाठी सत्याची साथ सोडली आहे. त्यांनी अत्यंत भावनिक होऊन म्हटले की, ''या लोकांना लाज वाटली पाहिजे, पण हरकत नाही, अल्लाहच्या घरात सर्वांना न्याय मिळेल.''

पाकिस्तानच्या इतिहासात एखाद्या माजी पंतप्रधानाने थेट न्यायमूर्तींवर अशा प्रकारे जाहीर टीका करण्याची ही दुर्मिळ घटना मानली जात आहे.

इम्रान खान केवळ स्वतःच्या अटकेमुळे चिंतेत नाहीत, तर त्यांच्या पत्नी बुशरा बीबी यांच्यासोबत होणाऱ्या वागणुकीमुळे ते अधिक संतप्त आहेत. खान यांनी आरोप केला की, ''मला मोडणे सरकारला शक्य नाही, म्हणून ते माझ्या पत्नीचा वापर करून मला ब्लॅकमेल करत आहेत.'' बुशरा बीबी यांना एकांतात ठेवले जात असून त्यांना अमानुष वागणूक दिली जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. स्त्रिया आणि वृद्धांना त्रास देणे हे इस्लामच्या तत्त्वांविरुद्ध असल्याचे सांगत त्यांनी पाकिस्तानी लष्कर आणि सरकारला आरसा दाखवला आहे.


# अमेरिकेत शटडाउनने उडाली धांदल

न्यूयॉर्क : दि.२३ वृत्तसंस्था

जगाची महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राजकारणात सध्या एकामागून एक धक्के बसत आहेत. इराणसोबत सुरू असलेल्या लष्करी तणावाच्या छायेतून बाहेर पडत नाही तोच, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशांतर्गत राजकारणात एक बॉम्ब टाकला आहे. आपल्या आवडत्या 'ट्रुथ सोशल' प्लॅटफॉर्मवरून त्यांनी चक्क आपल्याच देशातील दुसऱ्या मोठ्या राजकीय पक्षाला, म्हणजेच डेमोक्रॅटिक पक्षाला ''अमेरिकेचा सर्वात मोठा शत्रू'' ठरवले आहे. ट्रम्प यांच्या या विधानाने वॉशिंग्टनपासून ते न्यूयॉर्कपर्यंत राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये अत्यंत स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, ''इराणचे प्रकरण आता बाजूला ठेवा, आपला खरा शत्रू आपल्याच घरात आहे.'' त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाला 'कट्टर डावे' आणि 'अत्यंत अकार्यक्षम' संबोधले आहे. ट्रम्प यांच्या मते, इराणसारखी बाह्य संकटे अमेरिका सहज झेलू शकते, पण देशातील अंतर्गत राजकीय गटबाजी आणि डेमोक्रॅट्सचे धोरण अमेरिकेला आतून पोखरत आहे. परराष्ट्र धोरणापेक्षा आता देशांतर्गत राजकारणावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा अमेरिकन सरकार 'शटडाउन'च्या संकटातून जात आहे. गेल्या महिनाभरापासून अनेक सरकारी विभागांना निधी मिळालेला नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार रखडले असून सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. या शटडाउनला ट्रम्प डेमोक्रॅट्सना जबाबदार धरत आहेत, तर डेमोक्रॅट्स ट्रम्प यांच्या हट्टी धोरणांमुळे ही परिस्थिती ओढवल्याचा आरोप करत आहेत. ही कोंडी फुटण्याऐवजी ट्रम्प यांच्या ताज्या विधानामुळे ती अधिकच बिकट झाली आहे.



### अमेरिकन समाजात ध्रुवीकरणाची भीती

राजकीय तज्ज्ञांच्या मते, ट्रम्प यांचे हे वक्तव्य केवळ राजकीय नसून ते समर्थकांना चिथावणी देणारे ठरू शकते. आपल्या विरोधकांना 'देशाचे शत्रू' संबोधल्यामुळे कट्टर समर्थकांमध्ये संतापाची लाट निर्माण होऊ शकते, ज्यामुळे अमेरिकेत नागरी संघर्षासारखी परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. 'ट्रुथ सोशल'वर ट्रम्प यांचा असलेला मोठा प्रभाव पाहता, हे विधान आगामी निवडणुकांपर्यंत वातावरण अधिक भडकवणारे ठरेल.

यांच्या ताज्या विधानामुळे ती अधिकच बिकट झाली आहे.
ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा अमेरिकन सरकार 'शटडाउन'च्या संकटातून जात आहे. गेल्या महिनाभरापासून अनेक सरकारी विभागांना निधी मिळालेला नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार रखडले असून सामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. या शटडाउनला ट्रम्प डेमोक्रॅट्सना जबाबदार धरत आहेत, तर डेमोक्रॅट्स ट्रम्प यांच्या हट्टी धोरणांमुळे ही परिस्थिती ओढवल्याचा आरोप करत आहेत. ही कोंडी फुटण्याऐवजी ट्रम्प यांच्या ताज्या विधानामुळे ती अधिकच बिकट झाली आहे.

## अपघात

### कॅनडा एक्सप्रेसचे विमान ट्रकला धडकले, अनेक जण जखमी

# न्यूयॉर्कच्या ला गार्डिया विमानतळाच्या धावपट्टीवर मोठा अपघात

न्यूयॉर्क : दि.२३ वृत्तसंस्था

सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी न्यूयॉर्कमधील गजबजलेल्या ला गार्डिया विमानतळावर एका काळजाचा ठोका चुकवणाऱ्या अपघाताने संपूर्ण अमेरिका हादरली आहे. प्रवाशांनी भरलेले एअर कॅनडा एक्सप्रेसचे विमान धावपट्टीवर जात असताना जमिनीवरील एका मोठ्या ट्रकला धडकले. ही धडक इतकी भीषण होती की विमानाच्या मागच्या भागाचा अक्षरशः चुराडा झाला आहे. या अपघातात विमानातील प्रवासी आणि जमिनीवरील कर्मचारी जखमी झाले असून विमानतळावर एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एअर कॅनडा एक्सप्रेसचे हे विमान उड्डाण करण्याच्या तयारीत असताना किंवा टॅक्सीवे कडे जात असताना हा अपघात घडला. विमानतळावर उभ्या असलेल्या एका



अग्निशमन दलाच्या गाडीला किंवा तांत्रिक वाहनाला या विमानाने जोरात धडक दिली. धडक लागताच विमानात असलेल्या प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली. विमानाच्या शेपटीचा भाग या ट्रकखाली चिरडला गेल्याने विमानाचे नियंत्रण काही काळासाठी सुटले होते.

प्रवाशांचा आक्रोश आणि बचावकार्य

अपघातानंतर लगेचच ला गार्डिया विमानतळावर आपत्कालीन सायरन वाजू लागले. अग्निशमन दल आणि वैद्यकीय पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. विमानातून प्रवाशांना बाहेर काढताना मोठा गोंधळ उडाला होता. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अनेक जण गंभीर जखमी झाले असून त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये विमानाच्या तुटलेल्या भागांचे आणि घटनास्थळावर पसरलेल्या ढिगाऱ्याचे भयानक दृश्य पाहायला मिळत आहे.

या भीषण अपघाताची दखल घेत अमेरिकेच्या फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनने तातडीने मोठा निर्णय घेतला आहे. ला गार्डिया विमानतळावरील सर्व टेकऑफ आणि लँडिंग अनिश्चित काळासाठी थांबवण्यात आले आहेत. विमानतळाकडे येणारी इतर विमाने आता जवळच्या नेवार्क किंवा जेएफके विमानतळाकडे वळवण्यात येत आहेत. यामुळे हजारो प्रवाशांचे हाल होत असून विमानतळावर प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला की मानवी चुकीमुळे, याचा तपास आता सुरू झाला आहे. एअर ट्रॅफिक कंट्रोल आणि वैमानिक यांच्यातील संभाषणाची तपासणी केली जात आहे. विमानतळ प्रशासनाने या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. धावपट्टीवर विमानासमोर ट्रक अचानक कसा आला, हा आता सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### प्रवाशांच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह

जगातील सर्वात सुरक्षित मानल्या जाणाऱ्या विमानतळांपैकी एक असलेल्या ला गार्डियावर असा अपघात होणे ही धोक्याची घंटा आहे. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीच्या सुरक्षा नियमांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. सध्या बचावकार्य सुरू असून जखमींच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी सर्वजण प्रार्थना करत आहेत.

# इराणने मध्यरात्री केला इस्रायलवर हल्ला

नवी दिल्ली: दि.२३ वृत्तसंस्था

मध्य-पूर्वेतील संघर्ष आता अशा वळणावर पोहोचला आहे जिथून मागे फिरणे अशक्य दिसत आहे. सोमवारी मध्यरात्रीनंतर जेव्हा संपूर्ण जग झोपेत होते, तेव्हा इस्रायल, जेरुसलेम आणि वेस्ट बँकच्या आकाशात अचानक प्रखर प्रकाश दिसू लागला. हे चांदणे नव्हते, तर इराणने डागलेली मृत्यूदूत क्षेपणास्त्रे होती. इराणने यावेळी साध्या क्षेपणास्त्रांचा नाही, तर अत्यंत घातक मानल्या जाणाऱ्या 'क्लस्टर वॉरहेड्स'चा वापर केला आहे. या हल्ल्याने संपूर्ण मध्य-पूर्व प्रदेशात घबराट पसरली असून जागतिक शांतता धोक्यात आली आहे.

क्लस्टर क्षेपणास्त्रे ही सामान्य क्षेपणास्त्रांपेक्षा कित्येक पटीने जास्त विनाशकारी असतात. ही क्षेपणास्त्रे हवेतच फुटतात आणि त्यातून शेकडो लहान बॉम्ब बाहेर पडतात. हे लहान बॉम्ब एका मोठ्या परिसरात पसरतात आणि एकाच वेळी विस्तीर्ण भूभागावर विध्वंस घडवून आणतात. जेरुसलेम आणि वेस्ट बँकसारख्या दाट लोकवस्तीच्या भागात अशा शस्त्रांचा वापर करणे म्हणजे थेट नरसंहाराला निमंत्रण देणे होय. या हल्ल्यामुळे अनेक निवासी इमारतींचे नुकसान झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हल्ल्याचा इशारा देणारे सायरन रविवार सकाळपासूनच इस्रायलभर वाजत होते, पण मध्यरात्री झालेल्या हल्ल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली. जेरुसलेममधील लाखो नागरिकांना आपले घर सोडून तात्काळ बंकरमध्ये धाव घ्यावी लागली. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना रात्रभर मृत्यूच्या छायेखाली राहावे लागले. अराद आणि दिमोना या भागांतही मोठे स्फोट झाले असून, इस्रायलच्या 'आयर्न डोम' यंत्रणेने अनेक क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली असली तरी, क्लस्टर बॉम्बच्या काही तुकड्यांनी जमिनीवर पडताच विनाश घडवला आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## अमेरिकेची ही मोहक मरगळ

सर्वप्रथम भारत सरकारचे अभिनंदन. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरीपणाचा पुरेसा अनुभव घेतल्यानंतर आणि इराण-इस्रायल युद्धात ते स्वत:चे कसे हसे करून घेत आहेत हे पाहिल्यानंतर भारत सरकारने अमेरिकेशी होत असलेला व्यापार करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला हे उत्तम झाले. मनाच्या वेगवेगळ्या अवस्थेत एखादा मद्यपी वेगवेगळे बोलतो तसे काही ट्रम्प यांचे झाले असावे. आधीच त्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने आयातशुल्काच्या मुद्द्यावर ट्रम्प यांस चांगलीच चपराक लगावली. तिचे वळ दिसू नयेत म्हणून ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारक नेतान्याहू यांना साथ दिली आणि इराणविरोधात अकारण युद्ध सुरू केले. तसे केले तर केले; पण ते थांबवायचे कोणत्या मुद्द्यावर हे त्यांनाच माहीत नाही. आता हे अध्यक्ष महाशय म्हणतात इराणकडून ओमान, सौदी, दुबई, कतार, इराक यांना लक्ष्य केले जाईल असे वाटले नव्हते. इराणच्या ताकदीचा अंदाज यायला जगातील एकमेव महासत्तेच्या या प्रमुखास दोन आठवडे आणि हजारोंचा जीव घ्यावा लागला. जागतिक अर्थव्यवस्था, स्थैर्य आदींच्या गळ्यास नख लावल्यानंतर आता इतर देशांनी मदतीस यावे अशी हाक ते देतात. अशा वेळी भारताने धैर्य दाखवले आणि ''एकदा काय ते आयातशुल्काचे ठरवा; मग व्यापार करार करू'', अशी भूमिका घेतली. हे शहाणपण निश्चितच अभिनंदनीय.आपल्या देशाच्या अंगावरील महासत्तापदाची वस्त्रे पुरती फेडून त्या देशाच्या इभ्रतीस पुरते नागवे केल्याखेरीज अध्यक्ष ट्रम्प शांत बसणार नाहीत; असे दिसते. ही अवदसा ओढवून घेणे हे पाप अमेरिकनांचे. त्यात आपला काही वाटा नाही. आपला त्या आधी गेल्या निवडणुकीत 'अगली बार'चा अगोचरपणा करून झाला. पण त्या वेळी ट्रम्प यांना अमेरिकेने दूर ठेवले. या वेळी आपण तसे काही केले नाही. असे असताना या देशाचा आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे अध्यक्ष ट्रम्प यांच्या लहरीपणाचा किती दबाव आपण घ्यायचा हा प्रश्न होता. त्याचे उत्तर मिळत नसल्याने आपल्या व्यापार-उदिमाचा जीव टांगणीस लागणे साहजिक. आधी रशियाकडून आपण तेल खरेदी करतो म्हणून ट्रम्प यांनी ५० टक्के आयातशुल्काचा बडगा आपल्यावर उगारण्यास कमी केले नाही. आपल्या पंतप्रधानांशी त्यांची कथित दोस्ती या कामी आली नाही. हे ५० टक्के आयातशुल्क अमेरिकेच्याच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केल्यानंतर ट्रम्प जमिनीवर आले आणि आयातशुल्क १० टक्क्यांवर घसरले. तरी ट्रम्प बधले नाहीत. ते त्यांनी १५ टक्क्यांवर नेण्याचा निर्णय घेतला. या सगळ्यात आपला व्यापार करार लटकला तो लटकलाच. आर्थिक करार-मदारांसाठी एक निश्चित आणि स्पष्ट धोरण दिशा असावी लागते. ट्रम्प यांच्याबाबत नेमकी तीच बोंब. आजचे उद्याला राहत नाही आणि उद्याचे परवास; अशी स्थिती. अशा परिस्थितीत निश्चित एका कराराने आपल्या देशातील उद्योगांस बांधून ठेवणे धोक्याचे होते. अमेरिकेशी होणारा हा करार स्थगित करून आपण तो टाळला. कररचनेविषयी भूमिका स्पष्ट करा; मगच व्यापार करार करू ही आपली भूमिका अत्यंत योग्य. मलेशिया, युरोपीय देश आदींनीही अमेरिकेसंदर्भात अशीच भूमिका घेतली.तसेच यापेक्षा अधिक कौतुकास पात्र ठरतात ती युरोपीय राष्ट्रे. त्यांनी ट्रम्प यांची मदतीची याचना नुसतीच धुडकावून लावली असे नाही. तर त्यानंतर अमेरिकेस 'तुमचे तुम्ही पाहून घ्या', असेही बजावण्यास कमी केले नाही. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि एवढेच नव्हे तर 'उजव्या विचारांच्या' आणि म्हणून ट्रम्प यांस जवळच्या गणल्या जाणाऱ्या इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही ट्रम्प यांच्या हाती हात देण्यास नकार दिला. होर्मुझची सामुद्रधुनी जलवाहतुकीसाठी मुक्त ठेवायची असेल तर युरोपीय देशांनी अमेरिकेस मदत करायला हवी, नपेक्षा 'नेटो' (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) या संघटनेचे काही खरे नाही, असा इशारा ट्रम्प यांनी दिला. तो युरोपीय देशांनी साफ धुडकावला. वास्तविक एके काळी अमेरिका आणि युरोपीय देश या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारखे होते. पण ट्रम्प यांनी आपल्या कृत्यांनी 'नेटो'स दुखावले. रशिया-युक्रेन युद्धात त्यांनी पहिल्यांदा 'नेटो'चा हात सोडला आणि ही संघटना जणू अमेरिकेमुळेच चालत असल्यासारखी फुशारकी मारली. ती आता त्यांच्या अंगाशी येताना दिसते. ''युद्ध सुरू करताना ट्रम्प यांनी आम्हाला त्याची कल्पनाही दिली नाही. त्याबाबत आमची मते काय हे जाणून घ्यायची गरज कधी त्यांना वाटली नाही. असे असताना आता ते अडचणीत येत असताना आम्ही सक्रिय मदत करावी अशी अपेक्षा करतात. ती कशी काय पूर्ण करणार?'', असा सूर या युरोपीय नेत्यांनी ट्रम्प यांच्या मदत-मागणीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना लावला. तो खचितच उत्साहवर्धक म्हणायला हवा. ''इराणची तत्कालीन राजवट जाणे गरजेचे होते हे खरे. पण म्हणून बाहेरून बॉम्ब फेकून त्यांना नामशेष करणे हा मार्ग असूच शकत नाही. इतिहासात असे प्रयत्न अयशस्वी ठरल्याचे अनेक दाखले आहेत'', असे स्पष्ट मत ट्रम्प यांच्या उद्योगावर जर्मनीचे फ्रेडरिक मर्झ यांनी जाहीरपणे व्यक्त केले. इंग्लंडचे पंतप्रधान किएर स्टार्मर यांनीही अशीच भूमिका व्यक्त केली आणि सुरू असलेल्या युद्धात आम्ही उगाच पडणार नाही, असे जाहीर केले. 'हे युद्ध आमचे नाहीच', अशी स्पष्ट भूमिका युरोपने या संदर्भात घेणे हे दोन अर्थाने महत्त्वाचे.एक म्हणजे हे युरोप हा अमेरिकेच्या सावलीतून बाहेर येऊ पाहत असल्याचे हे लक्षण. गेली काही वर्षे अमेरिका आणि युरोप यांत विविध मुद्द्यांवर संघर्ष होत असून आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर अमेरिका कायम युरोपचा आवाज बंद करण्यात यशस्वी ठरली आहे. त्यात पंचाईत अशी की अलीकडे विविध दुकाने 'एकावर एक' मोफतची शक्कल आपल्या उत्पादन विक्रीसाठी करतात. अमेरिकेचे तसे आहे. अमेरिकेस डोक्यावर घेतले की पाठोपाठ एकावर एक मोफत इस्रायलही डोक्यावर येऊन बसतो. गावातील एखाद्या श्रीमंताचे मस्तवाल कारटे गावभर उच्छाद ठरावे आणि कोणालाच काही बोलता येऊ नये, तसे इस्रायलचे झाले आहे. अमेरिकेच्या धाकापोटी अनेकांस इस्रायलला सहन करावे लागते. विशेषत: त्या देशाचे पंतप्रधान नरसंहारक नेतान्याहू यांच्या गाझा पट्ट्यातील नृशंस कारवाया युरोपला मंजूर नाहीत. तशा प्रकारची भावना त्या देशांनी व्यक्त केली. पण अमेरिकेच्या दबावामुळे इस्रायलची पापे कायम झाकली गेली. हे अमेरिकेचे भूत युरोपने आपल्या डोक्यावरून यशस्वीपणे उतरवले तर इस्रायलच्या नतद्रष्ट उद्योगांस काही प्रमाणात निश्चित खीळ बसेल. तेव्हा अमेरिकेचा पांगुळगाडा दूर करत युरोप खंड स्वत:च्या पायावर उभा राहत असेल तर ती घटना सर्वार्थाने स्वागतार्ह. दुसरा मुद्दा त्या प्रमाणात अमेरिकेचे महत्त्व कमी होत जाणे; हा. मूल्याधारित, लोकशाहीवादी अमेरिका हा जगाचा आधार होता. अमेरिकेच्या शासकीय पापांविरोधात त्याच देशात बोंब ठोकायची सोय आहे, हे त्या देशाचे सर्वात मोठे बलस्थान. ट्रम्प तेच खिळखिळे करू पाहतात. आताही इराणविरोधी युद्धात अमेरिकेच्या कोंडीचे वृत्तांकन करणाऱ्या माध्यमांवर ट्रम्प आगपाखड करताना दिसतात. त्यांचे संरक्षणमंत्री पीट हेगसेथ यांनी तर पुढे जाऊन माध्यमांत देशप्रेम हवे, अशी भावना व्यक्त करत अमेरिकी माध्यमे जणू देशद्रोही असल्याचे सूचित केले. हे सारे अखेर त्यांच्यावर उलटेल. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' अशी 'मागा'स हाकाटी देणाऱ्यांच्या डोळ्यादेखत महासत्ता मरगळणार असे दिसते. विद्यमान नेतृत्वाखालील अमेरिकेची ही मरगळ मोहक असेल.

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अहंकार येता
बुद्धी होते भ्रष्ट ।
क्षणातच नष्ट
ख्याती होई ॥

अहंकार असे
खेकड्या सारखा ।
ओढतो सारखा
मागे मागे ॥

गीता बायबल
वा वाचा कुराण ।
व्यर्थ जाते ज्ञान
अहं येता ॥

अहंकार येता
बुद्धी होते भ्रष्ट ।
क्षणातच नष्ट
ख्याती होई ॥

# तारीख पे तारीख ला लगाम!



### विचारमंथन

डॉ. विनोद गायकवाड
मो. ९८५०३२४२०२

काही देशांमध्ये घटल्याच्या तीव्रतेनुसार सुनावणीकरिता वेळेची मर्यादा घालून दिली जाते. मात्र भारतात तसे नाही. न्यायालयाने छोट्या-छोट्या कारणांवरून पुढील तारीख दिल्याचे अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे न्यायास विलंब होतो आहे. अनेक खटल्यांमध्ये तर याचिकाकर्त्यांच्या मृत्यूनंतर निर्णय आले आहेत. भारताच्या संविधानाने स्वतंत्र न्यायपालिका स्वीकारली असली तरी न्यायदान प्रक्रियेत ज्या काही त्रुटी आहेत त्यापैकीच एक म्हणजे तारीख पे तारीख होय.

वारंवार सुनावणी पुढे ढकलल्याने न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निर्णय घेतला. नवीन परिपत्रकानुसार सुनावणी पुढे ढकलण्याचे नियम अधिक कडक करण्यात आले आहेत. त्यानुसार वेगवेगळ्या प्रकरणांच्या स्वरूपाप्रमाणे स्वतंत्र आणि कठोर नियमावली निश्चित करण्यात आली. नियमित प्रकरणांमध्ये आता कोणतीही सबब स्वीकारली जाणार नाही. एकदा प्रकरण सुनावणीसाठी सूचीबद्ध झाले की त्यावर विना विलंब सुनावणी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. जर सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी करावयाची असल्यास यापूर्वी किती वेळा सुनावणीची मदतवाढ घेतली आहे, याबाबतची संख्याही अर्जात नमूद करावी लागणार आहे.

नवीन नियमानुसार जर एखाद्या पक्षाला सुनावणी पुढे ढकलायची असेल तर दुसऱ्या पक्षाला सुनावणीच्या अगोदरच्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत कळविणे आणि त्याचा पुरावा देणे आवश्यक आहे. दुसऱ्या पक्षाला ईमेल द्वारे आपला आक्षेप नोंदवता येईल, जो थेट न्यायालयासमोर मांडला जाईल. नवीन प्रकरणांमध्ये सुनावणी पुढे ढकलण्याचा अर्ज फक्त एकदा करता येईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत सलग दोनदा सुनावणी तहकूब करण्यास मनाई करण्यात आली आहे. एकूणच केवळ अत्यंत तातडीच्या परिस्थितीतच सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याची विनंती मान्य केली जाणार आहे. या नवीन नियमामुळे न्यायालयाने २९ नोव्हेंबर २०२५ आणि २ डिसेंबर २०२५ रोजी घेतलेले निर्णय रद्द केले आहेत.

शहाण्या माणसाने न्यायालयाची पायरी चढू नये असे म्हटले जाते. त्याचे कारण म्हणजे न्यायास विलंब लागणे होय. वेळेत न्याय मिळत नाही. २० ते ३० वर्षे खटला चालल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे न्यायालयांमध्ये कोट्यावधी खटले प्रलंबित आहेत. व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ न्यायालयाच्या पायऱ्या झिजवण्यात जातो. म्हणूनच न्यायला होणारा उशीर हा न्याय नाकारण्यासारखा आहे असे म्हटले जाते. वारंवार मिळणाऱ्या तारखांमुळे मनुष्य त्रस्त होतो. प्रत्येक तारखेला न्याय मिळेल अशा अपेक्षेने तो न्यायालयात जातो. मात्र पदरात पडते ती तारीख. खेळ रंगतो तो तारीख पे तारीख चा. म्हणूनच न्याय वेळेच्या आणि पैशाच्या दृष्टीने महागडा झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दिवाणी व फौजदारी खटल्यांचे स्वरूप वेगवेगळे असते. दोन व्यक्तीमधील खटल्यांमध्ये वकिलांची संख्या निश्चित नसते. साधारणपणे एक किंवा दोन वकील पुरेसे असले तरी आपल्या क्षमतेनुसार वरिष्ठ वकील नियुक्त करू शकतो. आपण वकील न लावताही स्वतःचा खटला स्वतः चालू शकतो. कर्मचारी विरुद्ध संस्था किंवा सरकार असेल तर मात्र वकिलांच्या संखेत वाढ होते. अशा खटल्यात साधारणपणे तीन ते पाच वकील असतात. तसेच आपल्या गरजेनुसार वरिष्ठ वकिलाची नियुक्ती करू शकतो.

मायबाप सरकारच्या धोरणात्मक निर्णयांमुळे नागरिकांवर अन्याय होऊ शकतो अशी भीती घटना समितीला असल्याने संविधानाच्या पाचव्या व सहाव्या भागात कलम १२४ ते १४६ तसेच कलम २१४ ते २३७ मध्ये न्यायदान व्यवस्थेची तरतूद केली आहे. सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय आहे असे संविधानाच्या कलम १२९ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय भारतातील सर्व न्यायालयात प्रमाणभूत मानले जातात. त्याबाबत कोणतीही शंका उपस्थित केली जात नाही. तरीही अनेक प्रकरणांमध्ये सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने निर्देशित केल्यानंतरही केंद्र आणि राज्य सरकार त्याची अंमलबजावणी करतांना दिसत नाही. सरकारच्या हिताच्या निर्णयांची अंमलबजावणी त्वरित केली जाते, मात्र जनतेच्या हिताच्या निर्णयांची अंमलबजावणी अनेक प्रकरणांमध्ये होतांना दिसत नाही. म्हणूनच एकाच विषयाबाबत अनेक खटले न्यायालयात दाखल केले जातात. परिणामी खटल्यांची संख्या वाढते आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने एका खटल्यात दिलेला निर्णय फक्त याचिकाकर्त्यांपुरता मर्यादित बनतो. त्याबाबत सरकारने धोरणात्मक निर्णय घेतल्यास तो इतरांनाही लागू करता येऊ शकतो, मात्र सरकार त्याकडे डोळेझाक करते. परिणामी न्यायालयाच्या त्या आदेशाचा आधार घेऊन दुसरा व्यक्ती किंवा कर्मचारीही न्यायालयात जातो. अति महत्त्वाचे खटले प्राधान्याने काढण्याचा निर्णय न्यायालय घेत असले तरीही खटल्यांची संख्या अफाट आहे. जोपर्यंत खटल्यांची संख्या कमी होणार नाही तोपर्यंत त्वरित निर्णयाची अपेक्षा करू शकत नाही.

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेत. अनेक निर्णयांमध्ये संसदेने आपली चौकट ओलांडल्याचेही निर्देशित केले. संसदेला संविधानाच्या मूळ गाभ्यात विशोधन करण्याचा अधिकार नाही अशी महत्त्वपूर्ण भूमिका सर्वोच्च न्यायालयाने १९७३ मध्ये घेतली होती. जेव्हा एखादे न्यायालय संविधानातील कायद्यांना बदलत्या परिस्थितीत सातत्य देण्याचा प्रयत्न करते तेव्हा न्यायालयीन सक्रियतेचा प्रत्यय येतो. समाजातील सर्व सामान्य जनतेच्या हक्काची व्याप्ती वाढते तेव्हा न्यायालयाला सक्रिय व्हावे लागते. त्याचाच एक भाग म्हणून न्यायालयाने ''तारीख पे तारीख ला लगाम लावण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे प्रलंबित खटले लवकर निकाली निघून जनतेस न्याय मिळेल अशी अपेक्षा करूया!



# ओबीसी जनगणना, नियम आणि सवलतीसाठी भारत मुक्ति मोर्चाचा राष्ट्रव्यापी लढा



### चर्चा

संजय भा. देशमुख
मो. 8888872784

देशात सामाजिक न्याय, समानता आणि संविधानिक हक्क या मूल्यांवर आधारित व्यवस्था उभारण्याचा सातत्याने प्रयत्न होत असला, तरी प्रत्यक्षात अनेक स्तरांवर मागासवर्गीय, विशेषतः ओबीसी समाजाला न्याय मिळण्यात अडचणी येत असल्याचे चित्र समोर येत आहे. म्हणून विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी वेळोवेळी संसदेत जातीनिहाय जनगणनेची मागणी केली होती.यानंतर मोदी सरकारने जतीनिहाय जनगणना करने सुरु केले आहे. पण ही जातीनिहाय जनगणना करताना जातीनिहाय जनगणनेच्या तकत्यात कॉलम करताना हेराफेरी केल्याचे दिसत आहे.या पार्श्वभूमीवर भारत मुक्ति मोर्चा आणि राष्ट्रीय पिछड़ा वर्ग मोर्चा वामन मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली देशभरात राष्ट्रव्यापी चरणबद्ध आंदोलन छेडण्यात आले आहे. या आंदोलनात ओबीसी जनगणना, शिक्षणातील भेदभावाविरोधात कठोर नियमांची अंमलबजावणी आणि २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना मधून सवलत या प्रमुख मागण्या पुढे करण्यात आल्या आहेत.

**ओबीसी जनगणना : वास्तव समोर आणण्याची गरज**

भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग ओबीसी समाजाचा आहे. मात्र, या समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक आणि आर्थिक स्थिती याबाबत आजही स्पष्ट व अद्ययावत माहिती उपलब्ध नाही.

केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्याचे जाहीर केले असले, तरी प्रत्यक्ष अधिसूचनेत ओबीसीसाठी स्वतंत्र कॉलम न दिल्याचा आरोप वामन मेश्रामसह आंदोलनकर्त्यांनी केला आहे. जनगणनेच्या प्रक्रियेत 'हाउस लिस्टिंग' टप्प्यात केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याबाबत प्रश्न विचारले जातात, तर ओबीसी समाजाला 'इतर' या वर्गात टाकले जाते. यामुळे ओबीसींची अचूक माहिती मिळणार नाही. परिणामी, आरक्षण, शैक्षणिक संधी आणि नोकरीतील प्रतिनिधित्व या बाबतीत धोरणे तयार करताना अडचणी निर्माण होतील. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत सर्व जातींची अचूक आणि पारदर्शक जनगणना होत नाही, तोपर्यंत सामाजिक न्यायाची संकल्पना अपूर्णच राहील. त्यामुळे आगामी जनगणनेत ओबीसीसाठी स्वतंत्र नोंदणी आणि कॉलम देण्याची मागणी जोर धरत आहे.

**शिक्षण क्षेत्रातील भेदभाव आणि नियमांची गरज:-** उच्च शिक्षण क्षेत्रातही जातीय भेदभावाचे प्रमाण चिंताजनक असल्याचे आकडे सांगतात.

(विद्यापीठ अनुदान आयोग) च्या माहितीनुसार, गेल्या काही वर्षांत अशा तक्रारींमध्ये सुमारे ११८% वाढ झाली आहे.

२०१९-२० मध्ये १७३ तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या, तर २०२३-२४ मध्ये हा आकडा वाढून ३७८ पर्यंत पोहोचला आहे. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, उच्च शिक्षण संस्थांमध्ये अजूनही समतेचा अभाव आहे. विशेषतः एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांना भेदभावाचा सामना करावा लागत आहे. काही गंभीर घटनांमध्ये विद्यार्थ्यांवर मानसिक ताण निर्माण होऊन त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची उदाहरणेही समोर आली आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयानेही भेदभाव रोखण्यासाठी कठोर नियम लागू करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, आंदोलनकर्त्यांच्या मते, सरकारकडून या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे , आणि विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी कठोर नियम त्वरित लागू करावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.

**२०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना मधून सवलत :-** शिक्षण क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षक पात्रता परीक्षा.

२००९ च्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत ही शिक्षकांसाठी आवश्यक पात्रता ठरवण्यात आली. मात्र, २०११ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना सुरुवातीला या परीक्षेतून सवलत देण्यात आली होती. अनेक शिक्षकांनी २०-३० वर्षे प्रामाणिकपणे सेवा दिली असून, त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले आहे. अशा शिक्षकांना आता उत्तीर्ण न झाल्याच्या कारणावरून सेवेतून वगळणे अन्यायकारक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे मत आहे. अश्या शिक्षकांचे असेही म्हणणे आहे की, उत्तीर्ण झालेले सर्वच शिक्षक गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात असे नाही, आणि न दिलेल्या शिक्षकांनीही उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. त्यामुळे केवळ परीक्षेच्या आधारे शिक्षकांचे मूल्यमापन करणे योग्य नाही. म्हणूनच २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना मधून कायमस्वरूपी सवलत देण्याची मागणी करण्यात येत आहे.

**राष्ट्रव्यापी आंदोलनाची रूपरेषा** या सर्व मागण्यांसाठी देशभरात टप्प्याटप्प्याने आंदोलन राबवण्यात येत आहे.

# कर्जमाफीने शेतकऱ्याचे केले तीन तुकडे!



### कृषी जगत

अशोक वानखेडे
मो. 9403493100



सत्ताप्राप्ती की विरोधका च्या आंदोलनाचा विजय या राजकीय गोंधळात शेतकऱ्याचे कर्जमाफीने तीन तुकडे करण्यात आले दोन तुकडे सत्ताधाऱ्याने शोधले पण तिसरा तुकडा सत्ताधाऱ्याच्या किंवा विरोधक आंदोलकाच्या हाताला लागला नाही. कोणत्याही क्षेत्रात कर्ज काढणे व ते वेळेवर फेडणे हे अर्थशास्त्राचे गणित सोडवताना शेती विषयाचे कर्जफेड चे सूत्र अजून कोणाच्याच निश्चितपणे हाती लागलेले दिसत नाही. कर्ज काढून नियमित कर्ज फेडणारा शेतकऱ्याच्या तुकड्याला ५० हजारात तर कर्ज काढून शेतीवरच्या संकटाला तोंड देण्यास अयशस्वी झालेल्या कर्जबाजारी थकबाकीदार शेतकऱ्याचा या दुसऱ्या तुकड्याला दोन लाखापर्यंत कर्जमाफी, अजून कोणाच्याच नजरेत न आलेल्या तिसरा तुकडा म्हणजे मागील १० ते १५ वर्षापासून कोणतेही शासकीय नियम शासकीय कर्ज न काढता शेतीत अनुभव,कष्ट,जिद्द,निष्ठा या चारसूत्री गणिताच्या आधारे आपल्या खात्यात पैसे जमा करणाऱ्या शेतकरी अर्थात कर्ज न काढता निष्ठेने शेती करणारा शेतकऱ्याचा हा तिसरा तुकडा कोणाच्याच हातात लागला नाही. याच शेतकऱ्याच्या तुकड्यावर सदा सदा अन्याय होतो आहे. याची आठवण जाण ना सत्ताधाऱ्याला आली, ना विरोधकाला, आंदोलकाला, ना कृषी अभ्यासकाला, ह्याप्रसंगी कृषिप्रधान देशातला खरा तमाशा आता ग्रामीणरंगमंचावर रंग धरू लागला आहे.

या साऱ्या कर्जमाफीच्या गोंधळात कर्ज न काढता शेती करणाऱ्या शेतकऱ्यावर खरंच अन्याय होतो आहे का? की मुद्दाम अशा शेतकऱ्यांची कोणाला आठवण नाही किंवा अशा निष्ठेच्या शेतकऱ्याची शासन दरबारी कुठेच नोंद नाही या गोष्टीची खरच मोठ्या मोठ्या कृषी धोरणाच्या गप्पा गोष्टी करताना अशा शेतकऱ्यांचा विसर होतो आहे हे खरोखर सत्ताधारी विरोधक व आंदोलकाला लाजवणारी बाब आहे. या धोरणाचा विचार मंथन करण्याची विचारसरणीचे प्रमाण किती प्रमाणात आहे हे आता समोर आलेले दिसते. ह्याविषयी कोण्याच आंदोलकाला विरोधकाला किंवा कृषी अभ्यासकाने या अशा शेतकऱ्याची कुठेच आठवण केलेली दिसत नाही.

या तीनही विभागलेल्या शेतकऱ्याच्या काबाडकष्टावर संपूर्ण समाजाचे, नैसर्गिक पशु पक्षाचे जीवन अवलंबून असते. मात्र वास्तव असे आहे की राजकारण हेतू पुरस्कार किंवा विसरभोळा स्वार्थी स्वभाव म्हणा अलीकडील या कर्जमाफी धोरणामुळे ग्रामीण भागात एक आगळीवेगळी चर्चा जोर धरत आहे. कर्ज न फेडणाऱ्या शेतकऱ्याला दोन लाख रुपये आणि नियमित कर्ज फेडणारे शेतकऱ्याला केवळ ५०००० तर कर्ज न काढता शेती करून बँकेत टाकून सरकारच्या स्वाधीन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातात भोपळा या विसंगतीमुळे अनेक प्रामाणिक शेतकऱ्यांच्या मनात अंतकरणातून नाराजी आणि शेती न करण्याची मानसिकता समोर येते. दरवर्षी वेळेवर कर्ज भरणारा शेतकरी त्याला किती फायदा मिळतो? कर्ज थकवणाऱ्याला मोठा आर्थिक लाभ मिळत आहे. यातून असे स्पष्ट होते की प्रामाणिकपणाला शिक्षा थकबाकीला बक्षीस मिळते पण कर्ज न काढता शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या कमरेत लाथा बसतात? असे चित्र या कर्जबाजारी माफी गोंधळात रंग धरतो आहे.

बँका आणि सरकारी संस्थांची कर्ज वाटप व्यवस्था ही शिस्तीवर व समान प्रमाणात आधारलेली असते. मग असे राजकारणी धोरण प्रत्येक बदलत्या सत्ताधाऱ्याने अवलंब केले तर त्याचा परिणाम केवळ शेतकऱ्यावरच नाही तर संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवर निश्चित होऊ शकते हे फक्त हे फक्त कर्ज न काढणाऱ्याच शेतकऱ्याने अभ्यासले असावे असे मला तरी स्पष्ट वाटते.

सत्ताप्राप्तीसाठी किंवा विरोधकाला विजय मिळाल्याचा आनंद दाखवण्यासाठी असेच कर्जमाफीचे धोरण भविष्यात मोठे स्वरूप धारण करीत राहिल्यास आर्थिक सर्व स्तरावरची आर्थिक शिस्त बिघडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. शेतकरी आधीच अनेक अडचणीशी सामना करीत आहे. मृगजळाप्रमाणे आशे पोटी व्याकुळ होऊन दिशा भुलून पिसाटलेल्या हरणाप्रमाणे कोणत्याही दिसेल त्या वाटेने धावत आहे.

अशा बिकटप्रसंगी जाणकार राजसत्तेकडून धोरणात्मक निर्णय प्रभावीपणे अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. शेतकऱ्याच्या कष्टात नाहून निघालेल्या त्याच्या भावना आणि वास्तव्य परिस्थितीचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. प्रामाणिकपणाला प्रोत्साहन देणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. तरच शेती व ग्रामीण व्यवस्था मजबूत राहील. यापुढे थकबाकी शेतकऱ्याला कर्जमाफीचा पर्यायी उपाय आणि कर्ज न काढता शेती करणाऱ्या शेतकऱ्याला मान सन्मानाचा मोठा आर्थिक आधार मिळाले पाहिजे भविष्यात राज्याची अर्थव्यवस्था शून्य राजकारण विना अवलंबली तरच भविष्यातील शेतकरी शेतीसाठी स्वाभिमानाने उभा राहून स्वतःच्या विकासाचा देश विकास सुद्धा करण्यास सामर्थ्यशाली बनेल ( क्रमशः )

# 'स्वप्नातले मन' या महानगरीय नाटकातील पर्यावरण

### समीक्षण

प्रा. वसंत लक्ष्मण पुंड

'स्वप्नातले मन' हे दिनेश काळे यांचे नाटक महानगरीय जीवनातील अंतर्विरोधांचे प्रभावी नाट्यरूप आहे. हे नाटक केवळ पती -- पत्नीमधील वैवाहिक वाद मांडत नाही, तर सुशिक्षित विचारवंत वर्गाच्या वैचारिक दांभिकतेवर, नैसर्गिक निर्णय टाळण्याच्या वृत्तीवर आणि आधुनिकतेच्या नावाखाली स्वीकारलेल्या कृत्रिम जीवनशैलीवर कठोर भाष्य करते. ''भरलेल्या जीवनातले अपूर्णत्व'' हा या नाटकाचा मुख्य आशय ठरतो.

आधुनिक मराठी नाटकांमध्ये मध्यमवर्गीय जीवनातील ताणतणाव, शहरीकरणामुळे निर्माण झालेले तुटलेपण, स्त्री-- पुरुष संबंध, कुटुंबसंस्था, जात-वर्ग संघर्ष यांचा व्यक्तीच्या मानसिकतेवर होणारा परिणाम दाखवला जातो. त्यामुळे पात्रांचे मानसिक संघर्ष हे फक्त वैयक्तिक न राहता ते समाजाचे प्रतिबिंब ठरतात. यामुळेच प्रेक्षकांना स्वतःच्या जीवनातील अनुभवांशी नाटक जोडलेले वाटते आणि सामाजिक वास्तवाचा नव्या दृष्टीने विचार करण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच असे म्हणता येते की आधुनिक मराठी नाटकाने माणसाच्या अंतर्मनातील संघर्षाला सामाजिक वास्तवाशी प्रभावीपणे जोडलेले आहे. दिनेश काळे यांचे 'स्वप्नातले मन' हे नाटक या विधानाचे प्रत्ययकारी उदाहरण देते. याठिकाणी वैयक्तिक मानसिक संघर्ष हा सामाजिक वास्तवाचा परिणाम म्हणूनच उभा राहतो. सदर नाटकाची कथा श्रीकांत आणि सविता या पती-पत्नीभोवती केंद्रित आहे. श्रीकांत हे पात्र उच्चशिक्षित प्राध्यापक, संशोधक आणि विचारवंत आहे.

तो आयुष्यभर विचार, तर्क आणि बौद्धिक मूल्यांभोवती फिरतो. सविता ही भावनिक, संवेदनशील आणि मातृत्वाची आकांक्षा बाळगणारी महिला आहे. या दोघांमधील संघर्ष हा केवळ वैयक्तिक नसून तो वैचारिक, सामाजिक आणि नैतिक पातळीवर विस्तारतो. नाटकातील स्वप्न आणि वास्तव यांची सरमिसळ ही महानगरीय मानसिक पर्यावरणाचे प्रतीक आहे. श्रीकांत विचारांत गुरफटलेला आहे, तर सविता ही प्रत्यक्ष जगण्याची, अनुभव घेण्याची इच्छा व्यक्त करते. त्यामुळे नाटकात अंतर्मनातील संघर्ष ठळकपणे दिसतो श्रीकांतचे जीवन परिषद, परिसंवाद, वाचन आणि लेखनाने वेढलेले आहे. हेच बौद्धिक पर्यावरण त्याच्या कौटुंबिक जीवनावर आक्रमण करते आणि सविताच्या भावनिक गरजांकडे दुर्लक्ष होते. 'स्वप्नातले मन' या नाटकाचा गाभा म्हणजे जीवनात सर्व काही असूनही जीवन अपूर्ण राहणे. श्रीकांतकडे शिक्षण, नोकरी, प्रतिष्ठा आणि बौद्धिक समाधान आहे; परंतु पितृत्वाचा अनुभव नाही. सविताकडे संसार आहे; पण मातृत्व नाही. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन अपूर्ण ठरते. सविता स्पष्टपणे म्हणते, ''आपल्या दोघांचं आयुष्य अपुरं आहे. आपल्या आयुष्याला पूर्णत्व नाही.''. हा संवाद वैयक्तिक दुःख व्यक्त करण्यापलीकडे जाऊन महानगरीय जीवनशैलीवरील मूलभूत टीका ठरते. महानगरीय जीवनात 'सर्व काही मिळवण्याच्या' स्पर्धेत माणूस जीवनाचा अर्थच हरवून बसतो, हे या संवादातून स्पष्ट होते.

'स्वप्नातले मन' या शीर्षकातच नाटकाचे तत्त्वज्ञान समाविष्ट झालेले आहे. मनाचा अर्थ स्वाभाविक, भावनिक आणि नैसर्गिक प्रवृत्ती, तर विचाराचा अर्थ तर्कप्रधान, नियंत्रक आणि बौद्धिक शक्ती. श्रीकांतच्या जीवनात विचारांचे वर्चस्व आहे. त्याचे मन स्वतंत्र निर्णय घेत नाही. सविताचे वाक्य या द्वंद्वाचा अर्थ उलगडते, ''विचार नसते तर दुःखच नसतं.'' या संवादातून



अति-विचारसरणी माणसाला संवेदनाहीन बनवते आणि सहज जीवनानुभवांपासून दूर नेते, हे स्पष्ट होते. दिनेश काळे 'स्वप्नातले मन' या नाटकात विवाहसंस्थेला निसर्गधर्माशी जोडलेली संस्था मानतात. मात्र श्रीकांत स्वतःला विवाहाच्या वैचारिक चौकटीत अडकवतो. तो विवाह करतो, पण अपत्य नाकारतो. हा निर्णय सविताच्या इच्छेविरुद्ध आहे.

सविता श्रीकांतला ठणकावून सांगते, ''विवाह संस्था ही प्रजोत्पादनासाठी आहे हे एकमेव सत्य तुम्ही नाकारलंत.'' सध्या महानगरीय जीवनात 'मूल नको' हा निर्णय आधुनिकतेचे लक्षण मानले जाते; मात्र हे नाटक प्रश्न विचारते की हा निर्णय स्त्रीच्या भावनिक आणि जैविक इच्छांच्या किंमतीवर घेतला जातो का? सविताचे पात्र निसर्ग, सहजता आणि नैसर्गिक जीवनप्रवाहाचे प्रतीक आहे.

ती निसर्गाचा उल्लेख करून जीवनातील साधेपणाचे महत्त्व स्पष्ट करते. महानगरीय कृत्रिमतेच्या विरोधात उभा राहणारा हा आवाज नाटकाला तत्त्वज्ञानात्मक खोली देतो. भौतिक पर्यावरणासंदर्भात नाटकातील बरेच प्रसंग घराच्या चौकटीत घडतात. सदर घर सुरक्षित आश्रयस्थान न राहता मानसिक कोंडीचे प्रतीक बनते. घरातील खिडकी, खुर्ची, पुस्तके, फाइल्स हे सारे श्रीकांतच्या वैचारिक विश्वाचे संकेत आहेत. ''घरातलं वातावरण आतल्या आणि बाहेरच्या हवेमुळं नाही तर व्यक्तिमनातील विचारांमुळं नियंत्रित होत असतं.'' हा संवाद घराच्या पर्यावरणाचा खरा अर्थ स्पष्ट करतो. सदर नाटक प्रामुख्याने मानसिक पर्यावरणावर आधारलेले आहे. श्रीकांतच्या विचारांचा अतिरेक, त्याची बौद्धिक अहंता आणि वास्तवापासून तुटलेपण हे सवितासाठी वेदनादायक ठरते. सविता म्हणते, ''मी या घरात मोकळा श्वास घेऊ शकत नाही. तुमचे विचार मला पाणी नसलेल्या अंधाऱ्या विहिरीसारखे वाटतात.'' हा संवाद महानगरातील मानसिक कोंडीचे प्रभावी रूपक आहे. श्रीकांतचे पूर्ण जीवन विचारांभोवती केंद्रित आहे. त्याच्यासाठी माणसे ही विषयवस्तू बनतात. हा वैचारिक पर्यावरणाचा अतिरेक महानगरातील बौद्धिक वर्गाचे प्रतिनिधित्व करतो. ''माझ्या विचारांच्या कक्षेत तू विषयवस्तू आहेस.'' हा संवाद वैचारिक अमानवीकरण स्पष्ट करतो. सविता आणि श्रीकांत या दांपत्याचे नाते समानतेवर आधारलेले नाही. श्रीकांतचे विचार स्त्रीला दुय्यम स्थान देतात. स्त्रीचे मातृत्व नाकारणे, स्त्रीच्या भावनांकडे दुर्लक्ष करणे, हे सारे महानगरीय पुरुषप्रधान मानसिकतेचे उदाहरण आहे. ''तुमच्या विचारांनी माझ्या सुखी मनाचा कोपरा रिकामा करून टाकलाय.'' हा संवाद स्त्रीच्या भावनिक शोषणाचे प्रतीक आहे. नाटकात सविता वारंवार निसर्गाचे उदाहरण देते. झाडे, सूर्य, ऋतू हे नैसर्गिक पर्यावरण तिच्या सहज जगण्याच्या इच्छेचे प्रतीक आहे. श्रीकांतचे पर्यावरण मात्र बौद्धिक, कृत्रिम आणि कोरडे आहे. ''निसर्गाकडं बघितल्यावर जगावंसं वाटतं पण तुमचं जीवन कृत्रिम आहे.'' दिनेश काळे यांचे स्वप्नातले मन हे नाटक महानगरीय पर्यावरणाचे सखोल स्पष्टीकरण करणारे आहे. या नाटकात पर्यावरण ही संकल्पना बहुआयामी स्वरूपात प्रकट होते. घर, मन, विचार, नाते आणि समाज या सर्व स्तरांवर पर्यावरण ही संकल्पना दिसते. सविताची तडफड ही फक्त तिची एकटीची नसून महानगरातील असंख्य स्त्रियांची तडफड आहे, तर श्रीकांतचा वैचारिक अहंकार हा आधुनिक बौद्धिक वर्गाचं प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे स्वप्नातले मन हे नाटक फक्त कौटुंबिक नाटक न राहता समकालीन समाजाचे प्रतिबिंब ठरतो. 'स्वप्नातले मन' हे नाटक महानगरातील सुशिक्षित वर्गाच्या मानसिक दुभंगाचे दर्शन घडवते. श्रीकांतचा विचारवंत असण्याचा अहंकार त्याला संवेदनाहीन बनवतो. सविता ही केवळ पत्नी नसून स्त्री म्हणून तिचे अस्तित्व नाकारले जाते. मातृत्वाचा प्रश्न हा केवळ जैविक नसून तो स्त्रीच्या ओळखीचा प्रश्न ठरतो. महानगरीय पर्यावरणात विचारांची अतिवृद्धी आणि भावनांची उपेक्षा यामुळे नातेसंबंध कोरडे होत जातात. नाटकातील स्वप्नरचना ही वास्तवापासून पळ काढणाऱ्या माणसाची मानसिक अवस्था सूचित करते. परिणामी, हे नाटक वैयक्तिक संघर्षातून सामाजिक भाष्य करते.

# जनतेच्या विश्वासाचा आधारवड कोसळला : दत्ता मेघे युगाचा अंत



विदर्भाच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अढळ ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाची बातमी ही केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची घटना नाही; ती एका युगाच्या अस्ताची वेदनादायी जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक जीवनात सातत्याने सक्रिय राहून लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषद अशा विविध सभागृहांतून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदृष्टीचा आणि समाजाशी नाळ जपणारा नेता गमावला आहे. दत्ता मेघे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. संसदीय व्यासपीठावर त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शासनव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले, तर तो सत्तेच्या मोहाचा नव्हे, तर समाजकारणाशी नाळ जोडणाऱ्या आणि विकासाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास होता.

विकासाच्या असमतोलाने दीर्घकाळ त्रस्त असलेल्या विदर्भासाठी दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ठाम आवाज होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्यांची कमतरता, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांची उणीव, या सगळ्या समस्यांकडे त्यांनी केवळ आकडेवारी म्हणून पाहिले नाही, तर त्या मागील मानवी वेदना समजून घेतल्या. म्हणूनच त्यांच्या भूमिकेत केवळ राजकीय आक्रमकता नव्हती, तर सामाजिक संवेदनशीलताही होती. राजकारणात त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा विकासाच्या समीकरणांना प्राधान्य दिले. पक्षीय समीकरणांच्या गुंतागुंतीतही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख जपली. त्यांची शैली आक्रमक असली, तरी ती केवळ विरोधासाठी नव्हती; ती रचनात्मक टीका आणि पर्यायी विचार मांडण्यासाठी होती. शासनाच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी ठोस उपायही सुचवले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरते. दत्ता मेघे यांच्या कार्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळावी आणि ते आत्मनिर्भर बनावेत, यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी उभे केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.



**प्रासंगिक**

**प्रविण बागडे**
नागपूर, मो. 9923620919

आज शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण चिंताजनक ठरत असताना, दत्ता मेघे यांनी शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. त्यांच्या संस्थांमधून घडणारे विद्यार्थी केवळ पदवीधर नाहीत, तर ते समाजाभिमुख नागरिक असतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे होते. वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील विषमता कमी व्हावी, संधींचे समान वितरण व्हावे, यासाठी त्यांनी कृतीशील भूमिका घेतली. त्यांच्या कार्यात घोषणाबाजीपेक्षा कृतीला अधिक महत्त्व होते आणि हीच बाब त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

आजच्या राजकारणात तात्कालिक फायद्यासाठी भूमिका बदलणारे, समाजाशी तुटलेले आणि केवळ सत्तेसाठी धडपडणारे नेतृत्व वाढताना दिसते. अशा काळात दत्ता मेघे यांसारख्या मूल्यनिष्ठ नेत्यांची उणीव अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यातील चढ-उतार स्वीकारले, पराभव पचवले; पण जनतेशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ होते. त्यांच्या निधनाने एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, आजच्या राजकारणात अशा प्रकारचे नेतृत्व घडवले जात आहे का? समाजाशी जोडलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले नेते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. निवडणुका जिंकणे हेच नेतृत्वाचे अंतिम मापदंड नसून, समाजावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवणे हेच खरे नेतृत्व आहे, हे दत्ता मेघे यांच्या कार्यातून अधोरेखित होते.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना, कार्यपद्धतीला आणि सामाजिक बांधिलकीला अनुसरून काम केले, तरच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. आज अनेकजण त्यांना शब्दांत श्रद्धांजली अर्पण करत आहेत; परंतु खरी श्रद्धांजली ही कृतीतूनच व्यक्त होते. समाजासाठी काम करण्याची जिद्द, शिक्षणाला दिलेले प्राधान्य आणि विकासासाठी घेतलेली ठाम भूमिका, या मूल्यांचा स्वीकार केला, तरच त्यांच्या कार्याला खरी सलामी दिली जाईल. दत्ता मेघे यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा जिवंत आदर्श आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य झोकून दिले, ती मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य अमर राहतात, दत्ता मेघे हे त्यापैकीच एक. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली.

## लग्नाला न बोलावल्याने नाराज असलेल्या चिमुकल्या चाहतीला घरी बोलावून भरवले जेवण



अलीकडे विजय देवरकोंडाच्या एका लहान चाहतीने लग्नाला न बोलावल्यामुळे नाराजी व्यक्त केली होती. विजयने त्या चाहतीला दिलेल्या वचनानुसार तिला घरी बोलावले आणि तिचे मनापासून स्वागत केले. त्यांनी आणि रश्मिकाने स्वतः तिला जेवण वाढले आणि तिला उचलून घरभर फिरवले. या दोघांनी पुन्हा एकदा चाहत्यांची मने जिंकली.

काही आठवड्यांपूर्वी त्या लहान चाहतीचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये ती विजयवर नाराज असल्याचे सांगत होती कारण तिला त्यांच्या लग्नात बोलावले नव्हते. हा व्हिडिओ पाहताच विजयने तिला उत्तर देत घरी येण्याचे निमंत्रण दिले होते. तसेच, तो आणि रश्मिका स्वतः तिच्यासाठी जेवण बनवून खाऊ घालतील असेही सांगितले होते. आणि त्यांनी आपले वचन पूर्ण केले.

अलीकडे विजय आणि रश्मिकाने त्या चाहतीला आपल्या घरी बोलावून तिचे छान स्वागत केले आणि स्वतः तिच्या ताटात जेवण वाढले. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. चाहते या दोघांचे कौतुक करत आहेत आणि म्हणत आहेत की याच कारणामुळे ''वीजू'' आणि ''रोशू'' सर्वांना इतके आवडतात.

या व्हिडिओमध्ये ती चाहती सांगते की ती विजयच्या घरी आली आहे. तेवढ्यात विजय तिला उचलून घरात घेऊन जातात आणि जेवणाच्या टेबलवर बसवतात. सर्वात आधी रश्मिका तिच्या ताटात लाडू वाढते आणि तिच्या कपाळावर प्रेमाने किस करते. नंतर विजय भात घेऊन येतात आणि तिच्या ताटात वाढतात, तसेच तिला प्रेमाने किस करतात. ती चाहती जेवण करून झाल्यावर विजय तिला उचलून संपूर्ण घरात फिरवतात आणि तिच्याशी गप्पा मारतात. रश्मिका देखील तिच्यासोबत असते आणि तिच्या चेहऱ्यावरून हात फिरवते.या गोड कृतीमुळे रश्मिका आणि विजयने चाहत्यांची मने जिंकली आहेत. चाहते त्यांचे भरभरून कौतुक करत आहेत आणि त्या लहान चाहतीला खूप नशीबवान म्हणत आहेत.

## राशी-भविष्य

**मेष:** आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून प्रचंड पाठिंबा आणि प्रेम मिळेल आणि तुमच्या कुटुंबाप्रती असलेल्या समर्पणाची प्रशंसा होईल.

**वृषभ:** तुमच्या कुटुंबावरील प्रेमाची सर्वांनाच प्रशंसा होईल. जर तुम्हाला तुमच्या जोडीदारासाठी काही साध्य करायचे असेल तर तुम्ही ते सहजतेने करू शकाल. तुमचा दिवस चांगला जाईल.

**मिथुन:** घराबद्दलच्या तुमच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कुटुंबातील चिंता कमी होतील. कामे पूर्ण करण्यात तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

**कर्क:** तुम्हाला नातेसंबंधांमध्ये सुधारणा जाणवेल. चांगल्या शब्दांचा वापर केल्याने अनेक गोष्टी सुधारतील. कामातील तुमची आवड बदलेल आणि तुम्हाला यश मिळेल.

सिंह: तुमच्यापैकी ज्यांना मुले होऊ इच्छितात त्यांच्यासाठी हा चांगला काळ आहे. तुम्ही आज कौटुंबिक संतुलन राखू शकाल आणि याचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल.

**कन्या:** आज तुमचे पूर्ण लक्ष तुमच्या कुटुंबावर केंद्रित असेल. कौटुंबिक समस्येवर तोडगा निघेल आणि तुम्हाला आत्मविश्वासाने पुढे जाण्याची संधी मिळेल.

**तूळ:** आज तुमचा राग नियंत्रित करा. आरोग्य मध्यम आहे. प्रेमात वाद किंवा राग येण्याची शक्यता आहे. व्यवसायाची परिस्थिती मध्यम आहे. लाल वस्तू दान करा.

**वृश्चिक:** आज घरातील तापमान वाढेल. लक्ष्मी योग तयार होत आहे, जो खूप फायदेशीर आहे. तुम्ही जमीन, इमारत किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करू शकता. आरोग्य आणि व्यवसाय ठीक आहे .

**धनु:** आज तुम्ही शक्तिशाली राहाल. तुम्हाला जे हवे आहे ते तुम्ही साध्य कराल. तुमच्या योजना अंमलात आणा. सर्व काही ठीक राहील. आरोग्य मध्यम आहे.


**मकर:** आज परिस्थिती चांगली आहे. पैशाचा प्रवाह चालू राहील. पण गुंतवणूक करू नका. कठोर भाषा वापरणे टाळा. आरोग्य आणि प्रेम मध्यम असेल आणि व्यवसाय ठीक राहील. लाल वस्तू दान करा.

**कुंभ:** आज सौम्यता वाढेल. आरोग्य आणि प्रेम मध्यम आहे आणि तुम्हाला व्यवसायाच्या दृष्टिकोनातून चांगली बातमी मिळू शकते. बजरंग बाणाचे पठण करा.

**मीन:** आज जास्त खर्च केल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. तुमची मानसिक स्थिती कमकुवत असू शकते. तुमच्यात आत्मविश्वासाची कमतरता असेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## ओळख पक्ष्यांची : काळ्या पंखांचा घार



या चित्रात काळ्या पंखांचा घार , ज्याला काळ्या खांद्यांचा घार असेही म्हणतात, आपल्या भक्ष्यासह बसलेला दिसत आहे, जे एक लहान उंदीरवर्गीय प्राणी असल्याचे दिसते. या लहान शिकारी पक्ष्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे बर्फासारखे पांढरे शरीर, राखाडी पाठ आणि खांद्यावरील ठळक काळे पट्टे. डोळे: प्रौढ पक्ष्यांचे वैशिष्ट्यपूर्ण गडद लाल किंवा किरमिजी रंगाचे डोळे असतात, जे शिकारीसाठी अत्यंत अचूक साधन म्हणून वापरले जातात. ते सहसा मोकळ्या मैदानांमध्ये आणि गवताळ प्रदेशात आढळतात, तसेच उंदीर आणि लहान सरपटणारे प्राणी यांसारख्या भक्ष्याच्या शोधात अनेकदा एकाच जागी घिरट्या घालताना दिसतात.

**(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)**

## दिव्यांका त्रिपाठीच्या डोहाळे जेवणाचे फोटो आले समोर

अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी गेल्या काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. ती सध्या कोणत्या मालिकेत जरी काम करत नसली तरी ती तिच्या यूट्यूबच्या माध्यमातून चाहत्यांच्या भेटीला येत असते. अभिनेत्रीचा चाहतावर्ग मोठा आहे; त्यामुळे तिच्याबद्दल, तिच्या करिअरबद्दल जाणून घेण्यासाठी चाहते उत्सुक असतात.

४१ वर्षीय दिव्यांका त्रिपाठी आई होणार असल्याचे काही दिवसांपूर्वीच समोर आले होते. दिव्यांका व विवेक यांना लग्नाच्या दहा वर्षांनंतर बाळ होणार आहे. ही गोड बातमी समजल्यानंतर चाहत्यांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला

## रितेश देशमुखच्या राजा शिवाजी चित्रपटाची पहिली झलक



हे राजा शिवाजी चित्रपटाच्या चाहत्यांसाठी खरोखरच मोठे सरप्राईज आहे! धुरंधर २ च्या प्रदर्शनासोबतच रितेश देशमुखच्या राजा शिवाजी चित्रपटाची पहिली झलक पाहणे प्रेक्षकांसाठी पर्वणीच ठरली आहे. ऐतिहासिक चित्रपट 'राजा शिवाजी' आता पहिल्या दमदार टीझर सोबत प्रेक्षकांच्या समोर आला आहे. या चित्रपटाचा फर्स्ट लूक टीजर डिजिटल प्लॅटफॉर्मवर नाही तर केवळ चित्रपटगृहात रिलीज केला गेला. निर्मात्यांनी 'धुरंधर द रिवेंज' सोबत या चित्रपटाचा टीझर अॅटॅच केला आहे, पेड प्रीव्यू १८ मार्चपासून सुरू झाले आहेत. धुरंधर-२ पाहताना राजा शिवाजी चित्रपटाच्या टीझरमध्ये कहाणीची भव्य झलक पाहायला मिळतेय

जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी प्रस्तुत बहुप्रतीक्षित राजा शिवाजी चित्रपटाचा दमदार फर्स्ट लूक टीझर रिलीज झाला आहे. हा खास अनुभव केवळ चित्रपटगृहांमध्येच पाहायला मिळणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, स्वाभिमानाची आणि स्वराज्य स्थापनेच्या प्रवासाची सिनेमॅटिक झलक मोठ्या पडद्यावर पाहणे सुंदर अनुभव असणार आहे. रितेश विलासराव देशमुख यांची प्रमुख भूमिका असलेल्या आणि दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात भारतातील एका महान योद्धाची गाथा, त्याचा स्वराज्य स्थापनेचा संघर्ष फर्स्ट लूक टीझरमधून पहता येणार आहे. संगीत अजय-अतुल यांचे आहे. छायाचित्रकार संतोष सिवन यांनी आपल्या अप्रतिम छायाचित्रणातून या गाथेला भव्य दृश्यरूप दिले आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनीच्या बॅनरखाली ज्योती देशपांडे आणि जेनेलिया देशमुख निर्मित राजा शिवाजी हा चित्रपट १ मे २०२६ रोजी रिलीज होईल. जगभरातील चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट रिलीज होणार आहे.




जाग्या झाल्या वाटा
वाट कुणाची पाहतो,
अश्रू दाटीले अंतरंगी
पण सुख कुठे तू शोधतो

मन हे वीराळ रेतीवाणी
शोधते अपेक्षेचे वृक्ष,
येतील सुखाची फळे त्याला
का हेच मनोमनी मागतो

पसरते विश्व समुद्रासारखे
त्या विश्वात हसतो सूर्य अन चंद्र,
न्हाउनी जायचं त्यात तुला पण
नेहमी तू किनारा का शोधतो.

**निकिता देवतळे,**
यवतमाळ

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 344



शावक
शिसारी
शेरपा
सवत
सुंगणे
क्षेपक

**चार अक्षरी**
अंगरखा
करभार
करवत
कलरव
कलावंत
कारावास
कुशावर्त
गालपट
टकमक
मदालसा
मळमळ
मुष्टीघात
योगायोग
रममाण
लेखापाल
विदूषक
शेजारती
सरासरी
सविस्तर
साडेसाती
सारवण

**पाच अक्षरी**
अंगविक्षेप
उपटसुंभ
जनगणना
धमकावणे
पगावाढ
रगडमल्ली

**सहा अक्षरी**
आघाडी साधणे
गरुड भरारी
भावना प्रधान
कपिलाषष्ठीचा योग
लघुत्तम साधारण
विभाज्य

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
ईश
उणे
कडे
कण
कवि
कल्प
कष्टी
काळ
कोप
कोस
गर
गार
गोम
गोठा
चाप
तीन
तेढ
नग
नस्ती
पत
पत
पेव
भव
भार
भारा
भास
मना
मल्ल
मस
मास
रट
रस
राज्य
रीम
रुग्ण
लघु
लव
वसा
विना
विष
व्यस्त
शर
साठा
सार
स्तर
स्तव


**तीन अक्षरी**
आवंढा
कमाण
कर्तव्य
गडप
गणेश
गवई
घसट
घसारा
टपाल
डकार
तवंग
तेरस
नकुल
नानक
पातक
नापत
पालव
पिनाक
भडक
यमुना
रजक
रतन
रतीब
रपेट
रमणे
रवाना
राकट
लेपन
वखार
वलय
वातड

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 725



**–: आडवे संकेत :–**


1) मराठी व्याकरणात बोलणारा स्वतः (मी किंवा आम्ही)
5) मृत व्यक्ती
8) वियोगजन्य दु::ख, प्रिय व्यक्तिचा दुरावा
10) अपयश
11) तोल, इभ्रत, भार
12) जहर
13) आकाशाला पोचण्याइतका उंच
15) नकूल आणि सहदेव यांचा मामा, मनाला टोचणारी गोष्ट
16) उत्तर व पूर्व यांच्यामधील दिशा
18) हिंदीत मडके, जुगाराचा एक प्रकार
19) जेथे विद्या ग्रहण केली जाते असे मंदिर, विद्यालय
20) पातक
22) देव, ईश्वर
24) निराश्रीत, निराधार लोकांसाठी असलेली राहण्याची सोय
27) शहरात येणाऱ्या मालावर आकारण्यात येणारा कर
29) मुसलमानी वर्षाचा पहिला महिना
30) दु:ख, पीडा, त्रास
32) लढाऊ जातीचा मनुष्य
33) एका झाडापासून दुसरे झाड लावण्यासाठी पहिल्या झाडाची तोडलेली फांदी
34) मृदू, नरम
37) युद्धभूमी, रणक्षेत्र
39) आकृत्यांच्या सर्व मर्यादांची बेरीज
41) पंधरवड्यातील सहावी तिथी
42) या प्रकारचा
43) मसलत, बेत, कट
46) सांत्वन, शांत करणे
47) एक प्रकारचे अत्तर
49) अतिशय श्रीमंत व्यक्ती
52) दुर्लक्ष, क्षमा
53) जंगल
55) कोलकत्याचे एक जुने विमानतळ
56) द्वीप, पाण्याने वेढलेला प्रदेश
57) नंतर पैसे देण्याच्या बोलीवर आणलेला जिन्नस
58) पोलीस ठाण्यावरचा मुख्य अधिकारी
59) सांप्रत काळी, याक्षणी
60) बगीचा
61) पाठवणी, निघणे
63) अडथळा करणे (एक वाक्प्रचार)
67) दु:ख, रडकहाणी
68) पद्धत
69) नेसलेल्या वस्त्राची कंबरेभोवतालची बाजू, कडोसरी
71) शेळ्या, मेंढ्या पाळणारा
72) दंश, व्देष
73) सावध, दक्ष

**–: उभे संकेत :–**

1) जेथे विविध प्रयोग केले जातात अशी जागा
2) मोठा, श्रेष्ठ
3) कपड्याची लहान गाठोडी
4) सहा
5) मोक्ष, मुक्ती
6) शरम, लज्जा
7) लग्न, मुंज इत्यादी मंगल प्रसंगी वाजविण्यात येणारे मधुर वाद्य
8) बाजू समान नसलेला त्रिकोण
9) वजनात कमी, कमी प्रतीचा
14) कंठ, स्वर, आवाज
15) पदग्रहण करण्यापूर्वी त्या पदाच्या गोपनियतेविषयी घेण्याची शपथ
17) फांदी, भाग, खाते
20) नट खोलण्याचे उपकरण
21) ........ येणे, शरण येणे
23) स्पर्धा, सर्वात पुढे जाण्याची चढाओढ
24) ज्याला मरण नाही असे
25) अभिप्राय,
26) दोन
28) सततचा, ठाम
29) किंमत, मूल्य
31) नागाच्या डोक्यावरील काल्पनिक रत्न
33) डोक्याचे केस काळे करण्याकरिता लावावयाचा रंग
35) अकस्मात, एकाएकी
36) सारांश, मुख्य गोष्ट
38) गर्भ राहण्याची जागा, कूस
40) धनुष्यबाण
42) दुर्लक्ष
44) ठिकाण
45) मोठा हातोडा
46) अवतरणे, उघड, स्पष्ट
47) कठीण, त्रासदायक
48) सारखे
50) शिकेकाईत टाकावयाची एक सुवासिक वनस्पती
51) होम, याग
54) मनुष्य प्राणी
56) ताळतंत्र सोडलेले
57) व्रताची समाप्ती
59) धक्का, प्रहार
62) श्रीविष्णुचा एक अवतार
64) दिनांक
65) विधवेचा विवाह
66) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
67) खर्च, हानी
69) एक राशी
70) नवरदेव ●

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### पाच लाख आणि कारसाठी छळ

**नागपूर :** विवाहात मानपान न केल्याने सोनाली आशीष अमन लाल (३१) या विवाहितेचा पाच लाख रुपये रोख आणि कारच्या मागणीसाठी छळ करणारा पती, सासू- सासरे आणि भावजयी विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गिट्टीखदान पोलीस हद्दीतील के. टी. नगरातील रहिवासी सोनाली यांचा तीन वर्षांपूर्वी २०२३ मध्ये झारखंड राज्यातील रांची जिल्ह्यातल्या मोराबादी येथील आशीष अमन अजय लाल सोबत विवाह झाला. मात्र लग्नात मुलीच्या कुटुंबाने योग्य मानपान न केल्याने पती आशीष, सासू उषा अजयलाल (५५), सासरा अजय लाल (६०), भावजय स्वाती लाल, (३३, सर्व रा. दुर्गा पॅलेस, मोराबादी, जि. रांची, झारखंड) हे सोनाली यांचा सतत छळ करत होते. ते सोनाली यांना माहेरहून पाच लाख रुपये व कारची मागणी करत होते. लग्नात सोनाली यांच्या कुटुंबियांनी जवळपास ९ लाख रुपये खर्च केला होता. तरीही पती, सासू, सासरा आणि भावजय सोनाली यांचा छळ करत होते. दरम्यान सासरच्यांनी सोनाली यांच्या आईवडिलांशी भांडण केले. त्यामुळे वैतागलेल्या सोनाली यांनी गिट्टीखदान पोलीसठाणे गाठत तक्रार केली. पोलिसांनी हुंडा प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला.

### कळमनात जुगार अड्ड्यावर छापा

**नागपूर :**कळमना पोलीस ठाणेच्या शेजारी रनाळा गावात एका घरात सुरू असलेला जुगार अड्डा गुन्हे शाखा पथक पाचने रविवारी दुपारी उधळून लावला. या अड्ड्यावरून पोलिसांनी १७ जुगारींना रंगेहाथ अटक करत ११ लाखांच्या रोख रकमेसह ३ लाख ४० हजारांचा मुद्देमाल, २० हून अधिक भ्रमणदूरध्वनी संच जप्त केले आहेत. नवी कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रनाळा गावात ईद पार्टीच्या आडून बिर्याणीचे आमिष दाखवत हा जुगार अड्डा भरला होता. एका घरात जुगार खेळत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्या आधारे पथक पाचने छापा टाकत १७ जुगारींना ५२ पत्त्यांच्या डावासह रंगेहाथ अटक केली. मिळालेल्या माहितीनुसार, हा जुगार अड्डा बऱ्याच काळापासून सुरू होता. तो या परिसरातील बेकायदेशीर कृत्यांचे मुख्य केंद्र बनला होता. पोलिसांच्या धडक कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

### अजनी, हुडकेश्वरमध्ये घरफोडी

**नागपूर :**अजनी पोलीस ठाणे हद्दीतील न्यू बालाजीनगर आणि हुडकेश्वर पोलीस हद्दीतील बहादुरा फाटा येथील बाबुवन नगरीत घरफोडीच्या दोन घटना उघडकीस आल्या. अजनीतील प्रसाद किशोर वखरे (३३) यांच्या कडे चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून लाकडी कपाटातील ९० हजारांची रोख सोन्या चांदीचे दागिने दोन भ्रमणदूरध्वनी संच असा एकूण २ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल चोरला. हुडकेश्वर पोलीस हद्दीतील ओमकार श्रीराम जोशी (२८) यांचे घरफोडून चोरट्यांनी रोख ७० हजार सोन्याचे दागिने असा १ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल चोरला.

### मध्य प्रदेशातील फरार गुन्हेगार गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नागपूर :**चार वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातील एका महिलेवर लैंगिक अत्याचार करून पसार झालेल्या कुख्यात गुन्हेगार सोमवारी गुन्हे शाखा पथक पाचच्या हाती लागला. भुरा नेतराम गौर (५५, रा. ब्राह्मणगाव, जि. नर्मदापुरम, मध्य प्रदेश) असे त्याचे नाव आहे. भुराने डोलारिया येथे एका महिलेवर लैंगिक अत्याचार केले होते. या प्रकरणात मध्य प्रदेश पोलीस गेल्या चार वर्षांपूर्वी त्याला शोधत होते. गुन्हे शाखेचे पथक वाठोडा पोलीस हद्दीत गस्तीवर असताना त्यांना भुरा विषयी माहिती मिळाली. ताब्यात घेऊन पोलिसांनी मध्य प्रदेशातील कोतवाली पोलीस ठाण्याशी संपर्क साधला असता त्याच्या गुन्हेगारी अभिलेखाची माहिती पोलिसांना मिळाली.

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणारे ७ अधिकारी कचाट्यात; ३ बडतर्फ, ३ निलंबित!

## भंडारा महसूल विभागात खळबळ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी






**भंडारा, दि. २३ :** दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरीत शिरकाव करणाऱ्या भंडारा महसूल प्रशासनातील ७ अधिकाऱ्यांवर बडतर्फ तसेच निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली आहे.

महसूल विभागातील एकूण २२ दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची नागपूर वैद्यकीय मंडळामार्फत पुनर्तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी ७ अधिकाऱ्यांची प्रमाणपत्रे बोगस निष्पन्न झाल्यानंतर बोगस प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळवल्याचा ठपका ठेवत तीन अधिकाऱ्यांना बडतर्फ तर तीन जणांना निलंबित करण्यात आले आहे. शिवाय एका नायक तहसीलदाराला बडतर्फ करण्यासंदर्भात शासनाला प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी लाटणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय क्षीरसागर यांनी मागील तीन वर्षांपासून लावून धरली होती. क्षीरसागर यांच्या तक्रारीच्या आधारे भंडारा जिल्ह्यातील शासकीय नोकरी मिळविलेल्या ३२२ दिव्यांगांसह प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू झाली. या पुनर्तपासणीतून दिव्यांगत्व जास्त दाखविणे, दिव्यांग नसताना बोगस प्रमाणपत्राआधारे नोकरी मिळविणाऱ्या बोगस दिव्यांगांचा पर्दाफाश होण्यास सुरुवात झाली आहे. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकऱ्या आणि पदोन्नती लाटण्याचे गंभीर प्रकार उघडकीस आणले. जिल्ह्यात महसूल विभागात कार्यरत असलेल्या २२ दिव्यांगांपैकी ७ जणांनी दिव्यांगात्वाचे बोगस प्रमाणपत्र सादर केल्याचे उघड झाले असून त्यावर प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा प्रशासनाने केलेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यातील बोगस दिव्यांगांचे धाबे दणाणले आहेत.

महसूल प्रशासनातील तीन तलाठी, एक मंडळ अधिकारी, दोन सहाय्यक महसूल अधिकारी तसेच एक नायब तहसीलदार यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. भंडारा नायब तहसीलदार आनंद हट्टेवार यांना बडतर्फ करण्यात यावे असा प्रस्ताव जिल्हा निवड समितीच्या वतीने शासनाला पाठवण्यात आला असल्याची माहिती निवासी जिल्हाधिकारी मनोहर चव्हाण यांनी दिली.दिव्यांग व्यक्तींचे हक्क (सुधारणा) नियम, २०१६ नुसार, बोगस प्रमाणपत्रांची विशेष समितीमार्फत चौकशी करण्यात येते. भंडारा जिल्हा प्रशासनातील बोगस दिव्यांगत्वाच्या विषयाला गांभीर्याने घेत जिल्हा निवड समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने शासनाची दिशाभूल करणाऱ्या या सात बोगस दिव्यांगांवर कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास उद्योजकता व स्वयं मार्गदर्शन केंद्र तसेच जिल्हा शल्य चिकित्सक हे या समितीत सदस्य असतात.

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणात दोषी आढळल्यास कठोर शिक्षा व दंड होऊ शकतो. मात्र भंडारा महसूल प्रशासनात दोषी आढळलेल्या या सात बोगस दिव्यांग अधिकाऱ्यांवर अद्याप दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ९१ अंतर्गत गुन्हा दाखल झालेला नाही.

दिव्यांगांसाठी असलेले लाभ फसवणुकीने मिळवणे हा गुन्हा आहे. यामुळे शासनाची फसवणूक होते आणि खऱ्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्काच्या लाभांपासून वंचित राहावे लागते. दिव्यांगांसाठीच्या लाभांचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे असे सावन कुमार,( जिल्हाधिकारी भंडारा) यांनी सांगितले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांडेगाव व मुरबी येथील विध्यार्थीनींचे सुयश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**कुही, दि. २३ :** आजकाल पालकांचा कल कांव्हेटकडे जास्त वळलेला दिसतो, जिल्हा परिषदेच्या शाळेकडे मागासलेल्या नजरेने पाहल्या जाते, जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले जात नाही,असा आरोप जन माणसातून होताना दिसतो, परंतु या विचारधारेला तडा देत या विद्यार्थिनीनी जिल्हा परिषद शाळेचा व आपल्या गावाचा नावलौकिक केला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांडेगाव येथील विद्यार्थिनी कुमारी प्रीशा प्रवीण चांदुरकर हीने नुकत्याच झालेल्या नवोदय परीक्षेत नागपूर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावून जिल्हा परिषद शाळेचा तसेच पांडेगाव गावाचा नवा कीर्तिमान प्रस्थापित केला आहे, तिला पहिल्या वर्गात दाखल करतांना शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक प्रवीण फाळके. यांनी प्रीशाच्या पालकांना तीला जिल्हा परिषद शाळात दाखल करावे, असा आग्रह धरला, प्रिशा बालपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्तेची कल्पक, अभ्यासू आहे. तिच्या चाणाक्ष बुद्धीचा वेध घेऊन शाळेचे मुख्याध्यापक तथा वर्गशिक्षक प्रविण फाळके यांनी तीच्या व्यक्तीमत्वाला आकार दिला. अनेक प्रश्न विचारून शिक्षकांना बेजार करून सोडणारी प्रीशा, जिल्हा परिषद शाळेच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्यांचे उत्तर बनलेली आहे.१ ल्या वर्गातच ४ थ्या वर्गापर्यंतच्या विहीत क्षमता तीने संपादन केल्या होत्या. शाळेतील सहाय्यक शिक्षका श्रीमती उज्वला ताई चव्हाण यांनी मायेच्या ममतेने तिला अध्यापनाचे धडे गिरविले, सुनील महिंद्रे,गहलोद मॅडम, भाऊराव जीभकाटे , हितेश रामटेके सुरेश गायकवाड याचेही प्रीशाला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

जि.प. प्राथ.शाळा मुरबी येथील माजी विद्यार्थिनी श्रद्धा गेडाम इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत प्राथमिक जि.प. प्राथमिक शाळा मुरबी येथे शिक्षण घेतले, वर्गशिक्षक श्री प्रवीण फाळके व शाळेचे मुख्याध्यापक सुधीर नारनवरे यांनी या विद्यार्थिनीच्या गुणात्मक विकासात विशेष भर घालून अभ्यासासाठी प्रवृत्त केले. इयत्ता चौथी पर्यंत शिक्षण घेवुन, यावर्षी पाचव्या वर्गात ती रुयाड शाळेत शिकायला गेली.

## वाळू तस्करीचे चार ट्रक जप्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि. २३ :** बांधकामांना लागणाऱ्या रेतीची क्षमतेपेक्षा अधिक दरांत चोरट्या मार्गाने वाहतूक करत शहरात घुसखोरी करणारे रेती तस्करांचे चार ट्रक पोलिसांनी पकडले. ट्रकमधील ९ ब्रास वाळूचा महसूल चोरून ती वाळू वाहतूक करणाऱ्या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सावनेर तालुक्यात बाह्यवळण मार्गावर कोलार नदीचा पुल आणि अंबीका चौकात पोलिसांनी ही वाळू तस्करी हाणून पाडली. वाळूची तस्करी



करणारा चालक अश्फाक गौर अली पठाण (५९. रा. वरूड,जि. अमरावती), सौरभ हरीदास सांगोळे (३९, रा. रा. मंगसा ता. सावनेर), नीलेश जीवनलाल उईके ( ३१, रा. वडचिचोली, जि.पांढुर्णा मध्यप्रदेश आणि सचिन विठ्ठल पटले (२८, रा. किल्लापुरा खापा, ता. सावनेर या चौघांना पोलिसांनी अटक केली.

# कुठलीही खासगी सेवा सुरु करा, पण ‘बीएसएनएल’ नको

## गडचिरोलीच्या दुर्गम भागात आदिवासींमध्ये असंतोष का?

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २३ :** जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि दळणवळण सुलभ करण्यासाठी प्रशासनाने ‘बीएसएनएल’चे कोट्यवधी रुपये खर्च करून मोबाईल मनोरे (टॉवर) उभे केले. मात्र आजमितीस हे मनोरे केवळ शोभेच्या वस्तू ठरत आहेत. जिल्हा मुख्यालयापासून जवळ असलेल्या पैडी, जडेगाव आणि मारदा परिसरातील बीएसएनएल




सेवा पूर्णपणे कोलमडली असून, यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आता प्रशासनाविरुद्ध आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पैडी आणि आसपासच्या गावांमध्ये खासगी कंपन्यांचे नेटवर्क जेथे सक्षम आहे, तिथे बीएसएनएलचे मनोरे असूनही रेंज मिळत नाही. गावात मनोरे उभारल्याने नागरिकांनी उत्साहात सिमकार्ड खरेदी केले, महिनाभराचे रिचार्जही केले. मात्र, गावापासून अर्ध्या किलोमीटर अंतरावर गेले की नेटवर्क गायब होते. आश्चर्याची बाब म्हणजे, गावात एखाद्याचा मृत्यू झाला तरी नातेवाईकांना कळवण्यासाठी फोन लागत नाही, अशी विदारक स्थिती गेल्या काही दिवसांपासून निर्माण झाली आहे. पैडी ग्रामवासियांनी या त्रासाला कंटाळून ग्रामसभेत रीतसर ठराव मंजूर केला होता. आम्हाला बीएसएनएल नको, इतर कोणत्याही खासगी कंपनीचा टॉवर उभारा, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने या मागणीकडे सपशेल दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

कोट्यवधी खर्च करून उभे केलेले हे मनोरे जर सेवाच देऊ शकत नसतील, तर हा जनतेच्या पैशाचा दुरुपयोग नाही का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. कंत्राटदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने केवळ निकृष्ट दर्जाची कामे उरकण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या संदर्भात स्थानिक पोलीस मदत केंद्राच्या अधिकाऱ्यांनाही तोंडी तक्रार देण्यात आली आहे.

## चापेगडी येथे शेत जमीन पोट हिस्सा मोजणी प्रकल्पाबाबत तालुकास्तरीय समितीची सभा संपन्न

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**कुही, दि. २३ :** ग्रामीण भागातील शेत जमिनीच्या पोट हिस्सा मोजणी करून नकाशे व सातबारा अधिकार अभिलेख अद्यावत करण्याच्या उद्देशाने, चापेगडी (ता. कुही) येथे एका महत्त्वाच्या पथदर्शी प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या नियोजनासाठी आणि जनजागृतीसाठी आज ग्रामपंचायत कार्यालय चाफेगडी येथे तालुकास्तरीय समितीची विशेष सभा पार पडली.

ही सभा उपविभागीय अधिकारी उमरेड, विद्यासागर चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी नागपूरचे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख अभय जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सभेला समितीचे सदस्य म्हणून कुहीचे तहसीलदार, डॉ. अमित घाडगे, पंचायत समितीचे स्वप्नील मेश्राम, संबंधित मंडळाचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विस्तार अधिकारी, तसेच चापेगडीचे सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. याव्यतिरिक्त माजी जिल्हा परिषद सदस्य. अरुण हटवार, प्रकल्पाचे खाजगी संचालक सागर परांजपे, गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

सभेमध्ये जिल्हा अधीक्षक श्री. अभय जोशी यांनी या पथदर्शी प्रकल्पाची गरज आणि त्याचे फायदे यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते सांगितले की, पोट हिस्सा मोजणीमुळे जमिनीचे नकाशे अचूक होतील.

सातबारा व इतर अधिकार अभिलेख अद्यावत झाल्यामुळे भविष्यातील जमिनीचे वाद संपुष्टात येतील. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा नेमका हिस्सा कायदेशीररीत्या स्पष्ट होईल.

अध्यक्षीय भाषणात विद्यासागर चव्हाण यांनी प्रशासकीय प्रक्रियेबाबत माहिती दिली, तर अभय जोशी. यांनी हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी गावकरी आणि शेतकरी बांधवांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन केले. खाजगी समितीचे संचालक श्री. सागर परांजपे यांनी तांत्रिक अंमलबजावणीबाबत माहिती दिली. या सभेमुळे चाफेगडी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये जमिनीच्या मोजणीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, महसूल विभागाच्या या पुढाकाराचे कौतुक होत आहे.

## मोर्चात सहभागी होणास जाणाऱ्यांवर पोलिसांची दडपशाही

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर, दि. २३ :** तालुक्यातील वंचित बहुजन आघाडी व इतर समर्थित पक्षांचे कार्यकर्ते सोमवारी (ता. २३) नागपूर येथे आयोजित मोर्चात सहभागी होण्यासाठी रवाना झाले असताना भिवापूर पोलिसांनी त्यांना अडवून पोलीस ठाण्यात बसवून ठेवल्याची घटना घडली. या प्रकारामुळे पोलिसांच्या दडपशाहीचा आरोप कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

नागपूर येथील संविधान चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मोर्चाची सुरुवात होणार होती. या मोर्चाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार तसेच आमदार विकास ठाकरे करणार होते. विविध



सामाजिक, आर्थिक व राजकीय मुद्द्यांवर लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता.

भिवापूर तालुक्यातील अनेक कार्यकर्ते सकाळी नागपूरकडे रवाना झाले होते. मात्र, मार्गातच पोलिसांनी त्यांना अडवून भिवापूर पोलीस ठाण्यात नेले व काही काळ तिथेच बसवून ठेवले. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. नागपूर येथील मोर्चा यशस्वी होऊ नये, यासाठी पोलिसांनी जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

दरम्यान, या मोर्चामध्ये देशाने अमेरिकेसोबत केलेल्या व्यापारी करारासह एपस्टिन फाइल प्रकरणातील कथित नावे यांसारख्या मुद्द्यांवरून वंचित बहुजन आघाडी व काँग्रेसतर्फे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार होता. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून ही कारवाई केल्याचे सांगितले जात आहे.

याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक जयप्रकाश निर्मल यांनी सांगितले की, ‘‘मोर्चात सहभागी होण्यासाठी जाणाऱ्यांना थांबविण्याचे वरिष्ठांचे आदेश होते. त्या आदेशांचे पालन करणे हे आमचे कर्तव्य आहे.

# वडेट्टीवारांच्या ‘त्या’ आरोपांवर १०० कोटींचा दावा

## भाजप नेते राजू पाटील राजेंचा मानहानीचा दावा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी





**वाशिम, दि. २३ :**राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या चिखलफेकीत आता वाशिम जिल्ह्याचे राजकारण तापले असून, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. भाजपचे वाशिम जिल्हा निवडणूक प्रमुख राजू पाटील राजे यांनी वडेट्टीवारांसह अन्य चौघांविरोधात चक्क १०० कोटी रुपयांचा दिवाणी मानहानीचा दावा दाखल केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, आरोपांची लढाई आता थेट न्यायालयाच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे.

२८ डिसेंबर २०२५ रोजी एका पत्रकार परिषदेत विजय वडेट्टीवार यांनी राजू पाटील राजे यांच्यावर गंभीर आणि खळबळजनक आरोप केले होते. वाशिममधील बनावट नोटा प्रकरणात राजेंवर गुन्हा दाखल असूनही त्यांना अटक का होत नाही? शासन त्यांना पाठीशी घालत आहे का? असा सवाल वडेट्टीवारांनी उपस्थित केला होता. या आरोपांमुळे आपली सार्वजनिक प्रतिमा मलिन झाल्याचा दावा राजू पाटील राजे यांनी केला आहे.

या संदर्भात राजेंनी ३ जानेवारी २०२६ रोजी वडेट्टीवार यांना कायदेशीर नोटीस बजावली होती. १५ दिवसांच्या आत पुराव्यासह खुलासा करावा किंवा सार्वजनिकरीत्या माफी मागावी, असे नोटिशीत नमूद करण्यात आले होते. मात्र, दिलेल्या मुदतीत कोणताही खुलासा न केल्याने आणि माफीही न मागितल्याने अखेर राजेंनी कायदेशीर आक्रमक पवित्रा घेतला आहे.

१८ मार्च २०२६ रोजी वाशिम जिल्हा सत्र न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या या दाव्याचा क्रमांक १३/२०२६ असा असून न्यायालयाने तो स्वीकारला आहे. या दाव्यात केवळ विजय वडेट्टीवारच नव्हे, तर त्यांच्यासोबत चुकीची माहिती पसरवणारे: हरीश सारडा (रा. वाशिम), तेजराव इनामदार (रा. लोणी गवळी, जि. बुलढाणा), पंकज इंगोले (रा. वाशिम) आणि संबंधित वृत्तवाहिनी या सर्वांना प्रतिवादी करण्यात आले असून न्यायालयामार्फत त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

खोट्या आरोपांना कायदेशीर मार्गानेच चोख उत्तर दिले जाईल, असा ठाम निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या खटल्यामुळे आगामी काळात वाशिमच्या राजकीय वातावरणात मोठे कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

### पुरावे असतील तर न्यायालयात या, अन्यथा माफी मागा

आज (२३ मार्च) शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत राजू पाटील राजे यांनी आपला संताप व्यक्त केला. ‘‘माझ्यावर करण्यात आलेले सर्व आरोप धादांत खोटे, कपोलकल्पित आणि राजकीय द्वेषातून प्रेरित आहेत. माझ्या सार्वजनिक जीवनातील पारदर्शकतेवर चिखलफेक करणाऱ्यांना मी सोडणार नाही. ज्यांच्याकडे पुरावे असतील त्यांनी ते न्यायालयात सादर करावेत, अन्यथा जनतेची आणि माझी जाहीर माफी मागावी,’’ असे थेट आव्हान त्यांनी वडेट्टीवारांना दिले.

## मटण-मच्छी मार्केट उभारणीला नागरिकांचा विरोध

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भिवापूर, दि. २३ :**त.सा. क्रमांक ७८ येथील गट क्र. ३२६/१ या जागेवर प्रस्तावित मटण-मच्छी मार्केट उभारणीस शिवाजी लेआऊट व धर्मापूर परिसरातील प्रभाग क्र. ९ व १० मधील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. याबाबत नागरिकांनी नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.जागेच्या लगतच नव्याने उभारलेली न्यायालयाची इमारत व कर्मचारी वसाहत आहे. तसेच परिसरात भिवापूर एज्युकेशन संस्थेची नर्सरी, के.जी. ते इयत्ता ७ वी पर्यंत इंग्रजी माध्यम शाळा तसेच इयत्ता ५ वी ते १० वी व ज्युनिअर कॉलेजचे वर्ग सुरू आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे परिसर शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे.याशिवाय, जवळच हनुमान मंदिर तसेच पंचशील चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती असल्याने सामाजिक व धार्मिक दृष्टीनेही या परिसराला महत्त्व आहे. अशा ठिकाणी मटण-मच्छी मार्केट उभारल्यास दुर्गंधी, अस्वच्छता व रोगराईचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.संबंधित मार्केट शहराबाहेरील उपलब्ध शासकीय जागेवर स्थलांतरित करून उभारण्यात यावे. नागरिकांच्या आरोग्य व पर्यावरणाचा विचार करून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.या निवेदनावर अंकुश शंभरकर, प्रल्हाद भिमटे,राजू भोयर,पवन डेकाटे, अशोक वंजारी, जितेंद्र सवाइकर,न.प.बांधकाम सभापती साहिलकुमार टेंभुर्णे, नगरसेवक सुध्दलेखा तभाने, स्वीकृत नगरसेवक आनंद गुप्ता, उपनगराध्यक्ष प्रकाश (ऋचित) पंजलवार, अनिल समर्थ यांची नावे आहेत.

## थोडक्यात



### कम्युनिस्ट पक्षाकडून शहीदांना अभिवादन

**नागपूर :** शहीद दिनानिमित्ताने भारतीय कम्युनिस्ट पक्ष नागपूर जिल्हा च्यावतीने आज शहीदे आझम भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. विजय टॉकीज चौक शहीद स्मारक जवळ जिल्हा सचिव डॉ युगल रायलु, शहर सह सचिव कॉम. रविंद पराते, कॉम जयश्री चहांदे, कॉम. सुनील शेंडे, कॉम नसीम, कॉम धनराज करणूखे, कॉम. शरद पिंपळे, कॉम. मोहन बावणे आणि कॉम. इंद्रजीत खिची उपस्थित होते.

### कारच्या धडकेत वृद्धेचा मृत्यू

**नागपूर :** रस्ता ओलांडताना एका भरधाव बोलेरो कारने दिलेल्या धडकेत ७५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नागपूर-अमरावती रोडवर घडली आहे. याप्रकरणी वाडी पोलिसांनी अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. शांताबाई गणपत आंधे (वय ७५ वर्षे), रा. अजय नगर, प्लॉट नं. डी-३२, अंबाझरी २२ मार्च २०२६, दुपारी १:०० ते १:३० च्या सुमारास त्यांच्या मुलाच्या उसाच्या रसाच्या दुकानात जाण्यासाठी रस्ता ओलांडत होत्या. त्याचवेळी एका ग्रे (राखाडी) रंगाच्या बोलेरो कार चालकाने आपले वाहन भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवून त्यांना जोराची धडक दिली. धडक दिल्यानंतर आरोपी चालक घटनास्थळावरून पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या शांताबाई यांना उपचारासाठी सेनगुप्ता हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृताची मुलगी उषा विनोद चौधरी (संजय नगर, पांढराबोडी) यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक काळिंगे यांनी आरोपी चालकाविरुद्ध खालील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### जुन्या वादातून एकावर चाकूने जीवघेणा हल्ला

**नागपूर:** अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुदाम नगर भागात एका ४७ वर्षीय व्यक्तीवर चाकू आणि लोखंडी पाईपने प्राणघातक हल्ला करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी तत्परता दाखवत चारही आरोपींना अटक केली असून, जखमीवर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. फिर्यादी सचिन मुकुंदा मानेराव (वय ४७ वर्षे रा. सुदाम नगरी, अंबाझरी खदान) त्यांचे मित्र अक्षय यांच्या मोपेडवर २२ मार्च २०२६ सकाळी ११:०० वाजेच्या सुमारास,डबलसीट जात असताना आरोपींनी त्यांना सुदाम नगर सरकारी दवाखान्याजवळ अडवले. जुन्या वादाचे कारण समोर ठेवून आरोपींनी संगनमताने हल्ला केला. गजानन बाबूलाल बत्तरवार याने फिर्यादीचा गळा चिरून ठार मारण्याच्या उद्देशाने चाकूने वार केला. सचिन यांनी वार चुकवल्याने चाकू गळ्याला घासून गेला.. भूपेंद्र हनुमंत बत्तलवार (वय २३) याने चाकूने सचिन यांच्या डोळ्यावर मारून गंभीर दुखापत केली. पवन राजेश बत्तुलवार याने लोखंडी पाईपने डाव्या खांद्यावर आणि छातीवर मारहाण केली. राजू राम कुंभरे याने हाताबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. गंभीर जखमी सचिन मानेराव यांना तातडीने मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून अंबाझरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून चारही आरोपींना अटक केली आहे.पोलीस उपनिरीक्षक प्रकाश साकोरे यांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# 'एपस्टीन' प्रकरणी काँग्रेस-वंचितचा मोर्चा

## राज्यासह केंद्र सरकारवर जोरदार टीकास्त्र, विदर्भातील सर्व जिल्ह्यांतून कार्यकर्त्यांची गर्दी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ : नाशकातील अशोक खरात प्रकरणावरून महाराष्ट्रासह देशभरातील राजकीय वातावरण तापले असतानाच सोमवारी उपराजधानीत 'एपस्टीन फाईल्स' प्रकरणी काँग्रेस-वंचित आणि मित्रपक्षांच्या वतीने संयुक्त निषेध मोर्चा काढण्यात आला.**






काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने 'एपस्टीन फाईल्स' प्रकरणावरून आज संयुक्त मोर्चाची हाक दिली वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा संविधान चौकातून काढण्यात आला त्याआधी दोन्ही नेत्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारअर्पण करून अभिवादन केले यानंतर वंचित नेते सुजात आंबेडकर, हर्षवर्धन सपकाळ, ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यासह अन्य मान्यवरांनी मोर्चक०यांना संबोधित केले. अमेरिकन न्याय विभागाने जाहीर केलेल्या 'एपस्टीन फाईल्स' प्रकरणामुळे अनेक देशांतील राजकीय वातावरण ढवळून निघाले आणि त्या-त्या देशांतील नेत्यांनी आपल्या सहभागामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला भारतात मात्र संबंधित व्यक्ती आपल्या पदाला चिपकून आहेत या मुद्याला आंतरराष्ट्रीय संदर्भ असल्याने त्याचे देशांतर्गत पडसाद अधिक तीव्र होवूनही केंद्र सरकारवर कोणताही परिणाम होत नसल्याचे नेत्यांनी विचारमंचावरून सांगितले.

मोर्चात संपूर्ण विदर्भातील सर्व जिल्ह्यातील वंचित आणि काँग्रेससह मित्रपक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होते. तत्पूर्वी काँग्रेस नेत्या अवंतिका लेकुरवाळे आणि कुंदा राऊत, वंचितचे श्री जब्बार (अकोला)यांनी जोरदार भाषणे करून मोर्चेक०यांत जोष निर्माण केला.

### परवानगी नाकारली

**दरम्यान, 'एपस्टीन फाईल्स'प्रकरणात काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी यांच्या संघ मुख्यालयावर मोर्चाची परवानगी पोलिसांनी नाकारली. मात्र, पोलिस प्रशासनाने कायदा सुव्यवस्थेचे कारण देत संघ मुख्यालयावर मोर्चा काढण्यास पोलिसांनी परवानगी नाकारली. फक्त संविधान चौकापुरता निषेध मोर्चा करायचा असेल तर पोलिस परवानगी देण्यास तयार असल्याचे पोलिस प्रशासनाने म्हटले होते.**



## क्रांतिकारांच्या बलिदानाला महावितरणचे अभिवादन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील धगधगते अग्निकुंड आणि तरुण पिढीचे स्फूर्तिस्थान मानले जाणारे शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या सर्वोच्च बलिदानाचा स्मृतिदिन आज महावितरणच्या नागपूर परिमंडलात मोठ्या उत्साहात आणि आदराने 'शहीद दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

काटोल रोड येथील 'विद्युत भवन' या प्रशासकीय कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात क्रांतीकारकांच्या धैर्याला आणि राष्ट्रप्रेमाला उजाळा देण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रादेशिक कार्यालयातील मानव संसाधन आणि औद्योगिक संबंध विभागाने यावेळी शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या जीवनप्रवासावर आणि त्यांच्या महान कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांच्यासह प्रादेशिक व परिमंडल कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी क्रांतीकारकांच्या स्मृतीस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### CAPTION दिव्यांगांसाठी खास सुविधा




**नागपूर: नागपुरात महानगरपालिकाच्या वतीने'पीएम ई- बसेस' धावत असून, शहराच्या विविध भागांत उपलब्ध करण्यात आलेली आहे. यात सामान्य प्रवाश्यांसह दिव्यांगांसाठी विशेष दार आणि खुर्चीची सुविधा दिलेली आहे,ज्याद्वारे चढ-उतार करणे सोपे होते.**

### रेल्वे धडकेत तरुणाचा मृत्यू

**नागपूर, दि. २३ :** मनीष नगर रेल्वे लाईनवर रेल्वेच्या धडकेत एका ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २२ मार्च २०२६ रोजी रात्री घडली. शुभम अशोक अतकर (३२, रा. मनीष नगर) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनीष नगर नवीन अंडरपासवरील रेल्वे लाईनवर रात्री ८ वाजेच्या सुमारास शुभम यांचा मृतदेह गंभीर अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच सोनेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदनासाठी मेडिकल हॉस्पिटलला पाठवला. रुपेश रमेश मसराम यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक रणधीर रोकडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## नैतिकता असेल तेथे न्याय - विकास सिरपूरकर

### 'जस्टा कॉजा' राष्ट्रीय विधी महोत्सवाचा समारोप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ :** नैतिकता असेल तेथे न्याय मिळतोच, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ च्या वतीने आयोजित 'जस्टा कॉजा' राष्ट्रीय विधी महोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून न्यायमूर्ती श्री. विकास सिरपूरकर मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश न्यायमूर्ती श्री. नंदेश देशपांडे, संचालक डॉ. रविशंकर मोर, जस्टा कॉजा महोत्सवाच्या समन्वयक डॉ. प्रविणा खोब्रागडे, सहसमन्वयक डॉ. अधरा देशपांडे यांची उपस्थिती होती. समाजातील चांगले मूल्य जोपासणे म्हणजे धर्म असून धर्म अर्थात कायद्यावर आधारित आपली कृती असणे आवश्यक आहे. आपण कितीही मोठे झालो तरी कायदा आपल्यापेक्षा मोठा आहे. महाभारतात गांधारीने आपला पुत्र दुर्योधनाला युद्धाच्या वेळी दिलेला आशीर्वाद सर्वोच्च न्यायालयाने आपले ध्येय वाक्य म्हणून स्वीकारले. यावरून आपल्या संविधानात भारतीय प्राचीन संस्कृतीची छवी दिसून येते. भारतीय संविधानातील मुल्ये पाश्चिमात्य देशातील संविधानातून घेतली असल्याची ओरड काहीजण करतात. मात्र, संविधानावर प्राचीन भारतीय संस्कृतीची छाप ओरड करणाऱ्यांना गप्प करण्यास पुरेसी असल्याचे श्री. सिरपूरकर म्हणाले. विधीक्षेत्रात नैतिकता आणि प्रामाणिकता महत्त्वपूर्ण आहे. नैतिकता आणि प्रामाणिकता असेल तर तुम्हाला कोणीही संपवू शकणार नाही. कोणीही तुमचा वापर करू शकणार नाही, असे सिरपूरकर म्हणाले. पूर्वी आणि आता असलेल्या विधी क्षेत्रातील फरक यावेळी त्यांनी विशद केला. तंत्रज्ञान तसेच संगणकामुळे विधी क्षेत्रात आलेल्या तांत्रिक बदलाबाबत देखील त्यांनी माहिती दिली.




### सामाजिक वास्तविकता

**न्याय केवळ संकल्पना नसून सामाजिक वास्तविकता असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांनी केले. ज्ञान तुम्हाला यशस्वी तर नैतिकता मानवीय बनण्यास मदत करेल. संविधानिक मूल्यांची जपवणूक करीत कठोर परिश्रमातून यश प्राप्त होईल, असे श्री. देशपांडे यांनी सांगितले.**

## महिला आयोग अध्यक्षपदी 'राजकीय पुनर्वसन' टाळा

### नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकतेची ॲड. अंजली साळवे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. २३ :** राज्यात अशोक खरात प्रकरणामुळे राज्यभर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकरांवर झालेल्या आरोपामुळे त्यांनी नुकताच राजीनामा दिला. त्यामुळे आता महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती कोणाची होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले असतांना राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीस ॲड. अंजली साळवे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर निव्वळ राजकीय पुनर्वसन म्हणून सत्ता पक्षातील राजकीय महिलेला नियुक्ती न देता या क्षेत्रातील अनुभवी महिलेला कायदेशीर प्रक्रिया राबवून नियुक्त कारणाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे.

महाराष्ट्र हे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि जिजाऊंच्या विचारांचा वारसा सांगणारे राज्य आहे. या राज्यात 'महिला आयोग' ही केवळ एक वैधानिक संस्था नसून, संकटात सापडलेल्या प्रत्येक महिलेसाठी तो न्यायाच्या आशेचा किरण असतो. खरात प्रकरण राज्याचे मुखमंत्री निष्पक्ष चौकशी करतील, असा विश्वास डॉ साळवे यांनी दर्शविला. सद्यस्थितीत आयोगाच्या अध्यक्षपदाबाबत सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, सक्रिय राजकीय क्षेत्रात येण्याआधी महिला-बालकल्याण क्षेत्रात केंद्र व राज्य स्तरावर कामाचा अनुभव असलेल्या डॉ साळवे यांनी आपल्या निवेदनात राज्य महिला आयोगाचे गठण महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा व नियम या नुसार होत असून, यासंदर्भात निवड समितीसुद्धा गठित होते आणि प्रसार माध्यमातून आयोगाच्या पदावर नियुक्त होण्यासाठी लागणाऱ्या निकषासह तशी जाहिरात सुद्धा महिला बालकल्याण विभागामार्फत दिली जाते. या जाहिरातीनुसार राज्यातील महिला कायदे, धोरण व महिला अत्याचारांची प्रकरण हाताळण्याचा अनुभव असलेल्या कित्येक अनुभवी महिला महिला आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य पदावर नियुक्तीसाठी अर्ज दाखल करतात.परंतु दुर्दैवाने या महिलांना साध्या मुलाखतींना सुद्धा निवड समिती द्वारे बोलावले जात नाही आणि सरकारद्वारे परस्पर फक्त राजकीय पुनर्वसन करण्यासाठी ज्या राजकीय महिलेला महिलाविषयक कायदा,महिला धोरण,महिलांचे संविधानिक अधिकारी व त्यांची अंमलबजावणी तसेच यंत्रणेकडून त्यांची अमबजावणी करवून घेण्याचा अनुभव नसताना सत्ता पक्षातील सरकार आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य पदावर नियुक्त करतात. अशा परिस्थितीत निष्पक्ष चौकशी होईलच याची खात्री नसल्याने याचा परिणाम राज्यातील महिलांच्या संविधानिक अधिकाराच्या सुरक्षेवर होतो असे मत व्यक्त केले आहे.

## भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांचा 'शहीद दिन'



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात २३ मार्च २०२६ रोजी शहीद दिन पाळण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य युध्दातील योध्दा तसेच थोर क्रांतीकारक शहीद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांचा शहीद दिन पाळण्यात आला.

याप्रसंगी उपकुलसचिव डॉ. मोतीराम तडस व प्रभारी उपकुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. शहीद दिन कार्यक्रमाला प्रभारी अधिक्षक शैलेश राठोड, आयटी समन्वयक सतिश शेंडे, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक नितीन खरबडे, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, सर्वश्री कवडू भोयर, नरेंद्र पवार, अनिल खरे, श्रीराम खरे, अतुल इरपाची, मोरेश्वर उमरेडकर, आसिफ शेख, प्रदीप झोडे, कार्तिक हरडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**नागपूर, दि. २३ :** कपिलनगर ठाण्याच्या हद्दीत कामगार नगर चौकातील चहाच्या टपरीवर ४० वर्षीय अज्ञात व्यक्ती २२ मार्च रोजी सकाळी ६.५० च्या सुमारास बेशुद्ध अवस्थेत आढळली. पोलिसांनी तातडीने मेयो रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.मृतकाचे वर्णन: वय अंदाजे ४० वर्षे, तर उंची ५ फूट आहे. शरीर रंग सावळा, चेहरा लांबट असून, केस व दाढी काळे आणि वाढलेले आहेत. अंगात हिरव्या-पांढ०या रंगाचा चेकचा फुल बाह्यांचा शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट आहे. तसेच, डाव्या हातात कडे असून, उजव्या हाताच्या मनगटावर कापल्याची जुनी जखम आहे. या वर्णनाच्या व्यक्तीबाबत माहिती असल्यास पोलिस उपनिरीक्षक शिवाली उलमाले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रदूषण मुक्त ... 'जागतिक जल दिनी' स्वयंसेवी संस्थांसोबत महत्त्वपूर्ण बैठक

## नदी-तलाव स्वच्छता व 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'वर भर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ : 'जागतिक जल दिना'चे औचित्य साधून नागपूर शहराचे नैसर्गिक वैभव असलेल्या जलस्त्रोतांचे संवर्धन, संरक्षण आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांनी विविध स्वयंसेवी संस्थांसोबत विशेष बैठक घेतली. या बैठकीला सत्तापक्ष नेते श्री. नरेंद्र (बाल्या) बोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.**



बैठकीत महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी नागपूरमधील नाग नदी, पिवळी नदी आणि पोहरा नदी या मुख्य जलवाहिन्यांसह शहरातील अंबाझरी आणि फुटाळा तलावाच्या सद्यस्थितीवर या बैठकीत सविस्तर चर्चा केली.विशेषतः तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरलेली जलपर्णी ही एक गंभीर समस्या बनली असून, त्यातून कायमस्वरूपी सुटका कशी मिळवता येईल, यावर प्रामुख्याने विचारमंथन करण्यात आले.

बैठकीत उपस्थित असलेल्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी जलसंवर्धनासाठी आपापले अनुभव, मते आणि तांत्रिक उपाययोजना मांडल्या. महापौरांनी या सर्व संस्थांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकून घेतले. नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी आणि जलपर्णीची समस्या सोडवण्यासाठी नेमकी कोणती 'ॲक्शन' घेणे आवश्यक आहे, याबाबत त्यांनी सविस्तर चर्चा केली. या सूचनांची अंमलबजावणी करून लवकरच ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन महापौरांनी दिले.

केवळ नद्या आणि तलावांची स्वच्छताच नव्हे, तर भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता शहराची भूजल पातळी वाढवण्यासाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग अत्यंत आवश्यक असल्याचे महापौरांनी नमूद केले. यासाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' वर भर देण्याबाबत बैठकीत चर्चा केली.

## विद्यापीठात उद्योग-संस्था संवाद कार्यक्रम उद्या

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २३ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उद्योग-संस्था उच्चस्तरीय संवाद कार्यक्रम २५ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला आहे. पदव्युत्तर अर्थशास्त्र आणि सांख्यिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम गणित विभागाच्या श्रीनिवास रामानुजन सभागृहात होणार आहे.

पदव्युत्तर विद्यार्थी आणि संशोधकांना सांख्यिकी व डेटा विश्लेषण क्षेत्रातील उदयोन्मुख करिअर संधींबाबत मार्गदर्शन करणे आणि शैक्षणिक सिद्धांत व व्यावसायिक अनुभव यातील दरी कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यापीठातील अर्थशास्त्र आणि सांख्यिकी अभ्यासक्रम जागतिक औद्योगिक मानकांशी आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO) यांच्या गरजांशी सुसंगत करण्यावरही विशेष भर दिला जाणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या कुटुंब सर्वेक्षण विभाग, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे अतिरिक्त महासंचालक अजय बक्षी व राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय नागपूरचे उपमहासंचालक नियती जोशी यांची उपस्थिती राहणार आहेत.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## गौरी चिंचोळकर यांना पीएच.डी.



**अकोला :** वाडेगाव येथील रहिवासी सौ. गौरी चंद्रशेखर चिंचोळकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त करून वाडेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांनी ''इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांची मानसिकता व त्यांच्या शैक्षणिक विकासाबाबत पालकांच्या जागरूकतेचा चिकित्सक अभ्यास'' या महत्त्वपूर्ण विषयावर आपले संशोधन पूर्ण केले. बार्शी (जि. सोलापूर) येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये डॉ. पी. ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे कार्य तडीस नेले. गौरी चिंचोळकर यांचे हे संशोधन विशेषतः मराठी भाषा, मराठी शाळांचे अस्तित्व आणि पालकांची बदलती भूमिका यावर प्रकाश टाकणारे असून, ते समाज व शासनासाठी दिशादर्शक ठरणार आहे. त्यांनी यापूर्वी मराठी, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अशा चार विषयांत एम.ए. आणि एम.एड. पदव्याही प्राप्त केल्या आहेत.

# वंचितांच्या आयुष्यात आनंदाची पहाट फुलवणारे डॉ. सुगत वाघमारे यांचा अकोल्यात भव्य सत्कार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** समाजातील वंचित आणि तळागाळातील घटकांसाठी, विशेषतः अनाथ व गरजू बालकांसाठी मायेची ऊब देणारे कार्य करणाऱ्या तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत दादा वाघमारे यांचा महिला व बाल विकास विभाग, अकोला यांच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. दिनांक २२ मार्च २०२६ रोजी महिला व बाल विकास भवन येथे आयोजित एका भावूक आणि उत्साहपूर्ण सोहळ्यात डॉ. वाघमारे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

डॉ. सुगत वाघमारे आणि त्यांच्या तिक्ष्णगत टीमने नुकतेच अकोला जिल्ह्यातील शासकीय बालगृह, गायत्री बालिकाश्रम आणि सूर्योदय बालगृहातील बालकांसाठी २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान एका अभूतपूर्व मुंबई सहलीचे आयोजन केले होते. या सहलीत बालकांनी इमेजिका पार्क, राणीचा बाग, पंडित जवाहरलाल नेहरू संग्रहालय आणि गेट वे ऑफ इंडिया यांसारख्या प्रसिद्ध ठिकाणांना भेटी दिल्या. केवळ पर्यटनच नव्हे, तर बालकांची राहण्याची व्यवस्था आलिशान हॉटेलमध्ये करून त्यांना एक सन्मानजनक अनुभव देण्यात आला. बोटिंगचा आनंद लुटताना या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर जो ओसंडून वाहणारा आनंद होता, तोच या उपक्रमाचे खरे यश ठरले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य ॲड. संजय सेंगर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून डॉ. वाघमारे यांच्या कार्याला सलाम केला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजश्री कोलखेडे, बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष ॲड. अनिता गुरव, राजेश देशमुख, ॲड. शीला तोष्णीवाल आणि प्रांजली जैस्वाल यांसारख्या मान्यवरांनी डॉ. वाघमारे यांच्या कल्पकतेचे आणि नियोजनाचे तोंडभरून कौतुक केले. याप्रसंगी तिक्ष्णगत संस्थेचे समन्वयक सचिन पाटील, विशाल शिंदे, बॉबी पळसपगार, उमेश शिरसाट आणि श्वेता शिरसाट यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिविक्षा अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले, तर सूत्रसंचालन चाईल्ड हेल्प लाईनच्या समन्वयक हर्षाली गजभिये यांनी प्रभावीपणे सांभाळले. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडूलकर यांनी सर्वांचे आभार मानले. या सोहळ्यात सहभागी झालेल्या बालकांनी आपले मनोगत व्यक्त करताना, ''अशी सहल दरवर्षी व्हावी,'' अशी भावना व्यक्त केली. डॉ. सुगत वाघमारे यांच्यासारख्या समाजधुरिणांमुळे आज बालगृहातील बालकांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळत आहे, असे मत यावेळी सर्व मान्यवरांनी व्यक्त केले.





### केवळ सहलच नाही, तर बाल हक्कांचा लढा!

तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रंगभरण स्पर्धा, आरोग्याप्रति जागृती निर्माण करण्यासाठी वॉकेथॉन आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांतून ही संस्था बालकांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर देत आहे. विशेष करून बालकांचे अधिकार आणि बालकांचे संरक्षण या विषयावर डॉ. वाघमारे यांनी केलेले काम अत्यंत कौतुकास्पद आहे.

## महत्त्वाचे

### तापमानाची पुन्हा चाळीसीकडे वाटचाल

**अकोला :** गत आठवड्यात पाऊस पडल्यानंतर आता पुन्हा कमाल तापमान चाळीसीकडे वाटचाल करीत असल्याचे सोमवारी जाणवले. गत आठवड्यात ३५.१ अंश सेल्सिअस असलेले तापमान २३ मार्च रोजी ३९.४ अंशांपर्यंत पोहोचले. आगामी काळात उष्णतेच्या तीन लाटा येणार असल्याचा अंदाज हवामान अभ्यासकांकडून वर्तवण्यात आला आहे. गतवर्षी जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला होता. जिल्ह्यात वर्षाकाठी सरासरी ६९३ मि.मी. पाऊस पडणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र ७३२ मि.मी. पाऊस झाला होता. खरीपनंतर रब्बीमध्येही अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे यंदाचा उन्हाळा कमी जाणवेल, असा सामान्यांचा अंदाज होता. मात्र, फेब्रुवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात तापमान ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नोंदवण्यात आले. मार्चमध्येही ऊन प्रचंड तापले. २ मार्च रोजी तर अकोल्यात भारतात सर्वाधिक ३८.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. गत आठवड्यात तापमान ४० अंशांपेक्षा कमी होते, मात्र आता पारा पुन्हा चाळीसीकडे वाटचाल करीत असल्याचे सोमवारी स्पष्ट झाले.

# महानगरातील ८१ झोपडपट्ट्यांचे होणार सर्वेक्षण

## एजन्सी नेमणूक करण्याचा ठराव मंजूर; अतिक्रमणधारकांना मिळणार जमिनीचे पट्टे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** अकोला महानगरपालिकेच्या सोमवारी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत शहरातील ८१ झोपडपट्ट्या आणि गावठाण विस्तार भागातील रहिवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. खासगी एजन्सीमार्फत या भागांचे सर्वेक्षण करून येथील झोपडपट्टीधारकांना ३० वर्षांच्या कालावधीसाठी जमिनीचे पट्टे देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे शहरातील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, आता हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ही सभा पार पडली. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन अंतर्गत शहरातील शासकीय आणि मनपाच्या जागांवर भूखंडाचे पट्टे वाटप करण्यासाठी अभिकर्ता (एजन्सी) नेमणुकीचा विषय मांडण्यात आला. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पट्टे वाटप प्रक्रिया गतीने होणे आवश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आला. शहरातील अनधिकृत बांधकामे आणि गुंठेवारीतील घरांच्या प्रश्नावरही सभेत सकारात्मक चर्चा झाली. गुंठेवारी भागातील बांधकामे नियमित करण्यासाठीची मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढवून मिळावी, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला. यामुळे अनेक घरमालकांना आपली मालमत्ता कायदेशीर करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या विषयांवरील चर्चेत स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्यासह आशिष पवित्रकार, मंजुषा शेळके, निलेश देव, पराग गवई, सागर भारुका, हरीश अलीमचंदानी, सुनील मेश्राम, गिरीश गोखले, निलोफर खान आणि आझाद खान या नगरसेवकांनी सहभाग घेतला. झोपडपट्टी पुनर्वसन आणि पट्टे वाटपाच्या प्रस्तावासोबतच नगरोत्थान महाअभियान, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार कार्यक्रम आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार योजनेतील कामांनाही हिरवा कंदील दाखवण्यात आला.

**शहरात दहा हजार घरकुलांचे उद्दिष्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पीएम आवास योजना टप्पा दोन अंतर्गत शहरात दहा हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती महापौर शारदा खेडकर व स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी दिली. रिक्त भूखंड व गावठाण जमिनीवर नवीन शासन नियमानुसार पट्टे देण्याचा निर्णय झाला आहे. यामुळे अतिक्रमणधारकांना घरकुल मिळण्यासोबतच घराचा नकाशा मंजूर होऊन बँक कर्ज घेण्याचा मार्गही मोकळा होणार आहे.

**या विषयांना दिली मंजुरी**

शहरातील गुंठेवारी वसाहतींच्या संदर्भात महाराष्ट्र गुंठेवारी विकास प्रकरणांना मुदतवाढ देण्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. याव्यतिरिक्त, जिल्हा नियोजन समितीच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार कार्यक्रम, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना आणि नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामांच्या प्रस्तावांना या सभेत मंजुरी देण्यात आली.



### मच्छर अगरबत्ती व गढूळ पाणी घेऊन नगरसेवक सभागृहात

शहरात वाढलेले डासांचे प्रमाण आणि दूषित पाणीपुरवठ्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस नगरसेवक आझाद खान हे चक्क मच्छर अगरबत्ती आणि एका बाटलीमध्ये गढूळ पाणी घेऊन सभागृहात आले. यावेळी त्यांनी अनेक भागातील वस्तुस्थिती मांडली. सभेदरम्यान उपायुक्त विजय पारतवार यांना त्यांनी उपरोधिक भेट म्हणून अगरबत्ती व गढूळ पाणी दिले.

### ७ हजार घरांचा डीपीआर, मात्र प्रत्यक्ष केवळ ३ हजार

शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेसाठी ७ हजार घरकुलांचा डीपीआर महापालिकेने तयार केला होता. मात्र प्रत्यक्षात केवळ ३ हजार घरकुलांचे बांधकाम झाले असल्याची माहिती नगरसेवक निलेश देव यांनी दिली. याशिवाय बिर्ला कॉलनीत गेल्या अनेक वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांचाही यात विचार व्हावा, असे मत त्यांनी मांडले.

# उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन फेटाळला

## हिदायत पटेल हत्या प्रकरण

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २३ :** अकोट तालुक्यातील मोहाळा गावात घडलेल्या काँग्रेस नेते हिदायत पटेल हत्या प्रकरणात आरोपींना मोठा झटका बसला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणातील दोन्ही प्रमुख आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. त्यामुळे आता आरोपींवरील अटकेची कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

६ जानेवारी २०२६ रोजी ही धक्कादायक घटना घडली होती. हिदायत पटेल हे नमाज अदा करून गावातील मशिदीत बसले असताना त्यांच्यावर अचानक चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुद्दीन मोहम्मद आदिल आणि काँग्रेसचे अकोट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष संजय बोडखे यांच्यासह इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक टाळण्यासाठी संबंधित आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, तपासादरम्यान समोर आलेले पुरावे, मृत्यूपूर्वीचा जबाब आणि साक्षीदारांची निवेदने लक्षात घेता न्यायालयाने हा अर्ज नामंजूर केला.

न्यायालयीन प्रक्रियेत असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, प्रकरण अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून आरोपींची कोठडीत चौकशी करणे आवश्यक आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीन मंजूर करणे योग्य ठरणार नाही. या निर्णयामुळे तपास यंत्रणांना मोठा आधार मिळाला असून पुढील तपास अधिक वेगाने होण्याची शक्यता आहे.

एकूणच, हिदायत पटेल हत्या प्रकरणात न्यायालयाने घेतलेली ही कठोर भूमिका महत्त्वाची मानली जात असून, आता पुढील कायदेशीर घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मलकापूरमध्ये सिनेमा स्टाईल पाठलाग करून चोरटा जेरबंद

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** अकोला शहरात गेल्या काही महिन्यांपासून चोरीच्या घटनांनी अक्षरशः थैमान घातले असून, खदान पोलीस स्टेशन हद्दीतील मलकापूर परिसर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नागरिकांच्या सतर्कतेमुळे आज एक मोठी चोरीची घटना टळली, मात्र वाढत्या गुन्हेगारीमुळे स्थानिकांमध्ये भीतीचे सावट अधिक गडद झाले आहे. मलकापूर परिसरात मागील दोन-तीन महिन्यांत लाखो रुपयांच्या चोऱ्या झाल्याने असुरक्षिततेची भावना आहे. १८ तारखेला एका अपार्टमेंटमधून दुचाकी चोरीचा प्रयत्न झाला होता, जो सीसीटीव्हीमध्ये कैद झाला.

दरम्यान, आज आरोग्यधाम कॉलनी परिसरात दोन संशयित चोरीच्या उद्देशाने फिरत असल्याचे सीसीटीव्हीत दिसताच स्थानिक नागरिक वैभव ठाकूर व इतरांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी चोरट्यांनी चाकू काढून नागरिकांवर हल्ल्याचा प्रयत्न केला आणि पळ काढला. मात्र, नागरिकांनी न डगमगता सिनेमा स्टाईल पाठलाग करून एका चोरट्याला रंगेहात पकडले, तर दुसरा साथीदार फरार झाला. पकडलेल्या संशयिताला खदान पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



या घटनेनंतर नागरिकांचा संताप अनावर झाला असून, नगरसेवक पराग गवई यांच्यासह स्थानिकांनी या भागात तातडीने पोलीस चौकी उभारण्याची मागणी केली आहे. ''वारंवार चोऱ्या होत असताना पोलिसांनी गस्त वाढवावी,'' असे घरमालक प्रकाश शिरसाट यांनी म्हटले. या परिस्थितीवर भाष्य करताना शिक्षक संतोष देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली. ''चोर पकडताना जीव धोक्यात घालावा लागतोय,'' अशी व्यथा एका महिलेने अश्रूभरल्या डोळ्यांनी मांडली. खदान पोलिसांनी फरार आरोपीचा शोध सुरू असून गस्त वाढवण्याचे आश्वासन दिले आहे. आता पोलीस प्रशासन यावर काय ठोस पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जुगार अड्ड्यावर छापा, १७ आरोपी जेरबंद

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** अकोला जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या ''ऑपरेशन प्रहार'' मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत बाळापूर तालुक्यातील लोहारा शेतशिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या धाडसी कारवाईत तब्बल १७ आरोपींना रंगेहात पकडण्यात आले असून एकूण ४ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.१० वाजता लोहारा परिसरात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खात्री करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ सापळा रचत अड्ड्यावर छापा टाकला.

छाप्यात आरोपी जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सर्व आरोपींना ताब्यात घेतले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांची कडक नजर असल्याचा स्पष्ट संदेश गुन्हेगारांना मिळाला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकात एपीआय विजय चव्हाण, तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता. पोलीस सूत्रांचे म्हणणे: ''अकोला जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असून कोणालाही कायदा हातात घेऊ दिला जाणार नाही,'' असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### जप्त मुद्देमालात समावेश

५२ ताश पत्त्यांचे संच, ९६ हजार रुपये रोख रक्कम, ७ मोबाईल फोन (किंमत ७० हजार रुपये), ३ मोटारसायकली (किंमत २ लक्ष ७० हजार रुपये), एकूण: ४ लक्ष ३६ हजार रुपये

# झोपडीतून थेट यशाला गवसणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** बार्शीटाकळी तालुक्यातील सकनी या लहानशा गावातील एका जिद्दी तरुणाने गरिबीवर मात करत यशाचे शिखर गाठले आहे. झोपडीत राहून आणि कोणत्याही सोयीसुविधा नसताना प्रशिस दिलीप सोनोने याने स्पर्धा परीक्षेत यश मिळवून कृषी अधिकारी पदाला गवसणी घातली. या प्रेरणादायी यशाबद्दल माँ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.

वाचनालयाचे अध्यक्ष तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष पंजाबराव वर आणि कार्यकारी संपादिका सुनंदा वर यांनी प्रशिस व त्याच्या कुटुंबाला पुष्पगुच्छ आणि 'गाथा रमाईची' ग्रंथ भेट देऊन गौरविले. अत्यंत बिकट परिस्थितीत बीएस्सी ॲग्री पूर्ण करून प्रशिसने हे यश संपादन केले आहे. त्याच्या कुटुंबात शिक्षणाचा वारसा असून, त्याचे काका बुद्धभूषण सोनोने (उपशिक्षणाधिकारी) आणि दिनेश सोनोने (आरटीओ) यांच्या मार्गदर्शनाखाली कुटुंबातील अनेक सदस्य उच्च पदस्थ आहेत.या सत्कार सोहळ्याला सोनोने आणि आडोळे कुटुंबातील सदस्यांसह इंजि. आनंद सोनोने, करुणा नाईक, श्रद्धा इंगोले, छाया डापसे व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''प्रशिसचा हा प्रवास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल,'' असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



## दुर्लक्ष | महापालिका आणि हायवे प्राधिकरणाच्या वादात नागरिक वेठीस

# अकोल्यातील राष्ट्रीय महामार्गावर अंधारराज

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या शिवनी ते पीडीकेव्ही (रीधोरा) या राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे गेल्या सहा महिन्यांपासून बंद अवस्थेत आहेत. विशेष म्हणजे, ५० टक्क्यांहून अधिक पथदिवे बंद असतानाही अकोला महानगरपालिकेचा विद्युत विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. या कुंभकर्णी झोपेमुळे वाहन चालकांना जीवघेण्या अंधारातून प्रवास करावा लागत असून, लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शिवनी ते रिधोरा हा रस्ता तांत्रिकदृष्ट्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे या मार्गावरील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याची प्राथमिक जबाबदारी नॅशनल हायवेची आहे. मात्र, हा मार्ग शहराच्या वर्दळीच्या भागातून जात असल्याने, शहरात येणाऱ्या मुख्य प्रवेशद्वारांची स्थिती सुव्यवस्थित ठेवणे ही जबाबदारी महापालिकेची देखील आहे. दुर्दैवाने, हा रस्ता आमच्या अखत्यारीत येत नाही असे तांत्रिक कारण पुढे करून मनपा प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या मार्गावर अंधाराचे साम्राज्य आहे. कृषी विद्यापीठ शैक्षणिक क्षेत्र असल्याने येथे विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. पुलावरील पथदिवे बंद असल्याने वळण घेताना वाहनधारकांना अंदाज येत नाही. निमवाडी ते वाशिम बायपास हा व्यावसायिक पट्टा असून होलसेल किराणा बाजारामुळे येथे जड वाहनांची ये-जा मोठी असते. येथील अनेक खांबांवरील दिवे निकामी झाल्याने रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे कठीण झाले आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर सहा महिन्यांपासून अंधार असताना स्थानिक लोकप्रतिनिधींनी अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत.



❑ या मार्गावरील पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी नॅशनल हायवेची आहे. तरीही, नागरिकांची गैरसोय लक्षात घेता आम्ही या विभागाला तातडीने लेखी कळवत आहोत. बंद असलेले पथदिवे पुन्हा सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

**- रवींद्र वाकोडे,** उपअभियंता,
विद्युत विभाग, महापालिका, अकोला.

# होलीक्रॉस कॉन्व्हेंट २००१ बॅचचे 'बॅक टू स्कूल' संमेलन

**अकोला :** 'टन! टन! टन! बेल वाजली...' ही ओळ वाचताच डोळ्यांसमोर उभी राहते ती आपली शाळा आणि मधल्या सुटीची ती लगबग! काळाच्या ओघात आयुष्याच्या वाटा जरी वेगळ्या झाल्या असल्या, तरी शालेय जीवनातील त्या सोनेरी आठवणी आजही काळजाच्या कोपऱ्यात ताज्या आहेत. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी होली क्रॉस कॉन्व्हेंट हायस्कूलच्या २००१ च्या बॅचचे एक अभूतपूर्व पुनर्मिलन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

तब्बल पंचवीस वर्षांनंतर, जुने मित्र-मैत्रिणी पुन्हा एकदा आपल्या लाडक्या शाळेच्या प्रांगणात एकत्र येणार आहेत. केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर पुन्हा एकदा विद्यार्थी होऊन शाळेतील ते वर्ग, व्हरांडे आणि लाडक्या बाकांवर बसण्याची ओढ प्रत्येक माजी विद्यार्थ्यामध्ये दिसून येत आहे. शाळेचा तो डबा, मधल्या सुटीतील दंगामस्ती आणि मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेले ते क्षण पुन्हा एकदा जगण्याची ही अनोखी संधी आहे. या दोन दिवसांच्या कार्यक्रमात केवळ गप्पागोष्टीच नव्हे, तर जुन्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील त्या निरागस खोडकरपणाला उजाळा देणारे विशेष उपक्रमही राबवण्यात येणार आहेत.

येत्या २५ आणि २६ एप्रिल २०२६ रोजी अकोल्यात होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या संमेलनात 'बॅक टू स्कूल' ही संकल्पना खऱ्या अर्थाने अनुभवता येणार आहे. या संमेलनाबाबत २००१ बॅचच्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, ज्याप्रमाणे शाळेत हजेरी अनिवार्य असायची, हजेरी न लावल्यास नाव ब्लॅकबोर्डवर लिहिले जाईल अशा मजेशीर आणि काहीसा मिश्कील आग्रह धरत आयोजकांनी सर्व बॅचमेट्सना या सोहळ्यासाठी आमंत्रित केले आहे. तुम्ही या बॅचचे भाग आहात का? चला तर मग, पुन्हा एकदा आपल्या मुळांकडे वळूया आणि त्या सोनेरी दिवसांना साद घालूया!






**अधिक माहितीसाठी आणि नाव नोंदणीसाठी रहीम ढोडीया +२५६७५७१०१९८४ (व्हॉट्सअ‍ॅप) व गिरीश भांगे +६१४११३०५१४४ (व्हॉट्सअ‍ॅप) यांच्याशी त्वरित संपर्क साधावा.**

अजिंक्य भारत

# आपलं अकोला/वाशिम

अकोला, मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकातर्फे हुतात्म्यांना अभिवादन



**मूर्तीजापूर :** भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदान दिनानिमित्त (हुतात्मा दिन) मूर्तीजापूर येथे त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक, कुरणखेडच्या वतीने मूर्तीजापूर बायपास येथील स्मारक परिसरात हा अभिवादन कार्यक्रम पार पडला.

२३ मार्च १९३१ रोजी लाहोर कट प्रकरणी ब्रिटिश सरकारने या तिन्ही वीरपुत्रांना फाशी दिली होती. त्यांच्या सर्वोच्च बलिदानाची स्मृती जपण्यासाठी दरवर्षी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. या कार्यक्रमाला मूर्तीजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीधर गुट्टे, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संजय गुप्ता, माजी सैनिक मंगेश घुगे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष उज्ज्वल ठाकरे, बचाव पथकाचे प्रमुख योगेश विजयकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांनी क्रांतिकारकांच्या स्मारकाचे पूजन करून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला विजय माल्टे, शाहबाज शाह, बाळा लाळे, सौरभ हुतके, अक्षय मोरे, शेख मोईन, दिनेश श्रीनाथ, शुभम दामोदर, वसीमोद्दीन, अजय माल्टे, निखिल गुप्ता, योगेश खांदेल, राजीक अली यांच्यासह बचाव पथकाचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पदवी वितरण सोहळा उत्साहात

**मूर्तीजापूर :** श्री डॉ. आर. जी. राठोड कला व विज्ञान महाविद्यालय, मूर्तीजापूर येथे उन्हाळी परीक्षा-२०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवी वितरण समारंभ अत्यंत उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या पदवी वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. पी. चर्जन होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती दमयंतीबाई राठोड तसेच संस्थेचे सचिव डॉ. अनिल राठोड यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान प्रा. आर. एच. खंदारे व प्रा. डॉ. ए. एस. निमकर यांनी विद्यार्थ्यांना पदवी स्वीकारण्यासाठी पाचारण केले.

प्राचार्य डॉ. चर्जन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. उच्च शिक्षण आणि करिअरमध्ये प्रगती करतानाच विद्यार्थ्यांनी समाजासाठी एक जबाबदार नागरिक म्हणून कार्य करावे,असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा दमयंतीबाई राठोड, सचिव डॉ. ए. आर. राठोड आणि प्राचार्य डॉ. ए. पी. चर्जन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### निधन वार्ता

### देवकाबाई राऊत



**पातूर :** येथील गुरुवार पेठ रहिवासी देवकाबाई नामदेव राऊत (८०) यांचे आज, सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

## अजिंक्य भारतच्या वृत्ताची विधानसभेत दखल

# चतारी ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न गाजला!

### आ. नितीन देशमुख यांनी मांडली ठाम भूमिका; आरोग्य मंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**सुकळी, दि. २३ :** पातूर तालुक्यातील चतारी येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत दुरवस्थेत असून रुग्णांचा जीव धोक्यात असल्याची बाब 'दै. अजिंक्य भारत' वृत्तपत्राने सातत्याने लावून धरली होती. या वृत्ताची गंभीर दखल घेत बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन देशमुख यांनी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. विशेष म्हणजे, आमदारांनी विधानसभेत भाषण करताना 'दै. अजिंक्य भारत'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीचा थेट संदर्भ देत प्रशासकीय दिरंगाईवर जोरदार ताशेरे ओढले. या आक्रमक पवित्र्यामुळे आरोग्य मंत्र्यांनी अखेर या प्रश्नावर सकारात्मक पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले आहे.



चतारी येथील ग्रामीण रुग्णालयाची दुरवस्था आता सीमा ओलांडून गेली आहे. पावसाळ्यात छतातून पाणी गळणे, स्लॅबला तडे जाणे आणि भिंतींना पडलेल्या मोठ्या भेगांमुळे ही इमारत केव्हाही कोसळू शकते, अशी भयावह स्थिती आहे. येथे येणारे रुग्ण आणि सेवा देणारे कर्मचारी यांना आपला जीव मुठीत धरून वावरावे लागते. वारंवार तक्रारी करूनही आरोग्य विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात होता.

या ज्वलंत प्रश्नावर 'दै. अजिंक्य भारत'ने वस्तुस्थिती मांडणारे वृत्त प्रसिद्ध करून प्रशासकीय यंत्रणेचे लक्ष वेधले होते. आमदार नितीन देशमुख यांनी विधानसभेच्या पटलावर हा विषय मांडताना थेट या वृत्तपत्रातील बातमी दाखवत सरकारला चतारीच्या स्थितीची जाणीव करून दिली. रुग्णालयाची नवी इमारत हा चैनीचा भाग नसून तो चतारी परिसरातील हजारो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या आक्रमक पाठपुराव्यामुळे आरोग्य मंत्र्यांनी तातडीने बैठक घेऊन नवीन इमारतीच्या प्रस्तावावर चर्चा करण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे आता चतारी रुग्णालयाचा वनवास संपण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

### सर्वसामान्यांच्या आवाजाचा विधानसभेत घुमटा!

चतारी रुग्णालयाची जीर्ण वास्तवता चव्हाट्यावर आणणाऱ्या 'अजिंक्य भारत'च्या वृत्ताची दखल घेतल्याने हा प्रश्न विधानसभेपर्यंत पोहोचला. आमदारांनी सभागृहात या बातमीचा संदर्भ घेतल्याने आता चतारीच्या आरोग्य सुविधेला नवसंजीवनी मिळणार असून, हा सर्वसामान्यांच्या आवाजाचा विजय मानला जात आहे.

## टाकळी खुर्द येथे पाणीटंचाईचा उद्रेक; संतप्त महिला आक्रमक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २३ :** अकोट तालुक्यातील गट ग्रामपंचायत टाकळी खुर्द येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने महिला आणि पुरुष नागरिक आक्रमक झाले आहेत. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना अकोला जिल्ह्यात उच्चांकी तापमानाची नोंद होत आहे, अशा परिस्थितीत गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या गंभीर बाबीची दखल घेत प्रहारचे उपजिल्हाप्रमुख जीवन खवले यांनी ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत प्रशासनाला जाब विचारला.

टाकळी खुर्द येथील नागरिकांना गेल्या १५ दिवसांपासून पिण्याचे पाणी मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. जीवन खवले यांनी तातडीने गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली की, उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांना पाण्यापासून वंचित का ठेवले जात आहे? तसेच गावात तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्याची आक्रमक मागणी त्यांनी केली.


यावेळी प्रहारचे उपजिल्हाप्रमुख जीवन खवले यांच्यासह माजी सरपंच मंगेश ताडे, ग्रामपंचायत सदस्य जमीन शाह, संतोष बुंदे, ग्रामपंचायत कर्मचारी राजूभाऊ ताडे, यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.

# बाळापुरात धाडसी घरफोडी

### चोरट्यांनी कपाटाचे कुलूप तोडून लाखोंचे दागिने पळविले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २३ :** शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या शोएब कॉलनी परिसरात अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सुमारे ३ लाख ६२ हजार ५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. भरवस्तीत झालेल्या या धाडसी घरफोडीमुळे शहर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांसमोर चोरट्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शोएब कॉलनीतील रहिवासी आणि धान्य व्यापारी मिर्झा निसार बेग गुलजार बेग (३५) हे २१ मार्च रोजी



रात्री ८ वाजेच्या सुमारास कुटुंबासह जळगाव जामोद येथे नातेवाईकांकडे गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. २२ मार्च रोजी रात्री १०:३० वाजता मिर्झा निसार बेग घरी परतले असता, त्यांना घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. संशय आल्याने त्यांनी आत जाऊन पाहिले असता बेडरूमचे आणि कपाटाचे कुलूप तोडलेले आढळले. कपाटातील सोन्याचे नेकलेस, पोत, अंगठ्या, बाळी, लॉकेट-चैन आणि चांदीचे दागिने असा एकूण ३ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळविला. या वेळी मिर्झा बेग यांनी चोरी झाल्याचे लक्षात आल्या नंतर बाळापूर पोलीस स्टेशन गाठून याप्रकरणी फिर्याद दिली यावरुन बाळापूर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३), ३३१(४) व ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक शरद सैदाने या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे पोलिसांनी रात्रगस्त वाढवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह!

» बाळापूर शहराच्या मध्यवस्तीत आणि वर्दळीच्या भागात घरफोडी झाल्याने पोलिसांच्या रात्रगस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सध्या लग्नसराई आणि सणासुदीच्या काळात अनेक नागरिक घराला कुलूप लावून बाहेरगावी जात आहेत, याचाच फायदा चोरटे

## मूर्तीजापूर तालुक्यातील शिरसो फाटा येथे राष्ट्रभक्तीचा जागर

### गजानन हरणे यांना समर्पण पुरस्कार प्रदान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तीजापूर, दि. २३ :** भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदान स्मृती दिनानिमित्त शिरसो फाटा येथील हॉटेल सोनचाफा परिसरात 'शहीदांना वंदन' व सामूहिक उपवास कार्यक्रम उत्साहात पार पडला. भूमिपुत्र फाउंडेशन, संत वासुदेव महाराज भूमिपुत्र अभियान, श्री वासुदेव गोशाळा व गुरुदेव सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यात अकोल्याचे ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे यांना सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'समर्पण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.



यावेळी फाऊंडेशनचे संस्थापक जयदीप सोनखासकर, गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष बबनराव देशमुख, ज्येष्ठ साहित्यिक गजानन कदम (पुणे), निळकंठ गिऱ्हे, बाबुराव ढोले, बंडूभाऊ सांगळूदकर, प्रशांत उपाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांद्वारे हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. गेल्या ३५ वर्षांपासून दीन-दलित, दिव्यांग व वंचित घटकांसाठी निस्वार्थ सेवा देणाऱ्या गजानन हरणे यांचा मानपत्र व गौरववस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गाडगे बाबा यांच्या विचारातून समाजसेवा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामकृष्ण खोपे, सौरभ वानखडे, गजानन उंबरकर, प्रमिला गवई, जिया भोसले, रवी देविकर व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने गुरुदेव भक्त व नागरिक उपस्थित होते.

## पंचफुलादेवी पाटील महाविद्यालयात पदवीदान सोहळा

### १०३ विद्यार्थ्यांना पदवी; गुणवंतांचा गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** ''समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी जीवनात मानवता जपली पाहिजे. मानवकल्याण हाच खरा धर्म असून, तुमच्या हातून देशहिताचे कार्य घडले पाहिजे,'' असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. संकेत काळे यांनी केले. खडकी येथील श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालयात सत्र २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांचा पदवी वितरण व गुणवंत सत्कार समारंभ सोमवारी पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. डॉ. सुरेशराव काळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भालचंद्र देशमुख, डॉ. कविता कावरे, प्राचार्य डॉ. बळीराम अवचार व विभागप्रमुख डॉ. केतन वाकोडे उपस्थित होते. या सोहळ्यात बी.एस.डब्ल्यू. मधील २९ आणि एम.एस.डब्ल्यू. मधील ७४ अशा एकूण १०३ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. तसेच आचार्य पदवी प्राप्त डॉ. अतुल भांगे, डॉ. राजकुमार वजीरे आणि पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेली अंकिता पवार, उच्च लघुलेखक ऋषिकेश नांदुरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेशराव काळे यांनी विद्यार्थ्यांना कष्टातून मिळवलेल्या पदवीचा मान राखून संस्थेचे नाव उज्वल करण्याचे आवाहन केले. डॉ. भालचंद्र देशमुख यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी प्रा. नवनाथ बडे, प्रा. मनोहर वागतकर, डॉ. अर्चना धर्मे, डॉ. बळवंत पाटील, डॉ. सुगत मोहोड उपस्थित होते. संचालन प्रा. पी. आर. पाचपुते यांनी केले, तर आभार डॉ. बळवंत पाटील यांनी मानले.

### विशेष प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

**अकोला:** जनगणना संचालनालय व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचा-यांसाठी जनगणनाविषयक तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ आज नियोजनभवनात झाला. जनगणना कक्षाचा शुभारंभही यावेळी झाला.

विविध लोककल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अचूक जनगणना महत्वपूर्ण असते. त्यादृष्टीने अचूक नोंदी घेणे आवश्यक आहे. संकलनातून कोणतीही माहिती सुटता कामा नये, तसेच कुठल्याही नोंदीची पुनरावृत्ती होणार नाही, याचीही खबरदारी घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी यावेळी केले. प्रशिक्षणातून जनगणना प्रक्रियेची प्रत्येक तरतूद समजून घेऊन त्यानुसार परिपूर्ण अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## लाखपुरी ते शेगाव पायदळ वारीचे उत्साहात प्रस्थान



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**लाखपुरी, दि. २३ :** श्रीराम नवमीनिमित्त श्री क्षेत्र विदर्भ काशी लाखपुरी ते विदर्भ पंढरी शेगावकडे भव्य पायदळ वारीचे प्रस्थान झाले. २२ मार्च रोजी ठाकूरदास अरोरा व मीना अरोरा यांच्या हस्ते पालखी पूजन झाले. लक्षेश्वर महाराज संस्थानात संजय व योगिता जोगी यांनी पूजन केले. दिंडीत त्रिलोक महाराज, गंगाधर जोगी, डॉ. महेंद्र नवघरे, डॉ. दिलीप नवघरे, संजू भारसाखळे, राजेश चोरे, बाळासाहेब व अविनाश पाटील गावंडे, नारायण मावळे यांनी सेवा दिली.

मार्गावर मोहनराव टेकाडे, मधुकर बोपटे, अन्नदाते रमेशजी राठी, विठ्ठलराव हुरसाळ, विजय पागृत, राजेश शर्मा, देवलसिंग राजपूत, चंद्रजीत व शेखर देशमुख, डॉ. राहुल राऊत, निलेश जोगी, गोकुळ माहुले, नीळकंठ पाटील, दत्ता पाटील, श्याम व सुरेश महाराज, सचिन कावरे, मोहन पाटील, रवींद्र व सागर वडतकर यांनी चहा, नाश्ता व भोजनाची व्यवस्था केली. नियोजनासाठी दिलीप अवघड, कवी देशमुख, महेंद्र डहाके, प्रभाकर नवघरे, गजानन व शरद डवरे, कुणाल चव्हाण, सुनील गोरे, सचिन पंडित, क्षेत्रपाल मुगोना, सोनू, शुभम व अनुज देशमुख, वीरेंद्र चव्हाण, दत्ता नाचणे, घनश्याम शर्मा, त्रिशूल इंगळे, गजानन नवघरे, नितीन साबळे, नाना मेहर आणि प्रीतम मोहन देशमुख परिश्रम घेत आहेत. दिंडीचे नेतृत्व दत्ता नाचणे, महेंद्र डहाके, विजेंद्र देशमुख व संतोष उभाळ करत आहेत.

## जागतिक क्षयरोग दिन | निक्षय मित्र बनण्याचे मनपाचे आवाहन

# होय, आपण क्षयरोग संपवू शकतो; लोकसहभागातून टीबीमुक्तीचा निर्धार!

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. २३ :** क्षयरोग (टीबी) हा जगातील मृत्यूच्या प्रमुख १० कारणांपैकी एक असला, तरी योग्य उपचार आणि जनसहभागाच्या जोरावर आपण या आजारावर नक्कीच विजय मिळवू शकतो. होय! आपण क्षयरोग निश्चित संपवू शकतो या ब्रीदवाक्यासह यंदाचा जागतिक क्षयरोग दिन साजरा केला जात असून, २०२६ पर्यंत भारत टीबीमुक्त करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, अशी माहिती शहर क्षयरोग अधिकारी डॉ. निखिल लहाने यांनी दिली.

डॉ. रॉबर्ट कोच यांनी १८८२ मध्ये क्षयरोगाच्या जिवाणूचा शोध लावला, तेव्हापासून या आजारावर उपचार करणे सुलभ झाले आहे. मात्र, आजही अज्ञान आणि अर्धवट उपचार ही मोठी आव्हाने आहेत. टीबी केवळ गरिबांनाच होतो, हा समज चुकीचा असून हा आजार कोणालाही होऊ शकतो. केस आणि नखे वगळता शरीराच्या कोणत्याही अवयवाला टीबीची लागण होऊ शकते. सततचा खोकला, ताप, वजन कमी होणे आणि थुंकीतून रक्त येणे ही याची प्राथमिक लक्षणे आहेत.

मधुमेही, एचआयव्ही बाधित आणि कमी रोगप्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींना याचा धोका अधिक असतो. शासकीय रुग्णालयांत यावर मोफत चाचणी आणि औषधोपचार उपलब्ध आहेत. रुग्णांनी ६ ते १८ महिन्यांचा उपचार पूर्ण करणे अनिवार्य आहे; अन्यथा एमडीआर टीबीचा गंभीर धोका संभवतो. शासनाकडून रुग्णांना निक्षय पोषण योजनेअंतर्गत दरमहा १००० रुपये अनुदानही दिले जाते. अकोलेकरांनी निक्षय मित्र बनून रुग्णांना दत्तक घ्यावे आणि टीबीमुक्त भारताच्या मोहिमेत योगदान द्यावे, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

### तुम्हीही बनू शकता निक्षय मित्र!

क्षयरुग्णांना पोषक आहार पुरवण्यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान राबवले आहे.

याअंतर्गत कोणतीही व्यक्ती किंवा संस्था निक्षय मित्र म्हणून नोंदणी करून रुग्णांना ६ महिने ते ३ वर्षांपर्यंत कोरडा शिधा देऊ शकते.

नाव नोंदणीसाठी [https://communitysupport.nikshay.in](https://communitysupport.nikshay.in) या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा १८००-११-६६६६ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

## पाढरी भागातील मालमत्ता नोंदी न.प.कडे हस्तांतरित करा

### गटनेत्या फाटकर यांची नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २३ :** तेल्हारा नगरपरिषदेच्या हद्दवाढीनंतर प्रभाग क्रमांक १ मध्ये समाविष्ट झालेल्या पाढरी या भागातील मालमत्ता नोंदी कोठा ग्रामपंचायतीकडून नगरपरिषदेकडे विधिवत हस्तांतरित कराव्यात, अशी मागणी गटनेत्या तथा नगरसेविका कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

पाढरी हा भाग यापूर्वी कोठा ग्रामपंचायत हद्दीत होता. हद्दवाढीनंतर या क्षेत्राचा समावेश तेल्हारा नगरपरिषदेच्या प्रभाग १ मध्ये करण्यात आला आहे. मात्र, अद्याप मालमत्ता नोंदी नगरपरिषदेकडे हस्तांतरित न झाल्याने नागरिकांना मालमत्ता कर नोंदणी, नाव फेरफार, बांधकाम परवानगी आणि घरकुल योजनेचा लाभ घेताना अडचणी येत आहेत. कोठा येथील ग्रामसेवकांनी हस्तांतरणाबाबत पत्रव्यवहार केला असून, नगरपरिषदेने आता ही प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून नागरिकांची कामे मार्गी लागतील, असे फाटकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

महत्त्वाचे

## नवोदयमध्ये डंका! स्नेहलची ९६.२५ टक्के गुणांसह उत्तुंग भरारी



**वाशिम :** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही गगनभरारी घेऊ शकतात, हे वाघी (जि. वाशिम) येथील स्नेहल रामदास खरात या विद्यार्थिनीने सिद्ध केले आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत स्नेहलने ९६.२५ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले असून, नवोदयसाठी निवड होणारी ती गावातील पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात तिचे कौतुक होत आहे. स्नेहल ही सध्या येवती येथील श्री शिवाजी विद्यालयात पाचव्या वर्गात शिक्षण घेत आहे. तिचे वर्गशिक्षक रोही यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन आणि स्नेहलने घेतलेले अपार कष्ट यामुळेच हे यश मिळाल्याची भावना तिचे वडील रामदास खरात यांनी व्यक्त केली.

## बसस्थानकावर अंधाराचे साम्राज्य

**मानोराः** येथील बसस्थानकावर सायंकाळच्या वेळी अक्षरशः अंधाराचे साम्राज्य पसरलेले दिसून आले. प्रवाशांसाठी लावण्यात आलेल्या लाईट्सची व्यवस्था असूनही त्या सुरू केल्या जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः महिला प्रवाशांना अंधारामुळे मोठ्या प्रमाणात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. बसस्थानकावर योग्य प्रकाशयोजना नसल्याने संशयास्पद हालचालींना वाव मिळत असून, एखादी अप्रिय घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ''लाईन आहे, खांब आहेत, पण लाईट चालू करणार कोण?'' असा सवाल प्रशासनाला केला जात आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

## ३२ जागांसाठी ४३१ उमेदवारांची झुंज; लेखी परीक्षेचा निकाल जाहीर

**वाशिमः** वाशिम जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई संवर्गाच्या रिक्त असलेल्या ३२ पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेने आता अंतिम टप्पा गाठला आहे. या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या लेखी परीक्षेचा निकाल १९ मार्च रोजी अधिकृतपणे जाहीर करण्यात आला. यामुळे आता यशस्वी उमेदवारांचे भवितव्य अंतिम निवड यादीवर अवलंबून आहे. या भरतीसाठी फेब्रुवारी महिन्यात (११ ते १४ फेब्रुवारी) कडाक्याच्या थंडीत मैदानी चाचण्या पार पडल्या होत्या. यामध्ये १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे आणि गोळाफेक अशा शारीरिक क्षमता चाचण्यांचा समावेश होता. या चाचण्यांमध्ये हजारो तरुणांनी नशीब आजमावले होते. त्यापैकी शारीरिक क्षमतेत पात्र ठरलेल्या आणि उच्चांकी गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून एकास दहा या प्रमाणानुसार एकूण ४३१ उमेदवारांची लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आली होती. निवड झालेल्या या उमेदवारांची लेखी परीक्षा १५ मार्च रोजी पार पडली. अत्यंत पारदर्शक पद्धतीने आणि कडक बंदोबस्तात ही प्रक्रिया राबवण्यात आली. लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याने आता कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय चाचणीनंतर अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या तरुणांमध्ये आता कमालीची उत्सुकता पाहायला मिळत आहे.

# कारंजा जीवन प्राधिकरणाचा मुजोर कारभार

## थकबाकीच्या नावाखाली प्रामाणिक जनतेची नाकेबंदी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा (लाड), दि. २३ :** थकबाकी वसुलीच्या नावाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने (मजीप्रा) कारंजा शहरात अक्षरशः मोगलाई सुरू केली आहे. आपल्या अजब आणि संतापजनक कार्यशैलीमुळे हे प्राधिकरण सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा आणि टीकेचा विषय बनले आहे. थकीत पाणी बिल वसुलीसाठी ॲक्शन मोडवर आल्याचा आव आणणाऱ्या या विभागाने, चक्क नियमित बिल भरणाऱ्या निष्पाप नागरिकांनाही तहानलेले ठेवून त्यांच्या मानवाधिकारावर गदा आणली आहे. प्रशासनाच्या या अघोरी कारवाईमुळे कारंजातील जनसामान्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

सविस्तर वृत्त असे की, शहरातील पंचशील नगर, मंगरुळ वेस, दाईपुरा आणि ओंकारेश्वर मंदिर परिसरातील पाणीपुरवठा गेल्या अनेक दिवसांपासून जाणीवपूर्वक खंडित करण्यात आला होता. रणरणत्या उन्हात पाण्याचा थेंब न मिळाल्याने या भागातील महिलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती करावी लागली. विशेष म्हणजे, ज्या कुटुंबांनी एकही रुपया थकबाकी न ठेवता वेळेवर पाणीपट्टी भरली, त्यांनाही या सामूहिक शिक्षेचा धनी व्हावे लागले. थकबाकीदारांचे वैयक्तिक कनेक्शन कापण्याऐवजी, संपूर्ण परिसराची मुख्य जलवाहिनीच बंद करून प्रशासनाने आपल्या अकार्यक्षमतेचे प्रदर्शन घडवले आहे. प्रशासनाच्या या आडमुठ्या धोरणाने संतापलेल्या शेकडो महिलांनी आज, २३ मार्च रोजी जीवन प्राधिकरण कार्यालयावर धडक दिली. ''आम्ही नियमित कर भरतो, मग आमच्या घरातील नळ कोरडे का?'' असा जळजळीत सवाल करत महिलांनी अधिकाऱ्यांना घेराव घातला. कित्येक दिवसांपासून पाणी नसल्याने महिलांचे हाल होत असताना, एसी केबिनमध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांना जनतेच्या वेदना दिसत नाहीत का, असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला. ''तुमच्या वसुलीच्या नियोजनासाठी आम्हाला तहानलेले ठेवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?'' अशा शब्दांत महिलांनी आपला रोष व्यक्त केला.

या प्रकरणाची माहिती मिळताच प्रभागाचे नगरसेवक नदीम अहमद यांनी तातडीने जीवन प्राधिकरण कार्यालय गाठले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी अत्यंत आक्रमक भाषेत चर्चा करून प्रशासनाच्या बेजबाबदार धोरणाचा पंचनामा केला. ''थकबाकीदारांवर कारवाई करण्यासाठी तुमच्याकडे कायदेशीर तरतुदी आहेत, मात्र संपूर्ण वस्तीला वेठीस धरणे हा निव्वळ जुलूम आहे. हा तानाशाही कारभार तातडीने थांबवून पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास, संपूर्ण कार्यालय कुलूपबंद करू,'' असा थेट इशारा त्यांनी दिला.

नगरसेवक आणि रणरागिणींच्या या आक्रमक पवित्र्यापुढे अखेर मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी नांगी टाकली. आपल्या चुकीच्या धोरणामुळे निर्माण झालेला हा पेच सोडवण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आणि खंडित केलेला पाणीपुरवठा युद्धपातळीवर पुन्हा सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले. गेल्या अनेक दिवसांपासून पाण्यासाठी वनवन करणाऱ्या महिलांना यामुळे मोठा दिलासा मिळाला असला, तरी भविष्यात अशा प्रकारचा अमानवीय प्रयोग पुन्हा केल्यास जनता गप्प बसणार नाही, हा इशारा प्रशासनापर्यंत स्पष्टपणे पोहोचला आहे.

## रामनवमी यात्रेसाठी देशभरातून भाविक दाखल, सेवाकार्याचा धडाका



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २३ :** बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे रामनवमी यात्रेनिमित्त देशभरातून भाविकांचा ओघ सुरू झाला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतून लाखो भाविक पायदळ पोहरादेवीत दाखल होत आहेत. या पार्श्वभूमीवर, तपस्वी डॉ. रामराव महाराज समाधी स्थळावर भाविकांसाठी महाप्रसाद, पिण्याचे पाणी, निवास आणि विसाव्याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. बापू समाधीचे पुजारी देवीभक्त शेखर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा उपक्रम २६ मार्चपर्यंत अहोरात्र सुरू राहणार आहे. रामनवमीनिमित्त भाविक मोठ्या श्रद्धेने जगदंबा माता, संत सेवालाल महाराज आणि तपस्वी रामराव महाराज यांच्या दर्शनासाठी येतात. विशेषतः दक्षिण भारतातील भाविक ४१ दिवसांची कडक दीक्षा घेऊन, अनवाणी पायांनी शेकडो मैलांचा प्रवास करून येथे आपला नवस फेडण्यासाठी येतात. २३ मार्चपासून भाविकांची गर्दी प्रचंड वाढली असून, संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघाला आहे. या सेवा कार्यात महंत संजय महाराज, सुभाष महाराज, धर्मराज महाराज, सुवर्ण महाराज यांच्यासह अनेक सेवेकरी परिश्रम घेत आहेत. भाविकांच्या सुविधेसाठी राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## मानोरा चोरी प्रकरणातील आरोपी महिला वाशिममध्ये अटकेत!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २३ :** मानोरा येथील एका कापड दुकानात खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पर्समधून ४४ हजार रुपये आणि मोबाईल लंपास करणाऱ्या अट्टल चोरट्या महिलेला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासातच वाशिममधून ताब्यात घेतले. सौ. रोहिणी उर्फ शीतल भास्कर शिंदे (वय २५, रा. नालंदा नगर, वाशिम) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे.

भुली (ता. मानोरा) येथील रहिवासी सौ. सुरेखा शालीक लिबोंळे या २३ मार्च रोजी मानोरा येथील चुन्नू मुन्नू कापड दुकानात खरेदीसाठी गेल्या होत्या. गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात महिलेने त्यांच्या पर्समधील ४४ हजार रुपये रोख आणि एक मोबाईल पळविला. चोरी झाल्याचे लक्षात येताच सुरेखा लिबोंळे यांनी मानोरा पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांनी तात्काळ एक पथक तयार करून मानोरा येथे रवाना केले. पथकाने घटनास्थळाचा पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फूटेज तपासले.

एलसीबीच्या पथकाने वाशिम शहरात कसून शोध सुरू केला असता, सिव्हील लाईन परिसरात एक संशयित महिला आपल्या लहान मुलासह दिसून आली. महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने तिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, तिने मानोरा येथील कापड दुकानात चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अंगझडती घेतली असता तिच्याकडे चोरीचे ४४ हजार रुपये आणि मोबाईल मिळून आला.या महिलेने अशाच प्रकारचे आणखी गुन्हे केले आहेत का, याचा तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, सपोनि योगेश धोत्रे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी दक्ष राहावे : जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २३ :** गत दोन आठवड्यापासून उन्हाची तिव्रता अचानक वाढली असून उष्णतेच्या बाबतीत वाशिम जिल्हा नेहमीच अग्रस्थानावर असतो. यावर्षीसुध्दा तापमान वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघाताबाबत काळजी घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात शुक्रवारी (दि. २०) रोजी आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुंभेजकर पुढे म्हणाले, दिवसा व रात्रीच्या उकाड्यात वाढ झाली असून सामान्यपेक्षा तापमान जास्त राहण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट लक्षात घेता प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. दुपारी १२ ते ४ या वेळात कोणतेही कार्यक्रम घेऊ नयेत. लहान मुले, वयोवृध्द नागरिक आणि व्याधीग्रस्त नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक स्तरावर उष्माघाताबाबत जनजागृती करावी. शाळा, अंगणवाडी आदींच्या वेळेत बदल करण्याचे शिक्षण विभागाने निर्देश द्यावेत, तसेच आरोग्य यंत्रणाही सतर्क ठेवावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी सांगितले की, ग्रामीण भागात पाणीपुरवठा, सावलीची व्यवस्था व जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जाईल. ग्रामपातळीवर आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्त्यांमार्फत उष्माघाताबाबत माहिती पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## भाजपच्या प्रशिक्षण शिबिराने कार्यकर्त्यांत फुंकले चैतन्य

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. २३ :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६ अंतर्गत वाशिम शहर, तालुका आणि अनसिंग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर स्थानिक महेश भवन येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. २२ आणि २३ मार्च रोजी पार पडलेल्या या अभियानातून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना संघटन बांधणी आणि विचारधारेची बूस्टर डोस देण्यात आली.

पाच सत्रांतून संघटनात्मक बांधणीवर भर अभियानाच्या पहिल्या दिवशी पाच महत्वपूर्ण संघटनात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चीतलांगे, आमदार श्याम खोडे, माजी आमदार विजयराव जाधव आणि नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी जिल्हा संयोजक सुनील राजे, डॉ. दीपक ढोके, अशोक हेडा, सौ. संगीता इंगोले यांच्यासह शहराध्यक्ष मनीष मंत्री, संतोष उगले पाटील, एकनाथ कड पाटील व संतोष मुरकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सत्रांना जिल्हा निवडणूक प्रभारी राजू पाटील राजे, भास्करराव रंगभाळ, शंकरराव कोकास, माहुले काका, रत्नाकर ढोके आणि जिल्हा उपाध्यक्ष धनंजय रणखांब यांनी मार्गदर्शन केले. महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. कविता खरात, ओबीसी मोर्चाचे रामा ठेंगडे आणि कामगार प्रकोष्ठाचे रामा इंगळे यांनीही आपापल्या विभागातील बांधणीबाबत मते मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हेमलता विसपुते व सूरज चौधरी यांनी केले. अनिल सोनवणे आणि सौ. रूपाली देशमुख यांनी प्रेरणादायी वर्ग गीताचे सादरीकरण केले.

## शेलूबाजारमध्ये गणगोरोत्सव उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शेलूबाजार, दि. २३ :** येथील राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपारिक गणगोरोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू झालेल्या या १५ दिवसांच्या उत्सवाची सांगता मिरवणूक आणि विसर्जनाने झाली. या निमित्ताने संपूर्ण शेलूबाजार परिसरात राजस्थानी संस्कृतीचे दर्शन घडले. गणगोर उत्सवाची सुरुवात रंगपंचमीपासून होते. यामध्ये सप्तमीच्या दिवशी शीतला मातेचे पूजन केले जाते. ईसर-गौरा (शंकर-पार्वती) यांचे प्रतीक असलेल्या कुंड्यांमध्ये धान्य पेरून दररोज विधीवत पूजन केले जाते. उत्सवादरम्यान महिला आणि तरुणी एकत्रितपणे पारंपारिक मारवाडी गीते गाऊन भक्तीमय वातावरण निर्माण करतात.

पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी सिंजारा साजरा करण्यात आला. या दिवशी ईसरजी आणि गौरा मातेची पाटावर स्थापना करून विशेष पूजा करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत राजस्थानी महिला मंडळाच्या सदस्या आणि तरुणी पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ईसर-गौरा रूपातील कुंड्यांचे पूजन करून कथा सांगण्यात आली. आरतीनंतर सायंकाळी भक्तीपूर्ण वातावरणात मातेचे विसर्जन करण्यात आले.

रेशीम जोड | जिल्ह्यात तुती लागवडीसाठी ४ लाखांपर्यंत अनुदान!

# शेतकऱ्यांनो, रेशीम उद्योगाकडे वळा आणि व्हा मालामाल!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २३ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी रेशीम संचालनालय, नागपूरच्या वतीने महारेशीम २०२६ हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात नवीन तुती लागवडीसाठी २०० एकरचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, रेशीम शेतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून लाखो रुपयांचे अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे.

रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी शासनामार्फत दोन प्रमुख योजना राबविल्या जात आहेत.तुती लागवड, जोपासना आणि कीटक संगोपन गृहासाठी तीन वर्षांत सुमारे ४ लाख ३२ हजार रुपये मजुरी व साहित्य खर्चासाठी दिले जातात.

सिल्क समग्र-२ (केंद्र पुरस्कृत): या योजनेत सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७५% तर अनुसूचित जाती-जमातींसाठी ९०% अनुदान दिले जाते. यामध्ये लागवड, ठिबक सिंचन आणि संगोपन साहित्यासह एकूण ३.७५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळते.

जिल्हा रेशीम अधिकारी सुनील दत्त प्रभाकर फडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या जिल्ह्यात ९० शेतकऱ्यांनी १०४ एकरवर तुती लागवड केली आहे. यामध्ये रिसोड तालुका (४५ एकर) आघाडीवर असून, त्यापाठोपाठ मालेगाव (२३ एकर) आणि वाशिम (१७ एकर) तालुक्यांचा क्रमांक लागतो. सन २०२६-२७ साठी आतापर्यंत २१ शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली आहे.

### पोकरा योजनेचाही आधार

नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत वाशिम जिल्ह्यातील १८९ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावातील इच्छुक शेतकऱ्यांनी ग्राम विकास समितीकडे अर्ज करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रिया**

इच्छुक शेतकऱ्यांनी वस्त्रोद्योग विभागाच्या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करताना खालील बाबींची पूर्तता करावी लागेल:

कागदपत्रे: आधार कार्ड, ७/१२ उतारा, ८-अ, स्वाक्षरीचा नमुना आणि क्षेत्राचे छायाचित्र. अर्जांची पडताळणी जिल्हा रेशीम अधिकाऱ्यांमार्फत करून त्यास मंजुरी दिली जाते.

## विनामूल्य अभिनय कार्यशाळा; चित्रपट आणि नाटकात झळकण्याची सुवर्णसंधी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २३ :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद (मुंबई) संयुक्त शाखा मानोरा-मालेगाव, नटश्री बहुउद्देशीय संस्था आणि स्त्रीशक्ती बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मानोरा येथे पाच दिवसीय विनामूल्य अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. २४ ते २८ मार्च या कालावधीत डॉ. सुहास देशमुख यांच्या रुग्णालयाजवळील देशमुख सभागृहात हा उपक्रम पार पडणार असून, यामध्ये व्यक्तिमत्व विकासावरही भर दिला जाणार आहे.

या कार्यशाळेत १२ ते ६५ वयोगटातील कोणताही इच्छुक नागरिक सहभाग घेऊ शकतो. शिबिरादरम्यान नाट्य क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक नाटक आणि त्याचे प्रकार, अभिनय म्हणजे काय?, अभिनयाचे विविध पैलू तसेच नाट्य व चित्रपट सृष्टीतील तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. कलेची आवड असणाऱ्यांना शास्त्रीय प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रशिक्षणार्थींना केवळ मार्गदर्शनच मिळणार नाही, तर त्यांना व्यावसायिक नाटके आणि चित्रपटांमध्ये काम करण्याची संधीही उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व शिबिरार्थींना संस्थेच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

सहभागाचे आवाहन

अभिनय क्षेत्राची ओढ असलेल्या जास्तीत जास्त नागरिकांनी या विनामूल्य संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नाट्य परिषद शाखेचे प्रमुख कार्यवाह यशवंत पद्मगीरवार यांनी केले आहे.

**महत्त्वाचे**

## चंदन अग्रवाल यांना स्नेहसंवर्धन पुरस्कार



**मूर्तिजापूर** : महाराष्ट्रातील जीवन संस्कृती आणि परंपरेत एकरूप झालेल्या व्यक्तींचा गौरव करणाऱ्या आंतरभारतीचा यावर्षीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते तथा पुस्तक व्यवसायी चंदन अग्रवाल यांना प्रदान करण्यात आला. मूर्तीजापूर येथील पाचव्या शेतकरी साहित्य संमेलनादरम्यान हा सोहळा पार पडला. अग्रवाल यांनी यापूर्वी स्काऊट गाईड क्षेत्रात राज्यपाल व राष्ट्रपती पुरस्कारांसह पंतप्रधान ढाल सलग तीनदा पटकावली आहे. ते भक्तीधाम मंदिर ट्रस्ट, मोक्षधाम समिती, स्वच्छता अभियान, व्यापारी महासंघ, अ.भा. ग्राहक पंचायत आणि श्री पुंडलिक बाबा गौरक्षण संस्था अशा अनेक संस्थांच्या माध्यमातून समाजकार्यात अग्रेसर आहेत. हा पुरस्कार संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीकांत तिडके यांच्या हस्ते व माजी आमदार सरोज काशीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला. यावेळी जनमंच नागपूरचे अध्यक्ष राजीव जगताप, सचिव विठ्ठलराव जावळकर, जागर मंचचे संस्थापक प्रशांत गावंडे, संस्थानचे अध्यक्ष विठ्ठलराव पातोंड आणि स्वागताध्यक्ष पंकज कांबे उपस्थित होते. गेल्या वर्षी हा पुरस्कार रमेशचंद्र कुर्मी यांना देण्यात आला होता. अग्रवाल यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**निधन वार्ता**

### केशव शिरसाट



**रोहणा** : येथील रहिवासी केशव विश्राम शिरसाट (८४) यांचे रविवार, २२ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रोहणा परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. केशव शिरसाट हे अतिशय मनमिळाऊ आणि शांत स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, १ मुलगी, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रोहणा येथील स्थानिक स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील नागरिक, विविध क्षेत्रांतील मान्यवर व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रवींद्र दिवनाले



**रोंदळा** : येथील रहिवासी व ह.भ.प. हरिभाऊ विश्वनाथ दिवनाले यांचे लहान भाऊ रवींद्र विश्वनाथ दिवनाले (५२) यांचे सोमवार, २३ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रोंदळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रवींद्र दिवनाले हे मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, तीन भाऊ, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रोंदळा येथील स्थानिक स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांडपाणी घरात शिरल्याने ग्रामस्थ आक्रमक

## आज दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २३ : दहीहंडा फाटा ते दहीहंडा या रस्त्याच्या संथ आणि नियोजित कामाचा फटका किनखेड पूर्णा येथील ग्रामस्थांना बसत आहे. रस्त्याच्या कामादरम्यान खोदलेली नाली व्यवस्थित न केल्यामुळे सांडपाणी थेट लोकांच्या घरात आणि मुख्य म्हणजे ग्रामदैवत श्री खंडोबा मंदिर परिसरात साचत आहे. या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावत असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.**



रस्त्याचे काम करणाऱ्या इंद्रजित कंपनीच्या नियोजित आराखड्याअभावी नालीतील दूषित पाणी नागरिकांच्या घरात शिरत असल्याचा आरोप होत आहे. त्यातच मंदिरासमोर साचणाऱ्या घाण पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

याबाबत ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी विचारणा केली असता, कंपनीच्या व्यवस्थापनाकडून सुरुवातीला टाळाटाळ करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, पत्रकारांनी संपर्क साधल्यानंतर नालीचे काम आजच पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन व्यवस्थापकाने दिले आहे.

प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास उपजिल्हाध्यक्ष जीवन खवले, प्रल्हाद सपकाळ आणि नरेंद्र पाटील इंगळे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. विकासाच्या नावाखाली देवस्थान आणि घरांत घाण पाणी येणार असेल, तर हे काम नेमके कोणाच्या हिताचे? असा रोकडा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

### धुळीचा उच्छाद अन् आरोग्याचा प्रश्न

रस्त्याच्या कामासोबतच परिसरात सुरू असलेल्या क्रॅशर मशीनमुळे उडणाऱ्या धुळीचा प्रचंड त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. ही धूळ थेट घरात शिरत असल्याने श्वसनाचे आजार बळावण्याची भीती निर्माण झाली असून, कंपनीने यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

## आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर नंदापूर, दि. २३ :** पोटाची खळगी भरण्यासाठी आई-वडील मुंबईत काबाडकष्ट उपसत असताना, गावी एकट्या असलेल्या आजीची सुश्रूषा करण्यासाठी आलेल्या २२ वर्षीय प्रतीक्षा दीपक आडोळे या तरुणीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही हृदयद्रावक घटना रविवार, रोजी सायंकाळच्या सुमारास पातूर नंदापूर येथे घडली. या घटनेने संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, एका उमलत्या जिवाच्या अशा अंतामुळे हळहळ व्यक्त होत आहे. प्रतीक्षाचे वडील दीपक आडोळे हे कुटुंबासह मुंबईला मजुरीसाठी स्थायिक आहेत. गावी राहणाऱ्या प्रतीक्षाच्या आजीच्या डोळ्यांचे ऑपरेशन झाले होते. आजीची देखभाल करण्यासाठी वडिलांनी मोठ्या आशेने प्रतीक्षाला गावी पाठवले होते. रविवारी दुपारी आजी गावातच एका नातेवाईकाकडे कार्यक्रमासाठी गेली होती. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आजी घरी परतली असता, घराचा दरवाजा आतून बंद होता. बराच वेळ हाका मारूनही प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी नातेवाईक विजय आडोळे यांच्या मदतीने दरवाजा तोडण्यात आला. मात्र, आत जाताच प्रतीक्षाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला आणि एकच टाहो फुटला. माहिती मिळताच पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे आणि बीट जमादार चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मूर्तिजापूर येथे पाठवण्यात आला आहे. आजी-नातीचा प्रेमाचा संसार सुरू असताना प्रतीक्षाने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे गूढ अद्याप कायम आहे.

# मुलाच्या निधनानंतर अवघ्या चार दिवसांत माऊलीनेही सोडला प्राण!

## एक चिता शांत होत नाही तोच दुसरीला अग्नी; गवई कुटुंबावर कोसळला दु:खाचा डोंगर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**आलेगाव, दि. २३ :** आईचे मुलाप्रती असलेले प्रेम अथांग आणि शब्दांत न मांडता येणारे असते, याची प्रचिती खामगाव तालुक्यातील आंबेटाकळी येथे पाहायला मिळाली. शेतकरी भास्कर पंढरी गवई (५६) यांच्या निधनानंतर, मुलाचा विरह सहन न झाल्याने त्यांची वृद्ध माता धुरपताबाई पंढरी गवई (८७) यांनीही अवघ्या चार दिवसांत जगाचा निरोप घेतला. एकाच कुटुंबातील दोन प्रमुख व्यक्तींच्या जाण्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, भास्कर गवई यांचे १८ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले होते. अवघ्या ५६ व्या वर्षी तरुण मुलाचा आधार हिरावल्याने ८७ वर्षीय धुरपताबाईंना मोठा मानसिक धक्का बसला. मुलाच्या निधनाचे दु:ख त्या पचवू शकल्या नाहीत आणि रविवार, २२ मार्च रोजी त्यांचीही प्राणज्योत मालवली. एक चिता शांत होत नाही तोच दुसऱ्या चितेला अग्नी देण्याची वेळ गवई कुटुंबावर आल्याने उपस्थित प्रत्येकाचे डोळे पाणावले होते.

धुरपताबाई गवई यांचे मूळ गाव पातूर तालुक्यातील उमरा होते. ५७ व्या वर्षी पतीच्या निधनानंतर त्यांनी अत्यंत मेहनतीने प्रपंच उभा केला होता. विशेष म्हणजे, वयाच्या ८७ व्या वर्षीही त्यांचे सर्व दात शाबूत होते आणि केसही पांढरे झाले नव्हते. आजही त्या दाताने कडक सुपारी फोडत असत. अशा कडक शरीरयष्टीच्या माऊलीने मुलाच्या विरहात प्राण सोडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दोन सुना, नातवंडे बराच मोठा आप्त परिवार आहे.

# शेतकऱ्यांनी आता प्रश्न विचारायला शिकले पाहिजे!

## पाचव्या शेतकरी साहित्य संमेलनात डॉ. श्रीकांत तिडके यांचे आवाहन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २३ :** जोपर्यंत शेतकरी जागरूक होऊन प्रश्न विचारणार नाही, तोपर्यंत सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधी शेती प्रश्नांकडे लक्ष देणार नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आपल्या हक्कासाठी प्रश्न विचारायला शिकले पाहिजे,'' असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीकांत तिडके यांनी केले. संत पुंडलिक महाराज यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित पाचव्या शेतकरी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. माजी आमदार सरोज काशीकर यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी शरद जोशींच्या नेतृत्वातील आंदोलनाची आठवण करून देत, आज शेतकऱ्यांची संघर्ष करण्याची क्षमता कमी होत असल्याची खंत व्यक्त केली. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष पंकज




कांबे, जनमंचचे अध्यक्ष राजू जगताप, संस्थानचे अध्यक्ष विठ्ठल पातोंड उपस्थित होते. यावेळी रमेश गणेशपुरे, गोलू गुप्ता यांना शेतकरी प्रेरणा पुरस्कार, प्रा. अविनाश बेलाडकर यांना जनमंच पत्रकारिता पुरस्कार तर चंदन अग्रवाल यांना स्नेह संवर्धन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भव्य ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दुपारच्या सत्रात प्रशांत गावंडे यांनी भारत-अमेरिका करार तर गोवर्धन खवले यांनी निसर्गोपचार विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक राजू वानखडे यांनी, तर संचालन देवानंद मुसळे, प्रा. सुधाकर गौरखेडे व डॉ. राजकन्या खणखणे यांनी केले. आभार प्रमोद राजंदेकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी अरुण बोंडे, कैलास साबळे, नंदकिशोर बभानिया, मुन्ना नाईकनवरे, श्रीकांत वानखडे, निखिल गावंडे, अवी पोळकट, चंदू वानखडे, प्रमोद खेडकर, सुभाष मोरे व प्रफुल मालधुरे यांनी परिश्रम घेतले.

# मूर्तिजापुरात १० व्या राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलनाचा जागर; रसिक श्रोत्यांची लाभली मांदियाळी

## साहित्य अन् तंत्रज्ञानाचा प्रवास अधिक सुखकर; संमेलनाध्यक्षा डॉ. मंदा नांदुरकर यांचे प्रतिपादन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २३ :** तीक्ष्णगत मल्टीपर्पज सोसायटी (अकोला) व सृजन साहित्य संघ (मूर्तिजापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १० वे एकदिवसीय राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलन येथील भगवंत लॉन सभागृहात मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपन्न झाले. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने संमेलनाचा दिमाखदार प्रारंभ झाला.

संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. मंदा नांदुरकर म्हणाल्या की, ''साहित्य आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीने होणारा मानवी प्रवास हा भविष्यात अधिक सुखकर आणि समृद्ध




राहील.'' यावेळी उद्घाटक प्रवीण नागपुरे, प्रमुख अतिथी डॉ. श्रीकांत तिडके, डॉ. अशोक इंगळे, ॲड. नीता कचवे, शंकर घोरसे, अविनाश बेलाडकर, डॉ. तुषार बायस्कर आणि गणेश भाकरे यांनी आपापल्या भाषणातून साहित्याच्या विविध पैलूंवर आणि सामाजिक जाणीवेवर प्रकाश टाकला.या सोहळ्यात ढगोबाचे ढोल, संतश्रेष्ठ गजानन महाराज करुणाष्टक, येता जाता आणि स्मृतिगंध या चार महत्त्वपूर्ण पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच, सेंद्रिय शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या हातगाव येथील स्वावलंबी शेतीगटाचा विशेष सन्मान करून साहित्यासोबतच कृषी संस्कृतीचाही गौरव करण्यात आला. किशोर बळी यांच्या हास्यबळी डॉट कॉम या कार्यक्रमाने रसिकांना खळखळून हसवले, तर निमंत्रित कवींचे कविसंमेलन आणि गझल मुशायऱ्याने संमेलनात रंगत भरली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र जवादे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रमोद पंत यांनी मानले. अंबेचरण ननीर यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी विलास वानखडे, सुनील ढोकणे, किशोर आष्टीकर, शैलेश गिरी, विनोद महल्ले, मीना जवादे, नीलिमा आष्टीकर, प्रा. योगिता चिंचे, प्रा. वर्षा कावरे, रामकृष्ण आसरे, ज्ञानदेव भड आणि विलास निलखन यांच्यासह सर्व आयोजक मंडळाने परिश्रम घेतले.

# दहिगाव येथे 'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष' शाखेचे उद्घाटन

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटित व्हा; प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांचे आवाहन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २३ :** तालुक्यातील दहिगाव येथे महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या नवीन शाखेचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या हस्ते फित कापून शाखेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.




याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना प्रशांत डिक्कर म्हणाले की, संस्थापक अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्ष राज्यभर पायमुळे घट्ट करत आहे. शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांसाठी आमचा कार्यकर्ता रस्त्यावर उतरून लढत आहे. 'गाव तेथे शाखा आणि घर तिथे शिवविचार' पोहोचवण्यासाठी युवकांची मोठी फळी सक्रिय झाली आहे. तेल्हारा तहसीलवरील ऐतिहासिक मोर्चाचा उल्लेख करत ते पुढे म्हणाले की, ''कर्जमुक्तीसाठी काढलेल्या त्या पहिल्या धडक मोर्चामुळेच सरकारला झुकून कर्जमाफी जाहीर करणे भाग पडले. आता कापूस आणि सोयाबीनला योग्य भाव मिळवण्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा संघटित व्हावे लागेल.

यावेळी बुलढाणा जिल्हाध्यक्ष गोपाल पाटील, आशिष शेळके, रोहित पाटील ताथोड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला सरपंच रविकिरण काकड, उपसरपंच धरमसिंग सोळंके, शाळा समिती अध्यक्ष दुर्गेश सोळंके, शाखा अध्यक्ष शुभम ईसापुरे यांच्यासह गावातील शेतकरी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अक्षय अवताळे यांनी केले.

**भारतीय संस्कृती** | पारंपारिक खाद्यसंस्कृतीचा उत्साह शिगेला

# मंगरुळपीर तालुक्यात घराघरांत कुरडई-पापडांचा धडाका!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २३ :** मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू होताच उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच, दुसरीकडे महिला वर्गासाठी मात्र ही सुवर्णसंधी ठरत आहे. मंगरुळपीर तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात सध्या उन्हाळी वाळवण म्हणजेच कुरडई, पापड, सांडगे आणि शेवया तयार करण्याची मोठी लगबग पाहायला मिळत आहे.



भारतीय संस्कृतीमध्ये उन्हाळी वाळवणाला विशेष महत्त्व आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच वर्षभरासाठी लागणारे हे पदार्थ तयार करण्याची परंपरा आजही टिकून आहे. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात हे चित्र अधिक ठळकपणे दिसत असून, सकाळी लवकर उठून महिलांचे गट एकत्र येत ही कामे उरकत आहेत. कडक उन्हामुळे हे पदार्थ उत्तमरीत्या वाळतात, त्यामुळे वाढत्या तापमानाचा फायदा घेत महिलांनी कामाचा धडाका लावला आहे.

तालुक्यात प्रामुख्याने गव्हाच्या कुरड्या, तांदळाचे व बटाट्याचे पापड, चकली, वेफर्स आणि डाळीचे वडे तयार करण्यावर भर दिला जात आहे. अनेक घरांमध्ये हे काम घरगुती स्तरावर चालत असले, तरी काही महिलांनी यातून लघुउद्योगही सुरू केला आहे. वाढत्या मागणीमुळे व्यावसायिक स्तरावरही या पदार्थांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. प्रचंड उन्हातही घामाच्या धारा पुसत महिला अतिशय उत्साहात ही कामे करत असून, अंगणे आणि घराची गच्ची वाळवणाने पांढरीशुभ्र दिसत आहे.

### लघुउद्योगाला मिळाली उभारी

गेल्या काही वर्षांत उन्हाळी वाळवण केवळ घरगुती न राहता तो एक उत्पन्नाचा स्रोत बनला आहे. मंगरुळपीर परिसरातील अनेक महिला बचत गटांनी कुरडई-पापड विक्रीचा व्यवसाय सुरू केला असून, घरगुती चवीच्या या पदार्थांना बाजारात मोठी मागणी आहे.

# भारतीय जैन संघटनेची संवाद यात्रा; जनसंपर्क अभियान जलसंवर्धनावर मंथन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २३ :** भारतीय जैन संघटनेच्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या संवाद यात्रेने अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील समाज बांधवांशी जनसंपर्क केला. जनसंपर्क अभियानात जैन समाजातील पुरुष आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात जलसंवर्धनावर मंथन झाले.

ओसवाल भवनात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष केतन भाई शाह, राज्य महासचिव प्रवीण पारख, राज्य कार्यकारिणी सदस्य अमरीश पारेख आणि सन्मती जैन, विभागीय अध्यक्ष किर्ती कुमार वायकोस, अकोला महानगर अध्यक्ष विमल जैन आणि महिला विंग अध्यक्ष ममता जैन व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतपर भाषण विमल जैन यांनी तर प्रास्ताविक प्रा. सुभाष गादीया यांनी केले. बैठकित समीप इंदाने, नरेश चौधरी,निलेश गोठी, सचिन पारेख, सनिश शाह, हितेश शाह, रितेश जैन यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महावीर मांगुळकर यांनी तर आभार प्रदर्शन निलेश गोठी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी समीप इंदाने, शैलेंद्र पारख, प्रशांत कोठारी, विजय चौधरी, नरेश चौधरी, प्रविण कर्नावट, प्रशांत सावलकर,विमल जैन, निलेश गोठी, ममता जैन, सचिन पारेख, सनिश शाह, हितेश शाह, वैभव वोरा, निखिल नाले, दिनेश जैन सुमित चौधरी, रितेश जैन, पराग शाह, रितेश खाबिया, हेमंत बेलोकार, वैभव मेहता, अभिमन्यू जैन, डॉ. राहुल कोठारी, डॉ. तुषार जैन, मंजू जैन, अस्मिता नांदेडकर, चेताली साखरे, माधुरी बोडखे यांनी परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार, दि. २३ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून मारहाण

**खामगाव :** मोताळा : तालुक्यातील माळेगाव येथील एका ४० वर्षीय नराधमाने शेजारी राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला घरात ओढून तिचा विनयभंग केला. पीडितेने विरोध केला असता, तिला बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पीडित मुलगी आणि आरोपी कैलास भागवत भांचे हे शेजारी शेजारी राहतात. १९ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास, जेव्हा पीडितेची आई आणि मावशी घरात होत्याा, तेव्हा आरोपीच्या आईने पीडितेची दिशाभूल केली. गुढीपाडव्याचे जेवण आहे, ते घेऊन जा, असे सांगून तिला घरात बोलावले. निरागस मुलगी जेवण घेण्यासाठी घरात गेली असता, दबा धरून बसलेल्या आरोपी कैलास भांचे याने तिचा रस्ता अडवला. पीडिता स्वयंपाकघरात शिरताच आरोपीने तिचे दोन्ही हात धरून तिचे तोंड दाबले आणि अश्लील कृत्य करण्याचा प्रयत केला. पीडितेने विरोध केला असता, आरोपीने पीडितेचे केस धरून तिला दोन्ही गालावर चापटबुक्क्यांनी मारले.

### पिं. राजा पोलीस स्टेशनतर्फे शांतता समितीची बैठक

**खामगाव :** तालुक्यातील पिंपळगाव राजा पोलीस स्टेशन तर्फे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सर्व समाजातील लोकांचे सण एकोप्याने साजरे करावे व एकमेकांचे सण आदर व उत्साहाने साजरे करावे. कोणत्याही प्रकारे गैर कृत्य होणार नाही याची दखल घ्यावी तसेच कोणत्याही समाजाचे सण सुरू असताना इतर समाज बांधवांनी त्यांच्या आनंदात सहभागी व्हावे, तसेच सर्व सण उत्साहात व शांततेत साजरे करावे आणि नेहमी एकोप्याने राहावे. या बैठकीमध्ये ही वैशिष्ट्ये महत्वाची होती, या बैठकीमध्ये ठाणेदार भागवत मुळीक, नितीन सूर्यवंशी, बसंत तेलंग, सौ. सोनाबाई तेलंग, पिंटू धोरण, मनीष ठाकरे, बबलू वहिले, श्रीराम वहिले, सुदेश झांबड, मुन्ना मुल्लाजी, हसन इनाम दार, हरून शेख, लूकमान परवेज, अकबर बादशाह, आताऊल्ला खान, अब्दुल अहाद, मुक्तार खान, अब्दुल फारूक, आताउल्ला खान, सईद मुल्लाजी शेख शब्बीर, प्रल्हाद सातव सह समाजसेवक ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक या कार्यक्रमांमध्ये उपस्थित होते.

### रमजान ईद आणि पायी दिंडीचा संगम

**लोणार :** आज देशभरात रमजान ईदचा उत्साह असतानाच, सुलतानपूर येथे सामाजिक सलोख्याचे आणि बंधुभावाचे एक अतिशय सुंदर चित्र पाहायला मिळाले. एकीकडे मुस्लिम बांधव ईदची नमाज अदा करण्यासाठी ईदगाहकडे जात होते, तर दुसरीकडे त्याच मार्गावरून हिंदू बांधवांची पायी दिंडी मार्गस्थ होत होती. या दोन वे गवेगळ्या प्रवासांचा जेव्हा संगम झाला, तेव्हा धर्माच्या भिंती ओलांडून माणुसकीचे दर्शन घडले. ईदगाहकडे जाणाऱ्या मुस्लिम तरुण बांधवांनी मोठ्या उत्साहात पायी दिंडीतील वारकरी आणि हिंदू बांधवांची भेट घेतली. यावेळी मुस्लिम बांधवांनी दिंडीतील बांधवांना मनापासून रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. या हृदयस्पर्शी प्रसंगामुळे परिसरात आनंदाचे आणि सलोख्याचे वातावरण निर्माण झाले होते.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९०० - २१७६ |
| गहू | १७०० - २२५० |
| तुर | ६८०० - ८२५० |
| हरभरा | ४४५० - ५२५० |
| सोयाबीन | ४०००- ५२५० |
| उडीद | ५००० - ५००० |
| मुग | ३५०० - ४३०० |
| मका | १४०० - १४०० |

# जिल्ह्यात ४ हजार हेक्टरला अवकाळीचा तडाखा

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२३ :** दि. जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले असून सुमारे ३८०२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.



जिल्ह्यातील बहुतांश भागात गव्हाचे पीक काढणीसाठी तयार होते. यंदा समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांनी गहू व हरभरा पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती. मात्र अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाती आलेला घास हिरावून घेतला आहे. अनेक ठिकाणी उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. फळपिकांनाही या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला आहे. सध्या आंबा पिकाचा बहर असताना गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात फळगळ झाली आहे. याशिवाय द्राक्ष, लिंबूवर्गीय फळे जसे संत्री व मोसंबी, तसेच पपई पिकांनाही नुकसान सहन करावे लागले आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक गणित यामुळे पूर्णपणे बिघडले आहे. १९ मार्च रोजी जिल्ह्यात अनेक भागांत वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला. त्यामध्ये गहू, कांदा, मका, ज्वारी, केळी, डाळिंब आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुकानिहाय पाहता जळगाव जामोद तालुक्यात ४१ गावे बाधित होऊन सुमारे ९५० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. मलकापूर तालुक्यात ४२ गावे व ७५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. खामगाव तालुक्यात २० गावे व १४८ हेक्टर, चिखली तालुक्यात १८ गावे व ७१२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. तसेच मोताळा तालुक्यात १६ गावे व १०२ हेक्टर, नांदुरा तालुक्यात १५ गावे व २१० हेक्टर, बुलडाणा तालुक्यात १४ गावे व १४५ हेक्टर, देऊळगाव राजा तालुक्यात १२ गावे व ५५० हेक्टर, संग्रामपूर तालुक्यात ११ गावे व ७० हेक्टर, तर लोणार तालुक्यात १० गावे व १९० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या सर्व परिस्थितीची दखल घेत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासन व कृषी विभागाला तातडीने पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी, यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. प्रशासनानेही नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेऊन कार्यवाही सुरू केली असल्याची माहिती मिळत आहे.

# प्रधानमंत्री सूर्य घर योजनेत घरकुल लाभार्थ्यांना अखंडित वीज पुरवठा : गटविकास अधिकारी

## राष्ट्रीय पोर्टलवर लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि. २३ :** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन व सन २०२४-२५ मध्ये उद्दिष्ट मिळालेल्या राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांच्या घरावर सौर यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाने महत्वाचे पाऊल उचलून प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून छतावर एक किलो वॅट मर्यादेपर्यंत सौर यंत्रणा उभारणी करिता केंद्र शासनाकडून तीस हजार रुपये तर राज्य शासनाकडून १५ हजार रुपये मिळणार आहेत, असे गटविकास अधिकारी मुकेश माहोर यांनी सांगितले.




सदर योजनेचे उद्दिष्ट लाभार्थ्यांच्या घरावर सौर यंत्रणापासून वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवणे, वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून उत्पन्नाचा अतिरिक्त स्त्रोत्र निर्माण करून देणे. तसेच छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे महावितरणाचे विद्युत जोडणी असणे आवश्यक आहे. तदनंतर पीएम सूर्य घर च्या संकेतस्थळाला भेट देऊन राष्ट्रीय पोर्टलवर लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी करावी लागेल. ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर महावितरण मार्फत पडताळणी करून करून घ्यावे लागते. त्यानंतर विक्रेत्याकडून घरावर सौरसंच स्थापित केला जातो सदर प्रक्रिया ही ऑनलाइन असून यात विक्रेता लाभार्थ्यांना प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करतो. तसेच याप्रकरणी सूर्यघर योजनेअंतर्गत सौरसंच स्थापित करण्याकरता येणारा खर्च हा अगोदर करावा लागतो व त्यानंतर अनुदान प्राप्त होते. सौर संच बसवण्यासाठी आधार कार्ड, नमुना नंबर आठ, बँक पासबुक, पासपोर्ट साईज फोटो, इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता आहे. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन व २०२४-२५ मधील राज्य पुरस्कृत आवास योजनामधील लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतल्यास त्यांना मोफत व अखंडित वीजपुरवठा होण्यास मदत होईल, असे गटविकास अधिकारी मुकेश माहोर व विस्तार अधिकारी गजानन म्हस्के यांनी सांगितले.

# डॉ. रावनकार यांची एनसीपी सरचिटणीस पदी नियुक्ती

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२३:** येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच वैद्यकीय व्यावसायिक डॉ.ज्ञानेश्वर हरिविजय रावणकार यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खामगाव तालुका सरचिटणीस पदी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.संतोष तायडे, विधानसभा अध्यक्ष धोंडीराम खंडारे, यांचे सूचने नुसार संजय बागडे तालुका अध्यक्ष खामगाव यांनी रेस्ट हाऊस येथे झालेल्या बैठकीत नियुक्ती जाहीर करण्यात आली. डॉ.रावनकार यांनी शेगाव संग्रामपुर खामगाव परिसरात १० रुपयात उपचार अशा पद्धतीची रुग्ण सेवा केली आहे. यामुळे अनेक रुग्णांना उपचारांसाठी मदत झाली आहे. त्यांनी साधारणतः २००९ पासून अशा प्रकारे रुग्ण सेवा केली आहे. याचा लाभ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाला होईल यात शंका नाही. गेल्या अनेक महिन्यांपासून ही नियुक्ती वरिष्ठांच्या विचारात होती. खामगाव नगरपालिका निवडणुकीत डॉ रावनकार यांनी पक्षाचा प्रचार करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. या नियुक्तीने पक्षाला शहरात आणि ग्रामीण भागातही फायदा होईल असा अंदाज आहे, डॉ संतोष तायडे, खंडारे, बागडे यांनी ही नियुक्ती केली.



# राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचे यश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२३ :** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई, विभागीय कार्यालय नागपूर आणि शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय भव्य तंत्र-प्रकल्प स्पर्धेमध्ये शासकीय तंत्रनिकेतन खामगांव येथील विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक कौशल्याची चुणूक दाखवत स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रुपये १,००,०००/- व प्रमाणपत्र प्राप्त केले. या तंत्रप्रदर्शनीचे उद्घाटन अमरावती विभागीय सहसंचालक डॉ विजय मानकर यांनी केले तर तंत्रशिक्षण विभागीय परीक्षा मंडळ नागपुर




येथील डॉ.लिल्हारे आणि यवतमाळ तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सुहास गजरे व ईतर मान्यवर मंचावर उपस्थित होते.

या स्पर्धेत संस्थेतील यंत्र अभियांत्रिकी आणि अणुविद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी संयुक्तपणे सादर केलेल्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पाला राजस्तरावर गौरविण्यात आले आहे. या यशस्वी चमूमध्ये गौरव अपार, सानिका बाठे, मधुमिता दिघे, सुजाता शहाणे आणि भाग्यश्री देसाई या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत आपल्या प्रकल्पाच्या तांत्रिक अचूकतेने, कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या तंत्रज्ञानाने आणि उत्कृष्ट सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली.

# मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत खेळाडू निवड चाचणी ५ एप्रिलला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२३ :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे.

या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. १ एप्रिल २०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. निवड निकष : खेडाळू हा ३१ डिसेंबरपर्यंत २१ वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी खेळाडू गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल.

# भेसळयुक्त खवा व पनीर विकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२३ :** जिल्ह्यातील दूध उत्पादन, दुधाचा वापर आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीतील ताळमेळ तसेच भेसळयुक्त पदार्थांच्या वाढत्या तक्रारींबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दूध भेसळ नियंत्रण समितीची बैठक पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेसळयुक्त पदार्थ विकून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उत्पादक आणि पुरवठादारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत. अलीकडच्या काळात बाजारपेठेत पाम तेल, साखर आणि स्किम्ड मिल्क पावडरचा वापर करून तयार केलेला पदार्थ खवा म्हणून, तर पाम तेलापासून बनवलेले चीज ॲनालॉग हे पनीर म्हणून विकले जात असल्याचे समोर आले आहे. हे पदार्थ प्रामुख्याने गुजरात राज्यातून १० किलोच्या बॅगांमध्ये स्पेशल बर्फी किंवा प्लास्टिक डब्यांमध्ये हलवा या नावाने येतात. नियमानुसार, असे पदार्थ विकताना ते पाम तेल व मिल्क सॉलिडपासून बनवलेले आहेत, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना देणे विक्रेत्यांवर बंधनकारक आहे. मात्र, अनेक विक्रेते छुप्या पद्धतीने याची विक्री करत असून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर, हॉटेल, रेस्टॉरंट आणि मिठाई विक्रेत्यांनी आपल्या मेनू कार्ड किंवा फलकावर अशा पदार्थांची स्पष्ट माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना सांगितले की, अन्नपदार्थ खरेदी करताना त्यावरील लेबल, घटक आणि प्रकार नीट तपासावेत. कोणत्याही संशयास्पद किंवा भेसळयुक्त पदार्थांबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे किंवा १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर त्वारित तक्रार नोंदवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# विजयाचा जयघोष : वाईच्या मातीत घुमला आई रेणुका संचाचा गोंधळ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२३ :** जय भवानी गोंधळी मंडळ वाई (रोहना) ता. आर्वी जि. वर्धा विदर्भ द्वारा आयोजित राज्यस्तरीय भव्य गोंधळी स्पर्धा यामध्ये २१ मार्च रोजी मेहकर येथील नामवंत गोंधळी कलावंत दुर्गादास काटे महाराज यांच्या आई रेणुका गोंधळी संचाला द्वितीय पारितोषिक उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र व व रोख ३०००१ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.आमदार सुमित वानखेडे आर्वी विधानसभा यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेश वाघमारे माजी खासदार वर्धा लोकसभा यांची उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर सौ. अनिता .भा आहीरकर सरपंच ग्रा.प. वाई, राजाभाऊ पावडे जिल्हा चिटणीस भाजपा वर्धा जिल्हा, रामकृष्णजी डोईजड महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, वासुदेव गोंधळी समाज, सूर्यकांत डोईजड मराठवाडा, विभागीय अध्यक्ष वासुदेव गोंधळी समाज नांदेड, यशवंतराव सोळसे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पुलगाव अध्यक्ष, श्रीकृष्णाजी डोईजड उपाध्यक्ष , किसनराव मारोतराव रेणके सचिव , गणेश पुंडलिकराव गचकेश्वर कोषाध्यक्ष, प्रल्हादराव पालेकर सह कोषाध्यक्ष, दशरथराव रेणके सहसचिव, तेजस धुमाळे यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये राज्यातील विविध कलावंतांनी सहभाग नोंदवला व मेहकर येथील दुर्गादास काटे महाराजांच्या नेतृत्वाखाली आई रेणुका संचाच्या माध्यमातून गणेश सुपलकर, शिवाजी काटे, मदन काटे, दत्ता कैलकर यांचा सहभाग असलेल्या आई रेणुका संचाला द्वितीय पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. या याच्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .




**आयोजन**

## संगीत मानवी जीवनातील भावना व्यक्त करण्याचे सशक्त माध्यम- मालती शेळके

# स्वरविहार संगीत विद्यालयाचा सांज पाडवा उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. २३ :** संगीत हे प्रत्येकाच्या जीवनातील एक महत्वाचा भाग असून मानवी जीवनातील भावना व्यक्त करण्याचे एक सशक्त माध्यम आहे.असे प्रतिपादन राजर्षी शाहू मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी मर्यादित बुलढाणाच्या अध्यक्षा मालतीताई शेळके यांनी केले.

दि.२२ मार्च रोजी स्थानिक शारदा ज्ञानपीठच्या खुल्या रंगमंचावर स्वरविहार संगीत विद्यालयाचा सांजपाडव्यानिमित्त हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम पार पडला. त्यावेळी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.पुढे त्या म्हणाल्या की संगीत हे आपल्या जीवनातील एक महत्वाचा भाग असून मानवी मनाला आनंद प्राप्त करायचा असेल तर प्रत्यकाने संगीत कलेचे धडे घेतले पाहिजे.



स्वविहार संगीत विद्यालयाचा हा सोहळा अतिशय दैदीप्यमान असून या विद्यालयातून दर्जेदार कलाकार तयार होतील व रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमाला ज्येष्ठ संगीत तज्ञ अरविंद टाकळकर गुरुजी,सुप्रसिद्ध जनरल फिजिशियन डॉ.गजेंद्र निकम, सेवानिवृत्त आरोग्य विस्तार अधिकारी लताताई गुर्जर,बुलढाणा साम टीव्ही चे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव यावेळी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर मान्यवरांची यथोचित भाषणे देखील संपन्न झाली. यावेळी स्वरविहार संगीत विद्यालयाच्या डॉ.मिलिंद जाधव, डॉ.विवेक इंगळे, डॉ.रवींद्र गोफणे, डॉ.गजेंद्र निकम, डॉ.मंजुश्री खोब्रागडे, ॲड.अमोल देशपांडे, गजानन घिरके, लताताई गुर्जर, शिल्पा डाबेराव, इंजिनिअर ज्योती खरे, प्रा.रतमाला जाधव, प्रसेनजित मोरे, आर्यन सरोदे, अनया डोंगरे, प्रणिका जाधव, अभिनव हिवाळे, विमल काळवाघे, शीला नाफडे, संतोषी झाल्टे, मंजुषा जाधव, प्रतिमा सुरडकर, वैशाली मुंदे, लक्ष्मी सुरोशे, मंदा मानस्कर, नीलम श्रीवास्तव, प्रभावती करे, शैला हिवाळे,प्रिया गोफणे, अश्विनी घिरके यांच्यासह अनेक स्वरविहार च्या विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले. त्यांच्यासोबत अमोल दिशागज व प्रकाश खरे यांनी वाद्याची साथ संगत केली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक रविकिरण मोरे यांनी केले असून सूत्रसंचालन वैशाली मोरे तर आदित्य गोफने यांनी आभार व्यक्त केले.या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध छायाचित्रकार रविकिरण टाकळकर, ॲड.धीरज मुंदे,प्रा.डॉ.हर्षानंद खोब्रागडे, नानाराव ससाणे, अशोक नाफडे, फोटोग्राफर हर्षल तायडे, क्राईम ब्रँच चे अमोल झीने यांच्यासह बुलढाण्यातील सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

# लोणार सरोवर परिसरात दुर्मिळ ‘लाईन्ड सपल स्किंक’ चे दर्शन; जैवविविधतेच्या नोंदीत मोलाची भर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.२३ :** जागतिक वारसा असलेल्या लोणार सरोवर परिसरात नुकतीच एक महत्वाची नैसर्गिक नोंद करण्यात आली आहे. वन्यजीव अभ्यासक विनय कुलकर्णी व सचिन कापुरे यांना या भागात लाईन्ड सपल स्किंक ही दुर्मिळ सरपटणारी प्रजाती आढळून आली आहे. मंठा बायपास रोडवरील साई व्हील आलाइनमेन्ट चे मालक देशमुख यांना त्यांच्या दुकानामध्ये सापासारखा दिसणारा हा प्राणी आढळून आला तत्काळ त्यांनी याची सूचना विनय कुलकर्णी यांना दिली ते स्वतः बाहेरगावी असल्यामुळे त्यांचे सहकारी सचिन कापुरे यांनी त्याठिकाणी पोहचून याला ताब्यात घेतले. लोणार सरोवर परिसर हा उल्कापातामुळे निर्माण झालेला वैशिष्ट्यपूर्ण भूभाग असून, येथे खारट व अल्कधर्मी पाण्याचे सरोवर, त्याभोवतीचा जंगल पट्टा, तसेच ओपन गवताळ भाग अशा विविध सूक्ष्म अधिवासांचे मिश्रण आढळते. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रजातींसाठी अनुकूल वातावरण निर्माण होते.



या नोंदीबद्दल बोलताना निसर्ग अभ्यासक आणि लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी सांगितले की, (पट्टेरी मऊ साप सुरळी) ही प्रजाती प्रामुख्याने महाराष्ट्रातील कोरड्या प्रदेशात आढळते. लोणारसारख्या वैशिष्ट्यपूर्ण परिसरात विनय कुलकर्णी यांनी केलेली ही नोंद जैवविविधतेच्या अभ्यासासाठी महत्वाची आहे. या भागातील परिसंस्था अशा दुर्मिळ जीवांच्या अस्तित्वासाठी आजही पोषक असल्याचे हे लक्षण आहे.'' तसेच त्यांनी पुढे सांगितले की, अशा प्रजाती बहुतांश वेळा लोकांच्या नजरेत न येता जमिनीखाली किंवा पानांच्या खचात लपून राहतात. त्यामुळे प्रत्यक्षात त्या परिसरात अस्तित्वात असूनही त्यांची नोंद होत नाही. या पार्श्वभूमीवर स्थानिक निरीक्षकांकडून होणाऱ्या अशा नोंदी अत्यांत महत्वाच्या ठरतात लोणार परिसरातील या नव्या शोधामुळे वन्यजीव प्रेमींनी आनंद व्यक्त केला असून विनय कुलकर्णी यांचे या जागरूकतेबद्दल कौतुक होत आहे. विनय कुलकर्णी, सचिन कापुरे व त्यांची टीम हे गेली अनेक वर्ष निसर्ग मल्टीपर्पज फाउंडेशन च्या माध्यमातून वन्य जीवांच्या विशेषत: सापांच्या संरक्षण व संवर्धनासाठी अहोरात्र झटत आहेत. लोणार सरोवर परिसर हा आधीच विविध पक्षी, सरपटणारे प्राणी व इतर वन्यजीवांसाठी ओळखला जातो. अशा नव्या नोंदींमुळे या भागाच्या जैवविविधतेचे महत्व अधिक अधोरेखित होत असून, भविष्यातील संशोधनासाठीही नवे दालने उघडत आहेत.

**महत्त्वाचे**

## युवकाचा तलावात बुडून मृत्यू

**खामगाव :** शहरात रमजान ईदचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असतानाच, एक हृदयद्रावक घटना घडली. बड़े प्लॉट भागातील रहिवासी मोहम्मद अरसलान अब्दुल नईम (१८) हा तलावात पोहण्यासाठी २१ मार्च २६ रोजी दुपारी २ ते ३ वा. दरम्यान चुलत भावासोबत गेला होता. पोहणे येत नसल्यामुळे तो बुडत असतांना त्याच्या चुलत भावाने आरडाओरड केली होती. मात्र दुर्देवाने मोहम्मद अरसलान अब्दुल नईम याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळावर पोहचले होते. काही नागरिकांनी तलावात गळ टाकून मृतदेह शोधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यांना यश आले नाही. यानंतर नेहमीप्रमाणे पोलिस विभागाने रुखमाई आपत्कालीन व्यवस्थापन फाउंडेशनचे खामगाव रत संजय खंडेराव यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून माहिती दिली. त्वरीत खंडेराव चमुसह घटनास्थळी पोहचले होते. संजय खंडेराव यांच्या रेस्क्यु टिमला जवळपास दिड-दोन तासाच्या प्रयत्नानंतर मृतदेह शोधण्यास यश मिळाले.

## सकल लोहार समाजातर्फे श्रीरामांची आरती

**खामगाव :** दरवर्षीप्रमाणे यंदाही विश्व हिंदू परिषद द्वारा मोठ्या उत्साहात श्रीराम जन्मोत्सव साजरा केला जात आहे. श्रीराम जन्मोत्सव समिती तर्फे येथील टॉवर चौक स्थित आयोध्या धाम येथे २१ मार्च रोजी शहरातील सकल लोहार समाजाला प्रभू श्रीरामांच्या आरतीचे आमंत्रण देण्यात आले होते. यावेळी सोमवंशी आर्य क्षत्रिय लोहार, गाडी लोहार, जिनगर समाजाचे अध्यक्ष अनुप गवळी, रजनीश चव्हाण, रुपेश शिंदे, श्याम वानखडे, सचिन थोरात, राजू मोरे यांच्यासह समाज बांधवांनी उपस्थित राहून प्रभू श्रीरामांच्या आरती मध्ये सहभाग घेतला. यावेळी समाजाचे अध्यक्ष अनुप गवळी यांनी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीला हार अर्पण करून दर्शन घेतले. तसेच श्री राम जन्मोत्सव समितीच्या या उत्कृष्ट उपक्रमाबाबत कौतुक करत प्रभू श्रीरामांच्या आरतीला आमंत्रण दिल्या बाबत श्रीराम जन्मोत्सव समितीचे आभार व्यक्त केले.

## मंदिरातील दानपेटी फोडली; घटना सीसीटीव्हीत कैद

**शेगाव :** येथील बालाजी प्लॉट परिसरातील महाराजा अग्रसेन भवनातील मंदिरात दिवसाढवळ्या दानपेटी फोडून रक्कम चोरण्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मंदिराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अज्ञात चोरट्याने मंदिरात प्रवेश करून दानपेटी फोडली आणि त्यातील रक्कम एका थैलीत भरून पळ काढला. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकार मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे. त्यामुळे संशयिताचा शोध घेणे पोलिसांसाठी सोपे होण्याची शक्यता आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेतला जात आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी मंदिर परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने प्रभू श्रीराम यांची महाआरती

**खामगाव :** विश्व हिंदू परिषद श्रीराम जन्मोत्सव समिती यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे, हिंदू सूर्य महाराणा प्रताप उद्यान, अयोध्या धाम येथे मोठ्या उत्साहात महाआरती करून विधिवत श्रीराम जन्मोत्सव सोहळा पूजन करण्यात आले. साजरा करण्यात येत असून २१ मार्च रोजी रात्री ८ वा. सामाजिक समरसता आरती अंतर्गत सकल ब्राह्मण समाज खामगाव तर्फे प्रभू श्रीराम यांची यावेळी बहुभाषिक ब्राह्मण समाजाचे जेष्ठ व श्रेष्ठान सह ब्राह्मण मातृशक्ती व शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णाभाऊ साठे पुतळ्याच्या नियमितीकरण व सौंदर्यीकरणासाठी मोर्चा; मुख्यमंत्र्यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि. २३ :** स्थानिक रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ असलेल्या लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे तातडीने नियमितीकरण करून शासकीय निधीतून सौंदर्यीकरण करावे, या मागणीसाठी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारक समिती व मातंग समाजाच्या वतीने सोमवारी (दि. २३ मार्च २०२६) मोर्चा काढण्यात आला. या मोर्चानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव रेल्वे स्टेशन परिसरात मातंग समाजाचे आराध्य दैवत असलेले अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा अनेक वर्षांपासून उभा आहे. मात्र, या पुतळ्याचे अधिकृत नियमितीकरण व आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. यासाठी नगर परिषद व संबंधित विभागाकडे वारंवार मागण्या करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच, नगर परिषद खामगावच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलाला ''डॉ. अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल'' असे नाव देण्यात यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय पुतळ्याच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी स्थायी समितीमार्फत प्रस्ताव मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. सदर पुतळा ज्या ठिकाणी उभारण्यात आला आहे, त्या जागेबाबत कोणताही वाद नसून भविष्यातही वाद निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनाने कोणतीही अडचण न आणता मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अशी विनंती करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही समितीच्या वतीने देण्यात आला आहे. उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी नगर परिषद प्रशासनावर राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर परिमल कांबळे (दादा), आशिष सावळे, संभाजी शिंदे (नाना), लखन अवचार, कृष्णा नाटेकर, आशिष खंडारे, गोपाल वानखडे, गजानन सोनोने आदींची स्वाक्षरी आहे.

# चिखलीचे आराध्य दैवत रेणुका मातेच्या वासंतिक नवरात्र उत्सवाला आज पासून सुरुवात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२३ :** शहराचे आराध्य दैवत असलेल्या कुलस्वामिनी श्री. रेणुका माता देवीच्या वासंतिक नवरात्र उत्सवाला आज दि.२४ मार्च पासून सुरुवात होत असून, त्याअनुषंगाने मंदिर कमिटी सज्ज झाली आहे. यासाठी यात्रा आणि विविध धार्मिक कार्यक्रम यासाठी व्यापक तयारी करण्यात आली आहे.

या वासंतिक नवरात्र उत्सवाची सुरुवात आज सकाळी शहरातील महादेव मंदिराच्या परिसरातून मानाच्या बैजोडीच्या भव्य मिरवणुकीने होणार आहे. दि. २५ मार्च रोजी घटस्थापना होऊन दररोज सकाळ आणि सायंकाळी महाआरती आणि ''जागर रेणुका माऊलीचा'' या संकल्पनेतून भजन आणि कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दि. २६ मार्च रोजी रामनवमी निमित्त हभप राजेंद्र तळेकर महाराज यांचे कीर्तन होणार आहे. तर दि. २७ मार्च रोजी श्री स्वामीनारायण जयंती निमित्त भजन आणि भक्ती संगीत तसेच दि. २८ आणि २९ मार्च रोजी भजन, गीतापाठ आणि फराळाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३० मार्च रोजी ''शिवलीलामृत'' वाचन तर, दि. ३१ मार्च रोजी खामगाव चौफुली येथे हभप शिवाजी शिंदे महाराज ( आळंदी देवाची ) यांचे कीर्तन आणि ध्वज पूजन आणि १ एप्रिल रोजी



हभप राणी दौंड महाराज यांचे कीर्तन व पारंपारीक मशाल मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर या वासंतिक नवरात्र उत्सवाची सांगता दि.२ एप्रिल २६ रोजी हनुमान जयंती निमित्त विविध धार्मिक विधी नंतर सायंकाळी ६ वाजता श्री रेणुका देवीची व्याघ्रुढ अष्टभुजा प्रतिमेची बैलगाडीवर भव्य वहन मिरवणुकीला सुरुवात होऊन दुसऱ्या दिवशी दि. ३ एप्रिल रोजी सकाळी मंदिरात पोहचेल. या वहन मिरवणुकीत पंजाब येथील दिलेर खालसाच्या पथकासह वाघ्या मुरळी, ठिकठिकाणी बारुद खाना यांचे आकर्षण राहणार आहे.

## लाखनवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची स्थापना

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लाखनवाडा दि.२३ :** येथील १३५ व्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यासाठी जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश विश्वनाथ वानखडे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी सतीश मनोहर वानखडे यांची निवड झाली आहे. समितीच्या सचिवपदी राजेश तायडे, सहसचिवपदी सुमित वाकोडे तर कोषाध्यक्षपदी शांताराम सरदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आर्थिक सल्लागार म्हणून आजबराव सरदार यांची निवड करण्यात आली असून सदस्य म्हणून सुधाकर वाकोडे, मनोज तेलंग, गौतम सुभाष सरदार, रविंद्र पातोडे आणि सतीश इंगळे यांचा समावेश आहे. या जयंती उत्सव समितीची स्थापना करताना मिलिंद क्रीडा मंडळ लाखनवाडाचे सदस्य तसेच बौद्ध पंच मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## वीर पुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कूल येथे चित्रकला स्पर्धा उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२३ :** दि.२२ मार्च रोजी वीर पुत्र महाराणा प्रतापसिंह पब्लिक स्कूल येथे भव्य चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा तीन गटांमध्ये घेण्यात आली. गट अ वय वर्ष ते४ ६, गट ब - ते७ १०, गट - क ११ ते १५ वयोगट अशा तीन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. गट अ मध्ये रंग भरो स्पर्धा होती तर उर्वरित दोन गटांची चित्र काढून रंगविण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम गटात प्रथम बक्षीस नंदिनी महादेव लाहुडकर रोख रक्कम ३१०० रुपये, द्वितीय बक्षिस कु गौरी शिवशंकर तायडे रोख रक्कम २१०० रुपये तर तृतीय बक्षिस कु सुजात निरंजन मोरे रोख रक्कम ११०० रुपये याला देण्यात आले तर गट ब मध्ये प्रथम बक्षिस कु आरुषी श्रीकृष्ण पुराणे रोख रक्कम ३१०० रुपये व गौरी



दीपक राठी ३१०० रुपये, द्वितीय बक्षिस कु सौम्या विरेंद्रसिंग चौहान रोख रक्कम २१००, तृतीय बक्षीस समीक्षा गणेश करेडे रोख रक्कम ११०० रुपये देण्यात आले तर गट क मध्ये प्रथम बक्षीस प्राची संतोष सुडोकर रोख रक्कम ३१०० रुपये, द्वितीय बक्षीस जयेश अनंता अवकाले रोख रक्कम २१०० रुपये, तृतीय क्रमांक कृष्णली गोपाल बोरे रोख रक्कम ११०० रुपये यांना देण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम स्पर्धे नंतर लगेच करण्यात आले. बक्षीस वितरण स्पर्धे करिता आलेले प्रमुख पाहुणे दिग्विजयसिंह तेजेंद्रसिंह चौहान यांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक म्हणून निखील भालेराव सर व अपेक्षा मुर्हेकर यांनी परीक्षण केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, कॉलेज ऑफ मेनेंजमेंटचे सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## खामगाव येथील सामान्य रुग्णालयात युवक मृतावस्थेत दाखल

**खामगाव दि.२३ :** शहरातील शंकर नगर परिसरात राहणारे अनिल प्रकाश खैवान (वय ३५) यांना २२ मार्च २०२६ रोजी दुपारी उपचारासाठी सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनिल खैवान यांना दुपारी सुमारे १.२० वाजण्यापूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्यांची प्रकृती गंभीर होती. तत्काळ वैद्यकीय तपासणी करण्यात आली, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. या प्रकरणी डॉ. अनंता पेसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्षसेवक विलास वडोदे यांनी शहर पोलीस ठाण्यात मेमो दिला. त्यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद (मर्ग) दाखल केली आहे. दरम्यान, या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नारायण चव्हाण करीत असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

## जिगाव प्रकल्पातील कर्मचारी वर्गाच्या हलगर्जी; येऊलखेड-कालखेड परीसरातील शेतकरी मदतीपासुन वंचित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२३ :** जिगाव प्रकल्पा अंर्तगत टाकण्यात येत असलेल्या पाईप लाईनमुळे बाधीत शेतकरी आर्थिक मदतीपासुन वंचित राहत आहेत आणि ते केवळ जिगाव कार्यालयालयातील कर्मचारी वर्गाच्या हलगर्जीपनामुळे होत आहे.या सर्व बाधीत शेतकऱ्यांना नियमानुसार नुकसान भरपाई मदत मीळावी अशी मागणी कालखेड येथील शेतकरी तथा उपसरपंच पंडीत परघरमोर यांनी केली आहे.

शासकीय कर्मचारी वर्गाची हलगर्जी कशी शेतकरी बांधवाचे नुकसान करु शकते याचा प्रत्यय शेगाव तालुक्यातील येउलखेड-कालखेड व ईतरही बऱ्याचशा गावातील शेतकरी वर्गाच्या शेतात होत असलेल्या कामांवरुन दिसुन येत आहे. याबाबत सविस्तर असे की, महत्वाकांक्षी जिगाव प्रकल्पाचे काम जवळपास पुर्नत्वास गेलेले असुन आता पाणी वाटपासाठी शेतकऱ्यांच्या शेतामधुन लहान, मोठ्या आकाराचे पाईप टाकण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी परप्रातातील कंपनीचे कर्मचारी पाईप लाईनचे काम करत आहेत. या कामाची सुरुवात मागील वर्षीच्या डिसेंबरच्या महीण्यापासुन झाली होती. त्यावेळेस शेतात उभी पिक असल्याने जिगाव प्रकल्पातील अधिकारी वर्गाने बाधीत शेतकरी बांधवाचे पंचनामे करने क्रम प्राप्त व अपेक्षीत होते. म्हणजे शेतकऱ्यांना आर्थिक मदत झाली असती असे असतांना अधिकारी,कर्मचारी वर्गाने हलगर्जीपणा केला व पंचनामे करण्यास टाळाटाळ केली त्यामुळे या परिसरातील शेतकरी लाभापासुन वंचित राहीले आहेत.त्याा सर्व नुकसान ग्रस्तांना आर्थिक मदत मिळावी अशी शेतकरी बांधवांची मागणी आहे.

# देऊळगाव राजा येथे हिंदू संमेलन उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि.२३:** सकल हिंदू समाजाद्वारे आयोजित हिंदू संमेलन रविवारला बालाजी नगर देऊळगावराजा येथे सायंकाळी आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात गोमाता पूजनाने झाली. २७ एप्रिलला गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा देण्यासाठीच्या आंदोलनासाठी सही अभियान यावेळी घेण्यात आले.

सुरुवातीला शाहीर कंकाळ यांनी भीम गीत व प्रबोधनाचा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर मंचकावर कुमारी काव्या काटेकर हिने शिवगर्जना सादर केली. विशेष आकर्षण म्हणून बाल हनुमानाचे उत्कृष्ट सादरीकरण बालकलाकार राजवीर काटेकर यांनी केले. सुरुवातीला मंचावर उपस्थित मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती श्री. शिवाजी महाराज व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर प्रथम वक्ता म्हणून प्रा. अश्विनी जाधव (मेहत्रे) यांनी नारी सुरक्षा व स्त्री संस्कार यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. स्त्री शक्तीला जागृत करण्याची आवश्यकता विषद केली. रा.स्व. संघ बुलढाणा विभाग प्रचारक स्वप्नील राऊत यांनी हिंदू धर्म एकतेची, समता व समरसतेची गरज वारंवार का आवश्यक आहे.याबाबत व संविधान आणि बाबासाहेबांचे विचार यावर प्रबोधन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले जयमंगल जाधव यांनी समाजात निर्माण होत असलेली दरी दूर करून एक संघ धर्म व कुटुंब व्यवस्था निर्माण याची गरज उदाहरणासहित विषद केली. यावेळी संयोजक म्हणून राजेंद्र कोटेचा सहसंयोजक अशोक शेळके व श्रीधर जायभाये यांची उपस्थिती होती. संचलन समाधान घुगे सर व आभार प्रदर्शन जायभाये सर यांनी केले. भारतमातेच्या आरतीने व प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील विविध कॉलनी व नगर भागांतील नागरिक उपस्थित होते.




**राजकारण** काँग्रेस आणि भाजपसह इतर पक्षांना मोठा धक्का, अनेक दिग्गजांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

# चिखली विधानसभा मतदार संघात आ.संजय गायकवाड यांचा 'मास्टरस्ट्रोक'

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२३ :** चिखली विधानसभा मतदारसंघातील राजकारणाला जबरदस्त कलाटणी देणारी ऐतिहासिक घडामोड दि.२२ मार्च रोजी बुलढाणा येथे पाहायला मिळाली. शिवसेना मातोश्री जनसंपर्क कार्यालयात पार पडलेल्या भव्य पक्षप्रवेश सोहळ्यात भाजप, उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), वंचित बहुजन आघाडी तसेच विविध पक्षांतील शेकडो पदाधिकारी, सरपंच, शाखाप्रमुख, बूथप्रमुख, उपशाखाप्रमुख आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या भव्य प्रवेशामुळे चिखली मतदारसंघातील राजकीय वातावरण अक्षरशः ढवळून निघाले असून शिवसेनेची ताकद मोठ्या प्रमाणात वाढल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे. खेडोपाड्यातील विवीध पक्षातील कार्यकर्त्यांनी धरली शिवसेनेची वाट उदयनगर, भोगावती, अटकळ, शिंदी हराळी, पांगरखेड, सोयगाव, शेलूद, ढालसावंगी, दहिद खुर्द, केळवद, देवपूर, करणखेड, भानखेड, तेल्हारा, पेठ, बोरगाव काकडे, आंधई, गोदरी, डोंगर शेवली आदी गावांतील शेकडो कार्यकर्त्यांनी एकाच मंचावरून शिवसेनेत प्रवेश करत शक्तिप्रदर्शन केले. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, बूथ प्रमुख, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि तरुण कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजुभाऊ गायकवाड यांचे नेतृत्व ठरले निर्णायक या भव्य पक्षप्रवेशामागे आमदार धर्मवीर संजुभाऊ गायकवाड यांचे नेतृत्व महत्वाचे ठरले. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी कोणताही दबाव नसताना स्वेच्छेने शिवसेनेत प्रवेश केल्याचे सांगितले जात आहे. ''शिवसेना ही सामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारी संघटना आहे. आजचा पक्षप्रवेश हा जनतेच्या वाढत्या विश्वासाचा पुरावा आहे,'' असे संजुभाऊ गायकवाड यांनी यावेळी स्पष्ट केले.



**विरोधकांना मोठा धक्का;** समीकरणे बदलणार भाजप, राष्ट्रवादी, काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीतील कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे विरोधी पक्षांना मोठा धक्का बसला आहे. गावपातळीपासून मतदारसंघापर्यंत नवीन राजकीय समीकरणे तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत. या सोहळ्यास शिवसेना जिल्हा व तालुका पदाधिकारी, युवासेना कार्यकर्ते, स्थानिक नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर ''जय महाराष्ट्र''च्या घोषणांनी दणाणून गेला.

**शिवसेनेत पक्ष प्रवेश उदयनगर (उंद्री)** :- सरपंच मनोज लाहुडकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य गणेश भगत, नदीम अंसारी, अमोल लाहुडकर, सुरेश बनसोड, संकल्प अर्बनचे अध्यक्ष अक्षय कारंडे, युवक काँग्रेस जिल्हा सचिव रोहन कारंडे. भोगावती आणि अटकळ : - उपसरपंच मदन पाटील, दीपक शेळके, संदीप काळे, किरण शिंदे, शिवा शेरे, आनंद जाधव, साहिल शिंदे, विशाल जाधव, करण राजपूत, सागर दांडगे, महेंद्र राजपूत, गोपाल निकाळजे, गजानन रोजेकर, विशाल शेळके, सुरेश राजपूत, गणेश शेळके. यासह आदी गावातील नागरीकांनी यावेळी सहभाग नोदंविला.

# जिजामाता महाविद्यालयाचे रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२३ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित जिजामाता महाविद्यालय बुलढाणा यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक ग्राम कोलवड ता. जि. बुलढाणा येथे संपन्न झाले. विद्यार्थ्यांना प्राणायाम योगासने व ध्यान धारणा या विषयी योग प्रशिक्षक योगी भूषण मोरे यांनी मार्गदर्शन केले.

परिसर स्वच्छतेनंतर श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.प्राचार्य डॉ. नितीन चांगोले हे होते, प्रमुख अतिथी तथा शिबिराचे उद्घाटक अँड प्रतापराव रा.भोंडे सदस्य महाविद्यालय विकास समिती तथा आजीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती. हे होते प्रमुख उपस्थितीतीमध्ये अशोकराव चव्हाण ,., भीमरावजी काळे ,आजीवन सदस्य शिवाजी शिक्षण संस्था अमरावती. , विनायक सावळे राज्य प्रधान सचिव महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सुरेश बोरसे राज्य सरचिटणीस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रा.डॉ.संतोष आंबेकर उपाध्यक्ष,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीश्री प्रदीप हिवाळे, कार्याध्यक्ष, बुलढाणा जिल्हा महा अनिस तसेच मा श्री साहेबराव पाटील जेष्ठ नागरीक तथा सामाजिक कार्यकर्ते, दत्तकग्राम कोलवड). महादेव मंदिर संस्थांनचे अध्यक्ष मा श्री तेजराव पाटील. तसेच डॉ सुबोध चिंचोले, मा.श्री डॉ जे जे जाधव, डॉ नामदेवराव ढाले, कार्यक्रमाधिकारी प्रा गजानन लोहटे डॉ.राजश्री येवले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व शिक्षण महर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख अतिथीचे स्वागत करण्यात आले. अँड.बाबासाहेब भोंडे यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणामध्ये शिबिराचे उद्घाटन झाल्याचे घोषित करून राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्र मजबूत करण्यासाठी महत्वाची भूमिका निभावते. यामधूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्वाची वेगळी ओळख होण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून परिश्रम मूल्य , सामाजिक मूल्य, विविध प्रकारचे मूल्ये विकसित करावे. समाजा सोबतच आपलाही विकास करावा.अशा प्रकारचे गौरव उद्गार केले.



अजिंक्य भारत •
आपलं जालना
जालना, मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


**महत्त्वाचे**

## सोनाली आरगडे यांची सनियंत्रण समितीवर निवड



**परतूर :** महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने जालना जिल्ह्यासाठी कामगार स्थानिक संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीवर विविध क्षेत्रातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून परतूर येथील माजी नगरसेवक कृष्णा आरगडे यांच्या पत्नी सौ.सोनाली आरगडे यांची सदस्य प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे. सौ.सोनाली आरगडे यांच्या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## आज जि.प.चा अर्थसंकल्प सादर होणार

**जालना :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रू पी.एम.यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हा परिषद सभागृहात सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे.

## आज क्षयरोग दिनानिमित्त रॅली

**जालना :** जागतिक क्षयरोग दिना निमित्त मंगळवार,दि.२४ मार्च रोजी क्षय रोगाची जनजागृती व्हावी या उद्देशाने रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सकाळी ८ वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय येथून मार्गस्थ होणार आहे. यानंतर रॅली सतकर कॉम्प्लेक्स मार्गे अंबड चौफुली येथून जि.प. कार्यालयासमोर विसर्जित होईल. रॅलीमध्ये नर्सिंग कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी होतील.

# जिकडे तिकडे रांगाच रांगा...







प्रत्येक गोष्टीसाठी सामान्य माणसाला रांगेतच का उभं रहावं लागत आहे? हा प्रश्न कुणालाच पडत नसल्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सध्या रिक्षा चालकांना सीएनजीच्या तुटवड्यामुळे रांगेत लागावे लागत आहे. तर दुसरीकडे एसटी महामंडळाच्या बसेसमधून सवलतीच्या गाजरावर स्वार होणाऱ्या वयोवृद्ध महिला व पुरूषांनासुद्धा शासनाच्या मास्टरकार्ड मिळविण्यासाठीच्या आवाहनाला साथ देण्यासाठी रांगेत उभं राहावं लागत आहे. अशाच रांगांचे जालन्यात घेतलेले हे छायाचित्र.

## सफाई कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी मनपा व न.प.कामगार युनियन सरसावली

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २३ :** जालना महानगरपालिकेच्या सफाई विभागातील कामगारांना अनेक वर्षांपासून किमान वेतन मिळत नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे, त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मराठवाडा महानगरपालिका, नगर परिषद कामगार युनियनच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

युनियनच्यावतीने सांगण्यात आले की, कंत्राटी कामगारांचा पगार बँकेतून होत नाही, कामगारांना किमान वेतन मिळत नाही, शिक्षण व आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम होत आहे. यासंदर्भात दि.१० जुलै २०२५ रोजी सरकारी कामगार अधिकारी ए.एम.जाधव यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. तसेच नगर परिषद प्रशासन संचालनालय आणि सहआयुक्त कार्यालय, नवी मुंबई यांच्याकडून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही जालना सरकारी कामगार अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

मात्र, या सर्व आदेशांनंतरही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप युनियनने केला आहे. फक्त बैठकीच्या तारखा देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

युनियनच्या प्रतिनिधींनी सांगितले की, कामगारांना न्याय मिळावा म्हणून हे प्रकरण कामगार न्यायालयात दाखल करण्याची विनंतीही करण्यात आली होती; परंतु त्याकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे कामगार न्यायापासून वंचित राहत आहेत.

**प्रशासनाने हस्तक्षेप करावा...**

**दरम्यान, १ एप्रिल २०२६ पासून नवीन कामगार कायद्याच्या नियमांची अंमलबजावणी होणार असल्यामुळे ३१ मार्च २०२६ पूर्वीच सदर प्रकरण कामगार न्यायालयात दाखल करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी अण्णा सावंत, मधुकर मोकळे, अनिल मिसाळ, हरिचंद्र लोखंडे, संतोष पाटोळे आणि संजय खंडागळे यांनी प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून सफाई कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे.**

## गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा-राजेश राऊत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २३ :** स्व. गणपतराव पवार यांनी आयुष्यभर जनसेवेचे व्रत जोपासले. त्यांचा हाच वारसा पवार कुटुंबिय आणि सेवाभावी संस्था पुढे नेत आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हीच खरी मानवसेवा आहे. आजच्या काळात डोळ्यांचे आरोग्य जपण्याचे मोठे आव्हान असून, अशा शिबिरांमुळे सामान्य नागरिकांना मोठा आधार मिळतो, असे प्रतिपादन उपमहापौर राजेश राऊत यांनी येथे केले.

स्व. गणपतराव पवार यांच्या स्मृत्यर्थ स्व.गणपतराव पवार सेवाभावी संस्था आणि भारतीय जैन संघटना, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २३ मार्च रोजी हॉटेल न्यू इंद्रायणी येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन राऊत यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक गणेशराव राऊत यांची उपस्थिती होती. या शिबिरात १२६ जणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९ जणांना मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांच्यावर चिकलठाणा येथील लायन्स नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या रुग्णांची जाण्या येण्याची आणि शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधींची व्यवस्था पवार परिवाराच्यावतीने करण्यात येणार आहे.

प्रास्ताविकपर भाषणात रामेश्वर पवार म्हणाले की, वडील स्व.गणपतराव पवार यांचे विचार आणि त्यांनी दिलेली समाजसेवेची शिकवण आमच्यासाठी कायम प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गोरगरीब आणि गरजू रुग्णांच्या जीवनात प्रकाशाची किरणे पोहचवण्याचा आमचा मानस आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, भविष्यातही अशाच प्रकारचे लोकोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जातील.

या प्रसंगी संजय पवार, रामेश्वर पवार, श्याम पवार, साईनाथ पवार, सूरज पवार, कुणाल पवार, भारतीय जैन संघटनेचे शहर अध्यक्ष राजेश लुनिया, माजी नगरसेवक राधाकिशन दाभाडे, जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव, रघुवीर जायसवाल, श्याम भारतीय, प्रकाश शेळके, रावसाहेब पवार, विजय खरात, बालू झुंजुर्डे, संदीप धागे, अरुण वझरकर, डॉ.अनिल बोडखे, शुभम राऊत, दिनेश आदमाने, शैलेश देशमुख, भारत गावणे, अशोक जोगदंड, अजय मिरकड, संदीप ढगे, विलास पवार, राजू श्रीसागर, अनिल खिल्लारे आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## देशभक्तीच्या जयघोषात नेर येथे शहीद दिन पदयात्रा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २३ :** शहीद दिनानिमित्त नेर येथे देशभक्तीच्या वातावरणात पदयात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. माय भारत, जालना, क्रीडा भारती तसेच पीएम श्री जि.प. प्रशाला, नेर यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शालेय समिती अध्यक्ष विक्रम उफाड, जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर आणि मुख्याध्यापक यशवंत दसपुते यांच्या हस्ते



शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी उपस्थितांनी देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना अभिवादन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना संजय साळवे यांनी मांडली तर प्रमुख वक्ते म्हणून संजय वाघमारे यांनी शहीदांच्या बलिदानाचे महत्त्व आणि युवकांनी देशभक्तीची भावना जपण्याची गरज यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत गायकवाड यांनी केले आणि आभार प्रदर्शन अशोक मगरे यांनी केले.

यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. पदयात्रा पीएम श्री जि.प. प्रशाला येथून सुरू होऊन वटेश्वर मंदिर, बस स्टँड, ग्रामपंचायत कार्यालय मार्गे पुन्हा शाळेत येऊन समाप्त झाली. या पदयात्रेत विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा विभाग प्रमुख उमेश खंदारकर, जयपाल राठोड, तुकाराम काकडे, श्रीकृष्ण नागरे, किरण देशमुख, संभाजी राऊत, मनोज पाखरे व भोकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.



**जालना : बदनापूर तालुक्यातील नुतन वसाहत, सेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शहिद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संजय हेरकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहूल खिल्लारे, संजय गंगवाल, जनार्दन अंभोरे, आनंद गाडेकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.**

**सोहळा** | **माताजी मंदिरावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार**

## पोहरागड येथे ऐतिहासिक बंजारा जनजागृती मेळावा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**परतूर, दि. २३ :** बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र पोहरागड येथे यंदा चैत्र नवरात्री निमित्त दुहेरी ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळावा आणि माताजी मंदिरावर प्रथमच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी असा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश संघटक अर्जुन नायक यांनी केले आहे.

बंजारा ब्रिगेडच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास देशभरातील संत-महंत व समाजातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. आमदार धर्मगुरू बाबूसिंग महाराज, अनंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज, महंत खुशाल महाराज, महंत प्रकाश महाराज यांच्यासह अनेक मान्यवर या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत. दरम्यान, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून पोहरागडावरील पवित्र माताजी मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सकाळी ९ वाजता होणाऱ्या या सोहळ्यामुळे संपूर्ण बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षी लाखो भाविक माता जगदंबा, संत सेवालाल महाराज व रामराव बापू यांच्या दर्शनासाठी पोहरागड येथे येतात.



**यंदाचा सोहळा विशेष ठरणार असून धार्मिक आणि सामाजिक एकजुटीचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळणार आहे. याच दिवशी पोहरादेवी येथे सायंकाळी ५ वाजता बामणगाव रोडवरील महाराज मंदिर मैदानात अखिल भारतीय बंजारा समाज जनजागृती मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा होणार असून विशेषतः एसटी आरक्षणासह विविध महत्त्वाच्या विषयांवर पुढील दिशा ठरवली जाणार आहे.महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याने हा मेळावा ऐतिहासिक ठरणार आहे. समाजाच्या एकजुटीचा संदेश देणाऱ्या या भव्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व भटक्या-विमुक्त बंजारा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अर्जुन नायक यांनी केले आहे.**



अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार,२४ मार्च २०२६

## थोडक्यात

### धारणी-लोणी परिसरातील दोन मुलींना पळविले

अमरावती : जिल्ह्यातील धारणी व लोणी पोलीस ठाण्यांतर्गत दोन मुलींना परिचितांनी पळवून नेले. त्यापैकी एक अल्पवयीन आहे. पालकांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी एकाविरुद्ध, तर लोणी पोलिसांनी अविनाश दत्ता जाधव (२२) याच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

### विवाहित महिलेचा विनयभंग

अचलपूर : सतत विवाहितेला फोनद्वारे मला तू खूप आवडते, माझे तुझ्यावर प्रेम आहे. माझ्यासोबत रोज बोलत जा असे म्हणत तिचा सतत पाठलाग करीत तिचा विनयभंग केला. याबाबत तिने पतीला माहिती दिली. सरमसपुरा पोलिसांनी त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुहा दाखल केला.

### इसमाला काठीने मारहाण

मोर्शी : काम आटोपून घरी जाणाऱ्या एकाला दुसऱ्याने रस्त्यात अडवले. त्याला काठीने मारहाण करीत जखमी केले. ही घटना कासारपुरा, मोर्शी येथे घडली. त्यात जखमी विजय बबनराव बोरेकर (४१) यांनी तक्रार नोंदवली. पोलिसांनी रुपेश विलायतकर (४२, रा. तळेगाव दशासर) याच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

### इंधन ठेवण्यावरून युवकाला मारहाण

कुऱ्हा : माझ्या जागेत इंधन का ठेवले, असे म्हणून एका शेजाऱ्याने दुसऱ्याला शिवीगाळ करीत लोटालोट केली. या संदर्भात लोटालोटीमध्ये जखमी झालेले अरुण गवई हे पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात असताना दोघांनी त्यांना लाथ मारून दुचाकीवरून खाली पाडले. त्यामुळे त्यांना दुखापत झाली. त्यांच्यावर अमरावती येथे उपचार सुरू आहेत. या संदर्भात जखमीचा मुलगा रोहित अरुण गवई (२६) याने कुऱ्हा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हे नोंदवले. ही घटना पाथरगाव येथे घडली.

### विवाहितेचा सासरकडून छळ

वरुड : तीन वर्षांपूर्वी लग्न झालेल्या विवाहितेचा पतीसह सासू संगणमत करीत क्षुल्लक कारणावरून छळ करीत त्रास देतात. सततच्या होणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून तिने वरुड पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी होशंगाबाद (म.प्र.) येथील रहिवाशी असलेल्या एका महिलेसह पती धिरज लिलाधर पाटील (३२) यांच्याविरुद्ध कौटुंबिक छळाचा गुन्हा नोंदवला.

### गोठ्यातून गाई लंपास

अचलपूर : धोरतरखेडा येथे अज्ञाताने गोठ्यातून बांधलेल्या दोन गाई चोरून नेल्या. त्यांची अंदाजे किंमत ३५ हजार रुपये आहे. पशुपाल प्रशांत रमेशराव देशमुख (४५, रा. धोतरखेडा) यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. घटनेच्या वेळी गोठ्यात एकूण सहा गाई बांधलेल्या होत्या.

### दुचाकीच्या डिक्कीतून रोकड लंपास

अंजनगाव सुर्जी : दुचाकी विकत घेण्यासाठी म्हणून गेलेल्या जफर खान अमीरउल्ला खान (३५, रा. कापुसतळणी) यांचे एक लाख रुपये चोरट्याने चोरून नेले. त्यांनी ही रक्कत दुचाकीच्या डिक्कीत ठेवली होती. ही घटना टाकरखेडा नाका, अंजनगाव सुर्जी येथे घडली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला. पुढील तपास सुरू आहे.

# थकीत देयकांमुळे २७ हजार घरांमध्ये अंधार!

## ६०० कोटींच्या थकबाकीसाठी थेट मीटर काढण्याचे आदेश

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**अमरावती, दि.२३ :** आर्थिक वर्षांच्या शेवटच्या टप्प्यात महावितरणने वसुलीसाठी कंबर कसत थकबाकीदारांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात महावितरणने केलेल्या धडक कारवाईत तब्बल २६ हजार ९९१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. ज्या भागात प्रतिसाद मिळत नाही, तिथे आता सामूहिक कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. प्रसंगी पोलिसबळाचा वापरही केला जाणार आहे.

महावितरणच्या रडारवर सध्या थकबाकीदार ग्राहक आहेत. अमरावती जिल्ह्यात १० हजार ३५० ग्राहकांकडे ११ कोटी ७१ लाखांची थकबाकी आहे, तर यवतमाळ जिल्ह्यात १६ हजार ६४१ ग्राहकांनी २३ कोटी ७८ लाख रुपये थकवले आहेत. या दोन्ही जिल्ह्यांत महावितरणच्या पथकांनी थेट वीजजोडण्या कापल्या असून, थकबाकी न भरल्यास मीटर जप्त करण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्ष संपायला अवघे दहा दिवस उरले असताना महावितरणसमोर थकबाकीचा डोंगर उभा आहे. अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा विविध प्रवर्गातील सुमारे ३ लाख ग्राहकांकडे ६०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. ही रक्कम वसूल करण्यासाठी मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी क्षेत्रीय कार्यालयांना आक्रमक भूमिका घेण्याचे आदेश दिले आहेत. केवळ वीज खंडित करून न थांबता, थेट मीटर काढून घेण्याचे निर्देश दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. थकबाकीपोटी ज्या ग्राहकांचे मीटर काढले जातील, तिथे पुन्हा जोडणी देताना प्राधान्याने स्मार्ट मीटर बसविण्याच्या सूचना मुख्य अभियंत्यांनी दिल्या आहेत.

विशेष म्हणजे, एकदा वीज खंडित झाल्यावर केवळ थकबाकी भरून चालणार नाही, तर १०० टक्के थकबाकीसह पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय घरात उजेड पडणार नाही, अशी ठाम भूमिका प्रशासनाने घेतली आहे.अनेकदा वीज कापल्यानंतर ग्राहक शेजाऱ्याकडून वायर टाकून वीज घेतात. मात्र, आता महावितरणने यावरही कडक वॉच ठेवला आहे. विद्युत कायदा २००३ नुसार, अनधिकृतपणे वीज देणे किंवा घेणे हा फौजदारी गुन्हा आहे अशा प्रकरणात वीज देणाऱ्या आणि घेणाऱ्या अशा दोन्ही शेजाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणच्या भरारी पथकांनी आता रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ केली आहे. जर रात्रीच्या वेळी कुणी अनधिकृतपणे वीज वापरताना आढळले, तर त्यांच्यावर थेट गुन्हा दाखल केला जाईल. शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असेही महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी स्पष्ट केले आहे. वीज चोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते, याची जाणीवही प्रशासनाकडून करून देण्यात आली आहे.

# आदमापुरचा राजा बाळूमामा माझा!

**अजिंक्य भारत | संजय हिवसे**



**आष्टी, दि.२३ :** आदमापुरचे बाळूमामा आणि मुळे महाराज विठोबा, रुक्माई यांचा भव्य उत्सव स्थानिक अंजनगाव सुर्जी तालुक्यातील बोराळा गणपती येथे बाळूमामा आणि मुळे महाराज विठोबा रखुमाई यांच्या भव्य उत्सवाचे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा दिनांक २५ मार्चला होणार आहे बाळूमामा आणि मुळे महाराज विठोबा रखुमाई पृथ्वीची भव्य मिरवणूक श्री महंत नरेश बाबा व श्री प्रभाकर महाराज यांच्या हस्ते गावातून मिरवणूक निघणार असून होम पूजा (ह. भ. प. श्री बोराडे महाराज यांच्या हस्ते होणार आहे या मिरवणुकीसाठी आजूबाजूच्या परिसरातील श्री महाकाल कावड मंडळ व येसूर्ण येथील दिंडी, शिंदी येथील दिंडी व बोराळा येथील दिंडी या मामाच्या मिरवणुकीत सहभागी राहणार आहे त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल असे या कार्यक्रमाचे आयोजक संजय चिकटे,अरुण भाऊ नागे व बोराळा येथील समस्त ग्रामसियांनी करवली आहे.

# रेल्वेच्या धडकेत युवकाचा मृत्यू ; हत्येचा संशय ?

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**अमरावती, दि.२३ :** शहरातील सुशील नगर परिसरातील रेल्वे रूळावर २४ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. हा मृत्यू रेल्वे अपघातात झाल्याची प्राथमिक माहिती असली, तरी नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केल्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) काही काळ गोंधळाचे आणि तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, सुशील नगर रेल्वे रूळावर एका युवकाचा मृतदेह पडून असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी मेमोद्वारे राजापेठ पोलिसांना दिली. माहिती मिळताच राजापेठ पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. मृत युवकाची ओळख शिवा राजू सरकटे (वय २४, रा. दसरा मैदान झोपडपट्टी, अमरावती) अशी झाली आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व परिचितांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. यावेळी हा मृत्यू अपघाती नसून घातपात असल्याचा गंभीर आरोप नातेवाईकांनी करत गोंधळ घातला. त्यामुळे काही काळ रुग्णालय परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राजापेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार पुनीत कुलट आपल्या डीबी पथकासह तात्काळ रुग्णालयात पोहोचले. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी क्यूआरटी पथकालाही पाचारण करण्यात आले.

# नोकराने मालकाला तिन कोटींनी गंडविले

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२३ :** एका विश्वासू नोकराने आपल्याच मालकाच्या व्यवसायात डल्ला मारत तब्बल ३ कोटी ५ लाख ८८ हजार ९६० रुपयांचा अपहार केल्याची खळबळजनक घटना वरूडमध्ये फिर्यादी लोकेश संतोषजी अग्रवाल (४८, रा. सत्यदेवनगर, वरूड) यांच्या तक्रारीवरून मुख्य आरोपी गोपाल रामकृष्ण चौधरी याच्यासह त्याच्या कुटुंबातील इतर पाच जणांविरुद्ध वरूड पोलिस ठाण्यात २१ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उघडकीस आली आहे. याप्रकरणी लोकेश अग्रवाल यांची वरूड येथे लोकेश ट्रेडर्स नावाची पेढी आहे. या पेढीमध्ये मुख्य आरोपी गोपाल चौधरी हा कामाला होता. आरोपीने मालकाचा विश्वास संपादन करून पेढीच्या व्यवहारांमधील रकमेचा गैरवापर करण्यास सुरुवात केली. तपासात समोर आले की, आरोपीने लोकेश ट्रेडर्सच्या बँक खात्यातून तब्बल ८ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे वळविले होते. आरोपीने स्वतःच्या आणि आपल्या नातेवाइकांच्या नावे असलेल्या विविध बँकांच्या खात्यांचा वापर करून ही मोठी उनका चांगगग केली.

गोपाल रामकृष्ण चौधरी (वय ४०) व अश्विनी गोपाल चौधरी (वय ३७, दोघेही रा. शिवाजीनगर, वरूड), वंदना गुल्हाने (रा. नांदगाव पेठ), संजय वासुदेवराव गुल्हाने, शोभा संजय गुल्हाने व मयूर संजय गुल्हाने (तिघेही रा. नेर, जि. यवतमाळ) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. अपहाराच्या पैशातून खरेदी केली मालमत्ता फिर्यादीनुसार, संशयित गोपाल चौधरी याने अपहार केलेल्या रकमेतून स्वतःच्या आणि नातेवाइकांच्या नावावर विविध मालमत्ता खरेदी केल्या. मालकाची आर्थिक फसवणूक करण्याच्या आणि स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्याच्या उद्देशाने सर्व आरोपींनी संगनमताने हा विश्वासघात केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी वरूड पोलिसांनी फसवणुकीच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. सप्टेंबर २०२१ ते ८ डिसेंबर २०२५ या कालावधीत करण्यात आली.

# पोलिस ठाण्यातच महिला कर्मचाऱ्याला सर्पदंश

## जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**अमरावती,दि.२३ :** शहराच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलिस ठाण्याच्या आवारातच आता असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. येथील गाडगेनगर पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असताना एका महिला पोलिस अंमलदाराला सर्पदंश झाल्याची घटना घडली. प्रेमलता वाघाडे असे या महिला अंमलदाराचे नाव असून, सुदैवाने त्यांची प्रकृती आता धोक्याबाहेर आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रेमलता वाघाडे या २० मार्च रोजी रात्री गाडगेनगर पोलिस ठाण्यात सीसीटीएनएस ड्यूटीवर तैनात होत्या. २१ मार्चच्या पहाटे ३ वाजेच्या सुमारास, आरटीपीसी रूममध्ये आराम करत असताना त्यांना अचानक पायाला तीव्र वेदना जाणवू लागल्या. त्यांनी ही बाब तातडीने तिथे उपस्थित असलेल्या इतर सहकारी महिला कर्मचाऱ्यांना सांगितली. सहकाऱ्यांनी तपासणी केली असता, वाघाडे यांच्या पायाच्या बोटाला कशाने तरी चावा घेतल्याचे आणि त्यातून रक्त येत असल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सहकाऱ्यांनी तातडीने सीआर मोबाइलला पाचारण केले आणि त्यांना इर्विनमध्ये दाखल केले. वैद्यकीय चाचणीनंतर सर्पदंश झाल्याचे निष्पन्न झाले. त्यांना आयसीयूमध्ये हलवण्यात आले असून उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी स्वत: जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन वाघाडे यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. गाडगेनगर ठाण्याच्या मागील बाजूस मोठ्या प्रमाणात भंगार वाहने उभी आहेत, तसेच तिथे मोठ्या प्रमाणात अडगळ साचलेली आहे. याच अडगळीतून सापाने पोलिस ठाण्यात शिरकाव केला असावा, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# महिलेच्या पर्समधून लाखोंचा ऐवज लंपास

**कुऱ्हा, दि.२३ :** प्रवासादरम्यान बसमध्ये बसताना अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्सवर हात साफ करीत १ लाख ६४ हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना कुऱ्हा बसस्थानकावर घडली. गजानन पंजाबराव चिंधेकर (३३, रा. काटसूर, ता. मोर्शी) यांच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्राप्त माहितीनुसार, २० मार्च रोजी फिर्यादी हे पती व दोन मुलांसह बसमध्ये बसले. तिकीट काढते वेळी त्यांच्या पत्नीला पर्समध्ये असलेली छोटी पर्स दिसली नाही. ती चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यात एक सोन्याची पोत, पेंडल, कानातले टॉप्स, सोन्याची अंगठी, असा एकूण १६ ग्रॅम सोन्याचा, तर ६० ग्रॅम चांदीच्या तोरड्या व रोख २ हजार रुपये असाएकूण १ लाख ६४ हजारांचा ऐवज होता.

# दोन तरूणांनी वाचविले गर्भवतीचे प्राण

## दामिनी पथक, अग्निशमन पोहोचले,आत्महत्येसाठी चढली होती टेकडीवर

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**





**अमरावती, दि.२३ :** शहर पोलिस व दोन तरूणांच्या तत्परतेमुळे आणि सजगतेमुळे एका २३ वर्षीय विवाहितेचा जीव वाचवण्यात यश आले आहे. सुपर एक्सप्रेस हायवेवरील खदान परिसरात आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या या गर्भवती विवाहितेला पोलिसांनी सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल केले. ही थरारक घटना रविवारी, २२ मार्च रोजी सायंकाळी घडली.

वडाळी परिसरातील देवीनगर येथे राहणारी एक २३ वर्षीय विवाहिता सुपर हायवेवरील खदान परिसरातील टेकडीवर चढून आत्महत्या करण्याच्या बेतात होती. रविवारी सायंकाळी ४.२० वाजेच्या सुमारास डायल ११२ या आपत्कालीन क्रमांकावर या घटनेची माहिती मिळाली. नियंत्रण कक्षाने तातडीने ही माहिती फ्रेजरपुरा पोलिस ठाणे आणि दामिनी पथकाला दिली. माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिस आणि दामिनी पथकाचे महिला कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तरुणी टेकडीच्या उंचावर असल्याने परिस्थिती गंभीर होती. पोलिसांनी अत्यंत संयमाने तिला संवादामध्ये गुंतवून ठेवले आणि फायर ब्रिगेडच्या मदतीने तिची सुरक्षित सुटका केली.

सायंकाळी ५.५५ च्या सुमारास तिला टेकडीवरून सुखरूप खाली उतरवण्यात पोलिसांना यश आले. डिसीपी गणेश शिंदे गाडगेनगरचे ठाणेदार गोरखनाथ जाधव व फ्रेजरपुऱ्याचे ठाणेदार रोशन सिरसाठ यांनी घटनास्थळी धाव घेतली. पीआय विजया पंधरे यांनी तिची समजूत काढली. ती होती गर्भवती कौटुंबिक वादातून ती घराबाहेर पडली अन् थेट खदान परिसरातील ७० फुट उंच असलेल्या टेकडीवरील कड्यावर जाऊन बसली. ही माहिती तरूण वैभव अंबुलकर व ऋषभ मेश्राम यांनी तातडीने पोलिसांनी दिली. गाडगेनगरच्या पोलिस निरीक्षक विजया पंधरे यांनी तिच्याशी संवाद साधला. त्याचवेळी तिला पकडून महिला पोलिसांनी कड्यावरून सुरक्षित ठिकाणी हलविले.

## आठ मतदारसंघातील ४६ हजारांवर नावांची बीएलओद्वारा पडताळणी

# ...अखेर सारख्या नावाचे २ हजार ६०० मतदार बाद!

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**अमरावती, दि.२३ :** एसआयआर कार्यक्रमाची पूर्वतयारी जिल्ह्यात युद्धस्तरावर सुरु आहे. या अनुषंगाने आयोगाद्वारे प्राप्त डीएसई (डेमोग्राफिकल सिमिलर एन्ट्रीज) अहवालाचे आधारे ४६ हजार नामसाधर्म्य मतदारांची पडताळणी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात सध्या सुरु आहे. यामध्ये बीएलओ द्वारे पडताळणी होऊन व अर्ज भरुन आतापर्यंत २६०८ मतदारांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहे.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभाग मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी सरसावला आहे. मतदार यादीचे शुद्धीकरण व पारदर्शकतेसाठी एसआय कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात नामसाधर्म्य असलेल्या नावांची पडताळणी होत आहे. डीएसई अहवालानुसार, जिल्ह्यात तब्बल ४६,१५० मतदारांची नावे दुबार किंवा एकसारखी आढळली आहेत. या नावांची बीएलओ मार्फत पडताळणी सुरू असून, आतापर्यंत २६०८ दुबार मतदारांची नावे यादीतून कायमची वगळण्यात आली आहेत. मतदार यादीत एकाच मतदाराचे नाव दोन ठिकाणी असणे किंवा एकाच नावाचे अनेक मतदार असणे, यामुळे मतदानाच्या टक्केवारीवर आणि पारदर्शकतेवर परिणाम होतो. ही बाब टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने डीएसई अहवाल तयार केला आहे. यात जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांतील नामसाधर्म्य नावांची यादी प्रशासनाला प्राप्त झाली होती. त्याचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मात्र, या विशेष मोहिमेमुळे मतदार यादीचे शुद्धिकरण होत आहे. ज्या मतदारांनी स्थलांतर केले आहे किंवा ज्यांचा मृत्यू झाला आहे, तरीही त्यांची नावे यादीत कायम आहेत, अशा नावांचा शोध घेऊन ती नावे यादीतून हटवली जात आहेत. बडनेरा, अमरावतीत सर्वाधिक फिल्टरेशन बडनेरा मतदारसंघात सर्वाधिक ८६६३ आणि अमरावती शहरात ७६९१ नामसाधर्म्य मतदार आढळले. आतापर्यंत बडनेरामध्ये ८५६ तर अमरावती मतदारसंघात २४२ मतदारांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत. सर्वात कमी ३१०१ सारखीच नावे मेळघाट मतदारसंघात असल्याचे दिसून आले आहे.

जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात ४६१५० मतदारांची पडताळणी बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहितीची खातरजमा करत आहेत. ज्या मतदारांची नावे एकापेक्षा जास्त ठिकाणी आहेत, त्यांचे फॉर्म ७ भरून घेऊन नाय कमी करण्याची प्रक्रिया सध्या जिल्हाभरात राबविली जात आहे.

# अंजनसिंगीतील कोतवाल चार वर्षांपासून धामणगाव तहसील कार्यालयातच ?

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, दि.२३ :** अंजनसिंगी येथील महिला कोतवाल या गावात नोकरी न करता गेल्या ३० नोव्हेंबर २०२२ पासून तहसील कार्यालय धामणगाव रेल्वे येथे सेवा देत असल्याचे गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे तक्रारी दिलेल्या माहितीनुसार या गावातील रहिवासी, तसेच गावातच काम करणारा व्यक्ती हा कोतवाल म्हणून नियुक्त केले जात असे असताना येथील नियुक्त केलेल्या कोतवाला तहसीलदार धामणगाव त्यांनी गेल्या चार वर्षापासून तहसील कार्यालयात ठेवलेली आहे सदर व्यक्ती गावात नसल्यामुळे तलाठ्याच्या गैरहजेरीमध्ये कार्यालयात अनेक कामे ठप्प राहतात पर्याय म्हणून शासकीय कर्मचारी असताना सुद्धा खाजगी माणसे तलाठ्याजवळ कामे करतात याविषयी तक्रारदार राहुल मनोहरे आणि गावातील नागरिकांनी जिल्हाधिकारी साहेब अमरावती त्यांच्याकडे तक्रार दिली असता सदर कोतवालाचे नियुक्तीचे अधिकार आणि कामाचे अधिकार तहसीलदार कार्यालय यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी ती चौकशी करून अहवाल द्यावा असे पत्र जिल्हाधिकार्यालयातून तक्रार करताना प्राप्त झालेली आहे परंतु आतापर्यंत तहसीलदार धामणगाव रेल्वे यांनी कुठलीही माहिती तक्रार करताना दिलेली नाही.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, मंगळवार,२४ मार्च २०२६



## थोडक्यात

### कत्तलीसाठी जाणारी जनावरे पकडली

चांदूर बाजार : कत्तलीच्या उद्देशाने जनावरांची वाहतूक करताना शिरजागव कसबा पोलिसांनी कारवाई केली. दरम्यान तेथे आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींना फिर्यादी पोकों दिलीप सुदर्शन गवई यांच्या हातावर काठीने मारून जनावरे घेवून पळ काढला. या प्रकरणी शिरजगाव कसबा पोलिसांनी अब्दुल सलीम शेख सलीम (४५), मोहम्मद आझाद अब्दुल रहेमान (४८) दोघेही रा. करजगाव व अन्य दोघे अशा चौघांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला. पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहे.

### २२ क्विंटल हरभऱ्याची राखरांगोळी

वरुड : बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशन हद्दीतील गाडेगाव ते हातुर्णा या राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या नांदगाव शेतशिवारात शेतकरी प्रकाश रामराव सोनारे यांच्या शेतातील हरभऱ्याच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना बुधवार, १८ मार्च रोजी मध्यरात्रीनंतर घडली. त्यात अडीच एकरातील सुमारे २२ क्विंटल हरभऱ्याची गंजी पूर्णपणे जळून खाक झाली. त्यामुळे शेतकऱ्याचे अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्याने शासनाकडे नुकसानभरपाईची मागणी केली असून, पुढील तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी ललित तायडे करत आहेत.

### घरातून बकरीसह बोकड लंपास

अमरावती : अज्ञात चोरट्याने अंगणात बांधलेल्या दोन बकरींपैकी एक बकरी व एक बोकड चोरून नेले. त्यांची अंदाजे किंमत २७ हजार रुपये आहे. ही घटना कंवर नगर झोपडपट्टी परिसरात घडली. रवि कन्हैय्या चावरे (३३) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### मारहाणीत वृध्द गंभीर जखमी

अमरावती : शेजारी राहणारा वृद्ध फिर्यादी गजानन सावरकर (४८, रा. टाकरखेडा संभू) यांच्याकडे आला. फिर्यादीला माझा नातू कुठे आहे म्हणून विचारणा करू लागला. फिर्यादीने त्याला माहीत नाही म्हणून उत्तर दिले. त्यामुळे चिडलेल्या वृद्धाने विटेचा तुकडा त्याला मारून फेकला. त्यात फिर्यादीच्या कानाला दुखापत झाली. ही घटना टाकरखेडा संभू येथे घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून वलगाव पोलिसांनी साहेबराव भालचक्र (६५) याच्यावर गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलीस करीत आहे.

### सील केलेल्या मालमत्तेवर अनाधिकृतपणे वास्तव्य

अमरावती : कर्जाचा भरणा न केल्याने बँकेने गीतेश विठ्ठलराव खोबरे (४३, रा. केसर कॉलनी, नवीन आकोली) यांची मालमत्ता सील केली. त्याने सील मालमत्तेचे कुलूप तोडून तेथे अनाधिकृतपणे वास्तव्य सुरू केले. या संदर्भात बँकेचे मुख्य प्रबंधक महेशकुमार एस (४६) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी खोबरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### बांधकामादरम्यान पडल्याने मजुराचा मृत्यू

अमरावती : बांधकामावर जिन्याचे लोखंड बांधण्याचे काम सुरू होते. त्यावेळी धारेंद्र सुखदेवराव गणवीर (५२, रा. न्यू कॉलनी महादेवखोरी) हे जिन्यावरून खाली प्लिंथवर पडले. त्यात लोखंडी सळाख त्याच्या छातीच्या डाव्या बाजूच्या बरगडीतून घुसून उजव्या खांद्याच्या वरील बाजूस निघाली. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# कर्जवसुलीसाठी बँक अधिकाऱ्यांचा तगादा!

## पोलिस संरक्षणासाठी की शेतकऱ्याच्यांच्या दारावर धमकाविण्यासाठी?

**अजिंक्य भारत | पुरूषोत्तम पोटोडे**

**बेनोडा (श.), दि.२३ :** वरुड तालुक्यात मार्च एडिंगच्या नावावर शासकीय कार्यालयात कामकाजाची तर बँकांकडून कर्जवसुलीची मोहीम सर्वत्र सुरू असल्याचे दिसत आहे. एकीकडे कर्जदाराच्याच भरवशावर निर्भर असताना मात्र, त्याच कर्जदारांना एनपीएच्या नावावर धमक्या देऊन, कर्ज वसुलीचा तगादा लावून वसुली केली जात आहे. त्यासाठी सध्या पथके कर्जदाराच्या सभोवताल घिरट्या मारताना दिसत आहे. कर्जदाराला एकाचवेळी पाच सात कर्मचारी धाकदपट करून तर कधी पोलिसाचा धाक दाखवून वसुली करीत आहे. त्यामुळे कर्जदार या वसुलीकर्त्यांना कंटाळले आहेत. याबाबत सहकार विभाग मात्र मूग गिळून गप्प बसले आहे. कर्ज वसुलीच्या तगाद्यामुळे तालुक्यांतील कित्येकांनी आजपावेतो आत्महत्या केली आहे. तालुक्यात संत्रा उत्पादक आणि व्यावसायिक मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था व फायनान्स कंपन्या तालुक्यात वाढतीवर आहे.




कर्जदारांना प्रोत्साहन देण्यासाठी दारोदार भटकणारेच, वसुलीकरिता जीवघेणा तगादा लावून कर्जदारांना मानसिक त्रास देत आहे. अशी ओरड सध्या तालुक्यातील कर्जदारांमध्ये आहे. रात्री, अपरात्री वसुली पथक कर्जदाराच्या घरी जाऊन कर्जाच्या परतफेडीसाठी अपमानित करीत आहेत.

मार्च महिन्याचे निमित्त पुढे करून हा सपाटा सुरू आहे.

एवढ्यावर हा प्रकार थांबत नाही, तर सहकारी पतसंस्था व फायनान्स बँक, बँकेचे मॅनेजर व अध्यक्ष तालुक्यातील पोलिस स्टेशनचे ठाणेदार संगनमत करून पोलिस बंदोबस्त करून बँकेची कर्जवसूलीसाठी फी भरून घेतात व बँकेला कर्ज वसूलीसाठी पोलिस बंदोबस्त देतात. तसेच बँकानी घेतलेले कोरे धनादेश वटविण्यास संबंधित बँकेत पाठवून धनादेश अनादरित करून तसेच शेतकऱ्याची जमीन व घरजप्ती सिविल केसेस बँकेने कोर्टात दाखल केल्या आहे.

कर्जदारांवर खटले दाखल केले जात आहेत आणि वरुड कोर्ट आणि अमरावती कोर्टात शेतकऱ्यावर खटले दाखल केलेले आहे. ५ ते १० वर्षापासून खटले चालू आहे. शेतकरी हा कोर्टात तारखेवर न गेल्यास व कर्जाचे पैसे न भरल्यास वरुड-अमरावती कोर्ट शेतकऱ्याचा पकड वारंट काढतो. पोलिस त्यांना घरून रात्री अपरात्री उचलून पोलिस स्टेशनला नेतात. तेथून ते दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर करतात वारंट रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांना जमानत घ्यावी लागते जमानात नाही झाली तर अमरावती जेल मध्ये जावे लागते. शेतकऱ्यावर हा शासनाकडून एक प्रकारचा अन्याय होत असून त्या शेतकऱ्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्यासारखे होत आहे. शेतकरी हा देशाचा व जगाचा अन्नदाता आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार म्हणतो की आम्ही शेतकऱ्याच्या पाठीमागे आम्ही खंबीरपणे उभे आहो. परंतु तशी परिस्थिति शेतकऱ्यांविषयी दिसत नाही.

एकीकडे कर्ज बाजारी दुसरी कडे नापिकी मुळे शेतकरी हतबल झाला असून त्या शेतकऱ्यामध्ये बँकेच्या कर्जाचा तगादा, कोर्ट केसेस, पोलिसांचा धाक यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. सहकारी बँका, पतसंस्था व फायनान्स कंपन्या कर्जदारांकडून स्वाक्षरी केलेले कोरे धनादेश हमी म्हणून घेत असतात. आता त्याचा गैरफायदा घेणे सुरू आहे. पतसंस्था, फायनान्स बँक, कोर्ट, पोलिस विभाग, सहकार विभाग यांची एकी असल्यामुळे शेतकरी दहशतीत आहे. त्यामुळे यापासून दिलासा मिळावा याकरिता शासनाने याकडे विशेष लक्ष देऊन न्याय देण्याची मागणी कर्जदारांकडून करण्यात येत आहे. तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पालकमंत्री अमरावती चन्द्रशेखरजी बावनकुळे, जिल्हाधिकारी अमरावती, यांना पत्रकाद्वारे निवेदन सादर केले आहे.

# बिल वसुलीसाठी शेतकरी महावितरणच्या रडारवर

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती,दि.२३ :** थकीत वीज बिलाच्यावसुलीसाठी महावितरणने आता शेतकऱ्यांकडे मोर्चा वळविला आहे. ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या तब्बल कृषिपंपाना वीज बिल सादर करणे बंधनकारक आहे. अमरावती परिमंडळातील पंपधारक शेतकऱ्यांकडे २०१ कोटी ६४ लाख रुपयांचे वीज बिल थकीत आहे. त्यामुळे बिल न भरणारे शेतकरी आता महावितरणच्या रडारवर आहेत.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, बळीराजा मोफत वीज योजना ही सर्व कृषिपंपधारकांसाठी लागू नसून केवळ ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या कृषिपंपांसाठीच लागू आहे. या योजनेअंतर्गत शासनाने २०२५ ते २०३० या कालावधीत अशा पंपांचे चालू वीजबिल शून्य केले आहे. मात्र ७.५ एचपी किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या कृषिपंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक असल्याचे महावितरणचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी परिमंडळातील ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या एकूण ६ हजार ७६ कृषिपंपधारक शेतकऱ्यांकडे २०१ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यापैकी अमरावती जिल्ह्यातील ४ हजार ९८ शेतकऱ्यांकडे १०६ कोटी २ लाख रुपयांची थकबाकी आहे, तर यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार २७८ शेतकऱ्यांकडे २५ कोटी ६२ लाख रुपयांची वीजबिल थकीत आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदार शेतकऱ्यांना वेळेत वीजबिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत विकेंद्रित स्वरूपातील सौर प्रकल्प उभारणी, फीडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

# पत्रकार रमेश इंगळेंचा खा.बळवंत वानखडेकडून सत्कार

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**दर्यापूर, दि.२३ :** दर्यापूर गेल्या पंचेचाळीस वर्ष अगोदर साप्ताहिक विवाह झाला की निर्मिती रमेश भाऊ इंगळे यांनी केली व पाहता पाहता आज ४५ वर्ष पूर्ण झाले आहे पेपरला कुठेही खंडित न करता अखंडपणे पेपरा त्यांनी जनतेसमोर ठेवला त्यानिमित्ताने त्यांच्या सेवाकार्याचा गौरव म्हणून खासदार बळवंत वानखडे यांनी रमेश भाऊ इंगळे यांच्या कार्याचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ची मूर्ती शाल श्रीफळ बुके देऊन प्रेस क्लब दर्यापूरचे सचिव तथा गाडगे महाराज मिशन मुंबईचे संचालक श्री गजानन देशमुख यांच्या उपस्थितीत गौरव केला व त्यांच्या सेवा कार्याला मनापासून शुभेच्छा दिल्या त्याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते श्री मन्सूर भाई, दादाभाऊ इंगळे, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष नंदू भाऊ मेहेरे यांनी सुद्धा रमेश भाऊ यांना शुभेच्छा दिल्या.



# दुय्यम निबंधक कार्यालये सुट्टीच्या दिवशी चालू

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती,दि.२३ :** आर्थिक वर्षाच्या शेवटी मालमत्ता खरेदी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दि. २६ मार्चपासून सलग ही कार्यालये सुरू राहतील.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांत नियंत्रक यांच्या निर्देशानुसार, इष्टांक पूर्तीच्या दृष्टीने दि. २६ मार्च, दि. २८ मार्च, दि. २९ मार्च आणि दि. ३१ मार्च या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये चालू राहतील.

तसेच ज्या कार्यालयांची साप्ताहिक सुट्टी ही शनिवार आणि रविवार सोडून अन्य दिवशी आहे. ती कार्यालये त्यांच्या दोन साप्ताहिक सुट्ट्यांपैकी एक दिवस चालू ठेवावीत. उपरोक्त दिवसांसाठी दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसेच अभिनिर्णय व कमी पडलेले मुद्रांक शुल्क इत्यादी कामकाज विहीत वेळेत पूर्ण होण्यासाठी सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालये देखील कार्यरत राहणार आहे.

# वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची गरज

## आ.संजय खोडके यांचे प्रतिपादन

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती,दि.२३ :** महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास विदर्भात सर्वाधिक वनपरिक्षेत्र असून वन्यजीवांचा मोठा अधिवास आहे. वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण करण्यासह मानवांना सुद्धा वन्यप्राण्यांपासून धोका पोहोचू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या वन्यजीव संरक्षक दुरुस्ती विधेयक २०२६ चा उपयोग खऱ्या अर्थाने विदर्भाला होण्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची सुचना आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून केली आहे.



महाराष्ट्र विधानसभेने वन्यजीव संरक्षण संशोधन विधेयक २०२६ पारित केले आहे. या शासकीय विधेयकावर आज अधिवेशनाच्या अठराव्या दिवशी विधानपरिषदेमध्ये चर्चा होत असतांना आ.संजय खोडके यांनी या विधेयकाला पाठिंबा जाहीर करीत समर्थन दिले. तसेच सदर केंद्र शासनाच्या वन्यजीव संरक्षण कायद्यामध्ये राज्यशासनाच्या वतीने दुरुस्ती करण्यात येत असतांना त्यामध्ये विदर्भातील वन्यजीव परिक्षेत्राला चांगला उपयोग होण्यासाठी गांभीर्याने लक्ष देण्याची सुचना आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष केली. आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेमध्ये सांगितले कि, भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ ,मध्ये दुरूस्ती करण्याचे विधेयक महाराष्ट्र शासनाने आणले आहे. यामध्ये वन्यजीव संरक्षण अधिनियम च्या कलम १२ अंतर्गत ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यामध्ये मुख्य वन्यजीवांचे पर्यायी अधिवास स्थानांतरण करणे, वनजीवन संख्येचे व्यवस्थापन करणे यासाठी हे विधेयक आणले असून या विधेयकामुळे वन्यजीव व मानव या संघर्षाला आळा बसणार असल्याचे सांगून आ.संजय खोडके यांनी राज्यशासनाचे अभिनंदन केले. आमदार संजय खोडके यांनी सभागृहाचे ध्यानाकर्षण करतांना सांगितले कि, नुकतेच काही दिवसांपूर्वी राज्यात वन संरक्षक निधी मधून निधीचे वाटप करण्यात आले.

# चांदूर रेल्वेत ‘ईद-उल-फित्र’ उत्साहात साजरी

## ईदगाहवर सामूहिक नमाज पठण; बंधुभाव एकात्मतेचा दिला संदेश

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, दि.२३ :** मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान ईद (ईद-उल-फित्र) सण शनिवारी (ता. २१) चांदूर रेल्वे शहरात मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. शहरासह तालुक्यातील शेकडो मुस्लिम बांधवांनी ईदगाह मैदानावर एकत्र येत सामूहिक नमाज अदा केली व देशातील शांतता, सुख-समृद्धीसाठी अल्लाहकडे प्रार्थना केली.महिनाभर रमजानचे रोजे पूर्ण केल्यानंतर साजरा होणारा ‘ईद-उल-फित्र’ हा मुस्लिम समाजातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून आपापसातील हेवेदावे, मत्सर विसरून एकत्र येण्याचा व बंधुभाव वाढविण्याचा संदेश दिला जातो. तसेच आत्मशुद्धी, संयम आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्वही या सणातून अधोरेखित केले जाते.



ईदगाह मैदान परिसरात माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसह उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक निलेश विश्वकर्मा यांनीही मुस्लिम भागात भेटी देत शुभेच्छा व्यक्त केल्या. याशिवाय माजी नगराध्यक्ष गणेश रॉय यांनीही मुस्लिम बांधवांशी चौकात भेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

ईदच्या नमाजपूर्वी दानधर्म करण्याची परंपरा असून, याला ‘सदका-ए-फित्र’ असे म्हटले जाते. समाजातील दीनदुबळ्यांबद्दल जाणीव ठेवून अनेकांनी गरजूंना आर्थिक मदत केली आणि त्यानंतरच नमाजासाठी ईदगाहकडे प्रस्थान केले.शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी ८.१५ वाजता मुख्य नमाज अदा करण्यात आली. यावेळी मौलवी सिराज यांनी नमाज पठण केले. तर कुऱ्हा रोडवरील मस्जिदमध्ये सकाळी ८.४५ वाजता आलीम अक्रम लाखानी यांनी नमाज अदा केली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ‘ईद मुबारक’च्या शुभेच्छा दिल्या.ईदनिमित्त सकाळपासूनच मुस्लिम बांधव नवीन पोशाख परिधान करून नमाजासाठी ईदगाहकडे जाताना दिसून आले. सर्वांनी एकत्र येत आनंद, उत्साह आणि बंधुभावाने सण साजरा केला. ईदच्या दिवशी प्रत्येक घरात पारंपरिक गोड पदार्थ ‘शीरखुर्मा’ तयार करण्यात आला. दूध, शेवया आणि सुकामेव्याने बनवलेला हा पदार्थ ईदच्या आनंदात अधिक भर घालणारा ठरतो.

**सुयश** मुख्यकार्यपालन अधिकारी संजिता महापात्र यांनी केले विद्यार्थ्यांचे कौतुक

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांची भरारी

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२३ :** जवाहर नवोदय विद्यालय करिता सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षांकरिता इयत्ता सहावी मध्ये प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेमध्ये यावर्षी जिल्हा परिषदेच्या तब्बल 35 विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.मागील वर्षी जिल्हा परिषदेचे १८ विद्यार्थी निवडीस पात्र ठरले होते .त्या तुलनेत यावर्षी जवळजवळ दुप्पट म्हणजे एकूण ३५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.विशेष म्हणजे शिष्यवृत्ती परीक्षा तसेच नवोदय परीक्षेमधील विद्यार्थ्यांच्या यशाचा टक्का वाढवा म्हणून मुख्य कार्यकारी



अधिकारी संजीता महापात्र यांनी विशेष उपक्रम जिल्ह्यामध्ये राबविले.यामध्ये जिल्हा स्तरावरून विद्यार्थ्यांकरीता सराव चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते तसेच नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शीकांची छपाई करून शाळांना वितरित करण्यात आल्या. शाळास्तरावर अतिरिक्त मार्गदर्शनाकरिता सर्व शिक्षकांना प्रोत्साहित करण्यात आले होते.



जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री सतीश मुगल यांनी सुद्धा विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले असून माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांबद्दल त्यांचे शिक्षण विभागाच्या वतीने आभार व्यक्त केले आहे.

जवाहर नवोदय विद्यालया करीता निवड झालेल्यामध्ये योगिनी पंकज धरपवार, अचलपूर, तेजश्री नरेंद्र बुलहारे, अमरावती, नयना नितीन खांडेकर, अमरावती, स्वरा संजय तायडे, अमरावती, प्रम राहूल गवई,अंजनगाव सुर्जी,श्रीजित सोपान शेन्द्रे भातकुली, अवेंश मंगेश मेश्राम,भातकुली, समृद्धी सतीश वासनिक, चांदूर रेल्वे,सतेज तेजस्वी चांदूर रेल्वे,अंकुश कैलास येवले चिखलदरा, सोनल संतोष बेलकर,चिखलदरा, सुभाष सुनील धांडे,चिखलदरा, अपर्णा संजू मावस्कर चिखलदरा, आरुषी इंद्रपाल नागदिवे, चिखलदरा, समीक्षा सुरेश आठोले चिखलदरा, देवांश कैलाश बेलकर, चिखलदरा, विशाखा साबुलाल बेलसरे चिखलदरा, तुषार टिकाराम जामुनकर, चिखलदरा, तनवेश अरविंद वानखाडे दर्यापूर, ईशासानी जितेंद्र रायबोले, दर्यापूर, प्राची सचिन बाहेकर दर्यापूर, जितेश प्रमोद लोंकर, दर्यापूर,कांचन प्रमोद दखने, धामणगाव रेल्वे रूपसा राधेशम भिलावेकर धारणी,संस्कृती प्रशांत टेकाडे,मोर्शी, प्रज्वाल विष्णू अकोटकर,मोर्शी,ईश्वरी अनिल गुलक्षे, मोर्शी, ऋषिकेश सुनीलराव बी गुलामक्षे ,मोर्शी,वैभवी दिनेश कांठाले, नांदगाव खंडे,माही श्रीकृष्णा गोडबोले, नांदगाव ख. मयुरी नितीन गिरटकर,नांदगाव खंडे.भक्ती सुनीलराव चौधरी नांदगाव ख.ईश्वरी रुपेश निंगोट,नांदगाव खं. स्वरा अमोल हादे,जीविका मंगेश कोडापे,वरूड या विद्यार्थांचा सहभाग आहे.

# बिसीआयने केला कर्तुत्ववान महिलांचा सत्कार



**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**तिवसा, दि.२३ :** उत्तम कापूस प्रकल्प कॉटन कनेक्ट व विकासगंगा समाजसेवी संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदोळा बुद्रुक येथे दि. २१ मार्चला महिला दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मेश्राम यांनी केले . महीला शेतकरी आधार नसताना सुद्धा स्वत: शेती करून कशाप्रकारे परिस्थितीला तोंड देऊन समोर गेल्या याबाबत त्यांचे मनोगत त्यांनी सांगितले. तसेच एखादा उद्योग करून महिला कशाप्रकारे कुटुंबाला हातभार लावू शकते याबाबत देखील काही महिलांनी माहिती दिली. गायत्री चरडे व स्वप्निल दोडके प्रवीण रामटेके यांनी प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती आणि महिलांची शेती, घर किंवा इतरत्र कोणत्याही कामांमध्ये त्यांची भूमिका कशी असायला पाहिजे याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सरपंच प्रीतीताई उईके ),प्रमुख पाहुणे- कोहळे मॅडम मयुरी धसकट भावना मॅडम अर्चना डोळस वैष्णवी तालन गायत्री चरडे त्यांना तसेच विविध बचत गट पदाधिकारी आणि बीसी शेतकरी, शेतमजूर महिला हजर होत्या. तसेच सामाजिक कार्यामध्ये उद्योग तसेच आरोग्य विषयी ज्या महिलांची उल्लेखनीय कामगिरी आहे त्यांचा सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात



### फुलसावंगी येथे रमजान ईद उत्साहात साजरी

**फुलसावंगी :** येथे २२ मार्च २०२६ रोजी पवित्र रमजान महिन्याची सांगता करत 'ईद-उल-फितर' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी एकत्र येत विशेष नमाज अदा केली. मुफ्ती सय्यद मुनव्वर यांनी यावेळी इस्लाममधील सामाजिक मूल्ये, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश दिला. शांततापूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उत्सवात पोलीस प्रशासनानेही सहभाग नोंदवला. मार्गदर्शन करताना मुफ्ती सय्यद मुनव्वर यांनी स्पष्ट केले की, इस्लाम ज्येष्ठ नागरिकांचा आदर आणि लहानांवर प्रेम करण्याचा आदेश देतो. जकात व फित्रा देऊन गरीब व गरजू घटकांना आधार देणे हीच खरी ईदची परंपरा असल्याचे त्यांनी नमूद केले. नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंबोरे, सुहास कायटे, कैलास मुखाडे, विशाल गावंडे, सुनील जाधव, मंगला घोती, सतीश पवार आणि पोलीस मित्र परमानंद भारती यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फूल देऊन शुभेच्छा दिल्या. गावात ठिकठिकाणी नागरिकांनी एकमेकांच्या घरी भेटी देऊन सणाचा आनंद लुटला. लहान मुलांनी नवीन कपडे परिधान करून ईदीचा आनंद घेतला, तर महिलांनी पारंपरिक पदार्थांची मेजवानी तयार केली होती. पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून, गुलाबाची फुले देऊन स्वागत करण्याच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. या पवित्र सणामुळे फुलसावंगी परिसरात सामाजिक ऐक्य, प्रेम आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ झाल्याचे पाहायला मिळाले.




### नेरच्या नेहरू महाविद्यालयातील रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेर :** येथील नेहरू महाविद्यालय नेर येथे १३ मार्च २०२६ रोजी प्लेसमेंट सेल, करिअर कट्टा आणि जिल्हा कौशल्य विकास केंद्र, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोजगार मेळावा संपन्न झाला. एकूण २२५ पदांसाठी आयोजित या मेळाव्यात विदर्भातील विविध शहरांतून आलेल्या विद्यार्थ्यांपैकी ६८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, त्यांना पुढील प्रशिक्षणासाठी पाचारण करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष परमानंद अग्रवाल आणि कार्याध्यक्ष रवि अग्रवाल यांच्या रोजगाराभिमुख मार्गदर्शनाखाली हा मेळावा पार पडला. संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र चिरडे आणि सचिव मजहरखान पठाण यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. मेळाव्यात सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक, प्लंबर, इलेक्ट्रिशियन आणि हाऊस कीपिंग या पदांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उदय मांजरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. व्यासपीठावर हैदराबाद येथील कैरोस कंपनीचे ज्ञानेश्वर बिट्टेवार, उत्कर्ष फायनान्सचे राहुल वासनिक, डॉ. प्रवीण बनसोड, संयोजक डॉ. दीपक भगत आणि ग्रंथपाल प्रा. सुरेश इंगळे उपस्थित होते. संचालन डॉ. शीतल जाधव यांनी केले, तर आभार प्रा. कोमल भाकरे यांनी मानले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी डॉ. पंकज विश्वकर्मा, प्रा. फिरोज सहाळा, डॉ. वैभव बोके, डॉ. शांतरक्षित गावंडे, डॉ. विष्णू कुटे, प्रा. प्रसाद निळे, प्रा. धवने आणि अनिकेत देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा मेळाव्यांचे आयोजन अत्यंत महत्वाचे ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### जाब विचारल्याने कुटुंबावर हल्ला


**कळंब:** फोनवर शिवीगाळ का केली, याचा जाब विचारल्याच्या रागातून एका व्यक्तीने बहिणीसह कुटुंबातील चौघांना मारहाण केली. ही घटना २० मार्च रोजी मंगरूळ येथे घडली. फिर्यादी मंगला कोहळे (३५) यांनी आपला भाऊ आरोपी अरुण सोनवणे याला विचारणा केली असता, त्याने मंगला यांच्या डोक्यावर व मनगटावर काडीचा झोडपा मारला. भांडण सोडवण्यासाठी आलेले वडील, मोठी बहीण आणि भावालाही आरोपीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. कळंब पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### थकबाकीमुळे महावितरणने सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा खंडित करण्याचा दिला इशारा

# जिल्ह्याचा पाणीपुरवठा होणार ठप्प?

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २३ : अमरावती परिमंडळातील अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांत १४८ कोटी रुपयांच्या वीज बिल थकबाकीमुळे महावितरणने सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा खंडित करण्याचा कठोर इशारा दिला आहे. आर्थिक वर्ष संपण्यास केवळ आठ दिवस शिल्लक असल्याने वसुली मोहीम तीव्र करण्यात आली असून, यामुळे निर्माण होणाऱ्या कृत्रिम जलसंकटास सर्वस्वी संबंधित विभाग जबाबदार राहतील, असे महावितरणने रविवारी (दि. २२) स्पष्ट केले आहे.**




महावितरणच्या वतीने वीज बिलांची वसुली करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. थकीत बिलांची रक्कम भरण्यासाठी महावितरणकडून संबंधित पाणीपुरवठा विभागांशी वारंवार संपर्क साधण्यात आला. प्रत्यक्ष भेटीगाठी, अधिकृत पत्रव्यवहार, स्मरणपत्रे आणि मोबाईल संदेशांच्या माध्यमातून सातत्याने वीज बिल भरण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले होते. मात्र, या सर्व प्रयत्नांना संबंधित विभागांकडून अपेक्षित आणि सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने महावितरणने आता अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई आता अपरिहार्य बनली असून, यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. वीज निर्मिती आणि वितरणाचा डोलारा सांभाळण्यासाठी महावितरणला ग्राहकांकडून वेळेवर वीज बिल मिळणे अत्यंत आवश्यक असते. त्यातच सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांसारख्या महत्त्वाच्या ग्राहकांकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी अडकून पडल्याने महावितरणच्या दैनंदिन कामकाजावर आणि देखभाल दुरुस्तीवर गंभीर परिणाम होत आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी आता अवघ्या काही दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. मार्च महिन्यातील वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महावितरणने आपल्या कारवाईला अधिक गती दिली आहे. या कठोर मोहिमेअंतर्गत आतापर्यंत मोठी कारवाई करत, सव्वा कोटी रुपयांच्या थकबाकीसाठी तब्बल अठ्ठावीस सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे. कारवाईचा हा बडगा असाच सुरू राहिल्यास आगामी काळात अनेक गावे आणि शहरांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागेल आणि या कृत्रिम जलसंकटाची संपूर्ण जबाबदारी पाणीपुरवठा योजना चालवणाऱ्या संस्थांवर असेल. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायती आणि नगरपालिका प्रशासनांनी तातडीने आपल्या थकीत बिलांचा भरणा करून महावितरणला सहकार्य करावे, असे स्पष्ट आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

> **थकबाकीदार योजनांची जिल्हानिहाय आकडेवारी**
>
> **अमरावती परिमंडळात एकूण ३ हजार ९८७ सार्वजनिक पाणीपुरवठा योजना थकबाकीदार आहेत. त्यांच्याकडे तब्बल १४८ कोटी ४९ लाख रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील २ हजार ३० योजनांकडे ८९ कोटी ६३ लाख रुपयांचे वीज बिल थकीत आहे. तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ९५७ योजनांकडे ५८ कोटी ८५ लाख रुपयांची थकबाकी आहे. या प्रचंड थकबाकीमुळे कारवाई अटळ मानली जात आहे.**

## घाटंजीत अल्पवयीन दुचाकीस्वारांचा धुमाकूळ

### भरधाव वाहनाच्या धडकेत महिला गंभीर जखमी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**घाटंजी, दि. २३ :** शहरात शुक्रवारी (दि. २०) रात्री एका भरधाव दुचाकीने महिलेला जोरदार धडक दिली. दुचाकी चालवणारा मुलगा अल्पवयीन असून, या अपघातात महिला आणि मुलगा दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. परवाना नसतानाही पालकांनी पाल्यांच्या हाती वाहने दिल्याने आणि वाहतूक नियमांच्या पायमल्लीमुळे हा अपघात घडल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरात अल्पवयीन मुलांकडून वेगाने दुचाकी चालवण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून, शाळा आणि शिकवणी वर्गांच्या नावाखाली विद्यार्थी ट्रिपल सीट प्रवास करीत आहेत. शुक्रवारी झालेल्या अपघातात जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शहरातील मुख्य रस्ते प्रशस्त असले तरी फुटपाथवरील अतिक्रमणे आणि रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा मार्ग अरुंद झाला आहे. रस्त्यांवर विखुरलेली गिट्टी आणि चुरा यामुळे वाहने घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. केवळ अल्पवयीनच नव्हे, तर नशेच्या अवस्थेत बेफाम वाहन चालविणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. नगर परिषदेने शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असले, तरी वाहतूक विभागाकडून प्रभावी कारवाई होताना दिसत नाही. पोलिस प्रशासनाने या कॅमेऱ्यांमधील फुटेज तपासून नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. विशेषतः शिकवणी वर्गांच्या मार्गावर अधिक कॅमेरे बसवण्याची गरज असून, पालकांनीही आपल्या पाल्यांना विनापरवाना वाहन देऊ नये, असे आवाहन केले जात आहे. कोलमडलेल्या वाहतूक व्यवस्थेमुळे पादचाऱ्यांचे जगणे धोक्यात आले असून, प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास मोठ्या अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. शहरातील वाढती वर्दळ आणि बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. या सर्व प्रकारावर नियंत्रण मिळविण्यासाठी ठोस यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

## पुसद येथे पदयात्रींसाठी 'गोर अन्नछत्रालया'चा प्रारंभ; मंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते उद्घाटन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि. २३ :** येथे श्रीराम नवमीच्या निमित्ताने जगदंबा माता आणि संत सेवालाल महाराज यांच्या दर्शनासाठी पोहरादेवीकडे जाणाऱ्या पदयात्रींसाठी भव्य 'गोर अन्नछत्रालया'चे आयोजन करण्यात आले आहे. मंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते नुकतेच विधीवत भोगपूजन करून या उपक्रमाचे उद्घाटन झाले. भक्तांची सेवा हीच ईश्वर सेवा असल्याचे सांगत त्यांनी या परंपरेचे कौतुक केले.

स्थानिक सेवालाल महाराज गोर छात्रालय येथे आयोजित या उपक्रमातून हजारो भक्तांच्या भोजन व विश्रांतीची सोय करण्यात आली आहे. मंत्री इंद्रनील नाईक यांनी स्व. राज नाईक यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांचा वारसा तरुण पिढी समर्थपणे चालवत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. सोहळ्याला जितेंद्र महाराज, राजूदास जाधव, कैलास महाराज हेगडी, रामेश्वर महाराज, दीपक आसेगावकर आणि उमाकांत पापींनवार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी श्रीराम पवार, दयाराम चव्हाण, राजेश सोळंके, विठ्ठल खडसे, विजय जाधव, अभिजीत पानपट्टे, बाबूसिंग आडे, ऋषिकेश पंडितकर, अक्षय महाकाळ, करण ढेकळे, सुनील ढाले, मजहर खान, झहीर भाई, निखिल ठाकरे, नितीन पवार, अशोक वडते, बी. झी. राठोड, आशिष काळबांडे, कय्युम भाई, इरफान भाई, मदनभाऊ गायकवाड, डॉ. मधुकर नाईक आणि रणवीर पाटील उपस्थित होते. प्रा. नरेंद्र जाधव यांनी सूत्रसंचालन केले, तर उत्तम जाधव यांनी आभार मानले.

## रामनवमीनिमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. २३ :**बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी येथे रामनवमीनिमित्त २५ आणि २६ मार्च २०२६ रोजी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दिग्रस येथील गायत्री फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा राठोड हॉस्पिटलचे संचालक डॉ. उत्तम राठोड यांच्या वतीने देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी ही वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाणार असून, यात मोफत तपासणी व औषध वितरण केले जाईल.

रामनवमीच्या पावन पर्वावर महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशसह देशभरातून पोहरादेवी येथे भाविकांची मोठी गर्दी उसळते. या पार्श्वभूमीवर डॉ. उत्तम राठोड दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजसेवेचा अभिनव उपक्रम राबवत आहेत. या दोन दिवसीय शिबिरात भाविकांची मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधांचे विनामूल्य वितरण करण्यात येईल. यात्रेदरम्यान गर्दीमुळे होणारा त्रास, थकवा किंवा अचानक उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार मिळण्यासाठी डॉ. उत्तम राठोड यांची विशेष टीम कार्यरत राहणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या या उपक्रमामुळे दुर्गम भागातून येणाऱ्या भक्तांना मोठा दिलासा मिळतो. धार्मिक उत्साहासोबतच मानवी सेवेचा वारसा जपणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या आरोग्य सेवेचा लाभ गरजू भाविकांनी घेण्याचे आवाहन डॉ. उत्तम राठोड यांनी केले आहे. या शिबिरामुळे ऐन उन्हाळ्यात आणि गर्दीच्या वेळी भाविकांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळणे सुलभ होणार आहे.

## कनिष्ठ अभियंत्यासह पाच जणांच्या निलंबनाचा प्रस्ताव सादर

### महागाव तालुक्यातील घाणमुख ग्रामपंचायतीचे भ्रष्टाचाराचे प्रकरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**महागाव, दि. २३ :** महागाव तालुक्यातील घाणमुख ग्रामपंचायतीत झालेल्या कोट्यवधींच्या भ्रष्टाचारप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते राम जाधव यांनी शुक्रवारी (दि. २०) उपोषण सोडले. चौकशीत दोषी आढळलेले कनिष्ठ अभियंता प्रवीण सलामे यांच्यासह पाच जणांविरुद्ध गटविकास अधिकाऱ्यांनी निलंबनाचा '१ ते ४' प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवला असून, फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया आता प्रशासनाने सुरू केली आहे.

घाणमुख ग्रामपंचायत अंतर्गत उघडकीस आलेल्या या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात दीर्घकाळापासून कोणतीही ठोस कारवाई होत नव्हती. चौकशी समितीच्या अहवालात कनिष्ठ अभियंता प्रवीण सलामे यांच्यासह पाच जण दोषी असल्याचे स्पष्ट नमूद करूनही प्रशासनाकडून विलंब होत असल्याने राम जाधव यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या तीव्रतेमुळे प्रशासकीय यंत्रणा हलली असून, गटविकास अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर या उपोषणाची सांगता करण्यात आली.

आश्वासनानुसार, संबंधित दोषी अधिकारी, ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबनाचा प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला आहे. या प्रकरणातील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे झालेली आर्थिक वसुली होय. शासनाच्या निधीचा अपहार करणाऱ्या दोषींकडून ही रक्कम वसूल केली जाणार असून, त्यानंतर त्यांच्या विरोधात कठोर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे प्रशासकीय सूत्रांनी स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, या चौकशी दरम्यान केवळ घाणमुख ग्रामपंचायत मर्यादित हा भ्रष्टाचार नसून, महागाव तालुक्यातील इतर काही ग्रामपंचायतींमध्येही प्रवीण सलामे व काही ग्रामसेवकांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व प्रकरणांमध्येही शासनाची रक्कम वसूल करून संबंधितांवर कठोर सेवांतर्गत व कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. सध्या सुरू असलेल्या या हालचालींमुळे भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये काहीसा दिलासा असला, तरी प्रत्यक्षात दोषींना शिक्षा होईपर्यंत जनमानसाचे या प्रकरणाकडे लक्ष लागून राहणार आहे. शासनाचा पैसा हडपणाऱ्या कोणाही दोषीला पाठीशी घातले जाणार नाही, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली आहे.


## नगरपरिषद, पुसद जि.यवतमाळ

पिन-445204, President 246107, C.O. 246782, G.A.D. 246009, PWD NO.07233-244431
e-mail- mcpusad@gmail.com

जा.क्र.नपपु/पा.पु व स्वच्छता / 1061) /2026 दिनांक:- 23/03/२०२६

### जाहीर दरपत्रक सुचना

मुख्याधिकारी, पुसद नगरपरिषद, पुसद हे पुसद नगरपरिषद, पुसदच्या आरोग्य विभाग, अग्निशामन विभाग, पाणीपुरवठा विभाग या विभागातील वाहनांचे विमा काढणे/नुतनीकरण करणे, RTO फ़िटनेस करणे व इतर अनुषंगिक कामे करणेच्या कामा करीता योग्य वर्गात पंजीबध्द अनुभवी कंत्राटदाराकडुन / पुरवठा धारक/ ठेकेदार यांचे कडुन सिलबंद दरपत्रक मागवित आहे. लिफाफा बंद दरपत्रके रोखपाल, नगरपरिषद पुसद यांच्याकडे स्विकारण्यात येतील. प्रत्येक बाबींचा, अनामत, रक्कम नियम व अटी (कोरे) निविदा दरपत्रक व दरपत्रक शुल्क बाबतचा तपशिल व वाहनांचा तपशिल आरोग्य विभाग नगरपरिषद पुसद येथे कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून पाहावयास मिळतील.

तरी इछूक व्यापारी/संस्था यांनी जाहीर सुचना प्रसिध्द झाल्या पासुन दि. 01/04/2026 पर्यंत आपले सीलबंद लिफाफे खालील नमूद विवरणा प्रमाणे सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रक/निविदांचा विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा दरपत्रक शुल्क, इसारा रक्कम भरण्याचे व सीलबंद लिफाफे सादर करण्याचे ठिकाण | रोखपाल, नगरपरिषद पुसद |
| २ | प्रत्येक बाबींचा, अनामत, रक्कम, दरपत्रक शुल्क, नियम व अटी (कोरे) निविदा दरपत्रक मिळण्याचे ठिकाण | आरोग्य विभाग, नगर परिषद पुसद |

नोट:-
1. कोणत्याही प्रकारचे अॅडव्हांन्स दिले जाणार नाही.
2. ही जाहिर सुचना नगरपरिषदेच्या नोटिस बोर्डावर लावलेली आहे.
3. कोणत्याही किंवा सर्व निविदा (दरपत्रके) कारण न दर्शविता अमान्य किंवा बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी पुसद नपरिषद, पुसद यांनी राखुन ठेवला आहे.

**मुख्याधिकारी,**
**पुसद नगरपरिषद, पुसद**


# यवतमाळात 'प्रधान'समाज बांधवांचा महासंगम

### वधू-वर परिचय मेळावा उत्साहात; आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचा संस्कृती व परंपरेचा जागर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२३ :** संगीत गुरू हिरामण सुका लिंगो राज्यस्तरीय आदिवासी प्रधान समाज समितीच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा'यवतमाळ येथील बाळकृष्ण मंगल कार्यालयात मोठ्या थाटामाटात पार पडला. या मेळाव्याचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे यात महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड आणि आसाम अशा ९ राज्यांतील हजारो समाज बांधवांनी सहभाग नोंदवून आपली सांस्कृतिक एकता दर्शवली.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद अखिल भारतीय प्रधान जनजाती उत्थान संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष के.पी. प्रधान यांनी भूषवले. मेळाव्याची सुरुवात अत्यंत पारंपरिक पद्धतीने करण्यात आली. सभामंडपाच्या पूर्व दिशेला 'पेन ठाण्याची'स्थापना करून नैसर्गिक पद्धतीने पूजा मांडण्यात आली. पूजेचा मान मंदाताई माणिक मडावी आणि ज्योत्स्ना अरुण पोयाम या दांपत्यांना देण्यात आला. उपस्थितांनी श्रद्धेने पेन ठाण्याचे दर्शन घेतले. कार्यक्रमाचे उद्घाटन आदिवासी विकास मंत्री ना. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष म्हणून यवतमाळच्या नगराध्यक्षा डॉ. प्रियदर्शिनी उईके उपस्थित होत्या. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या प्रधान समाजाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा डॉ. प्रियदर्शिनी उईके यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात नामदार उईके यांनी समाजाच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. 'समाजाप्रति असलेले माझे दायित्व मी पूर्ण ताकदीने निभवेन आणि आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध राहीन,' असे अभिवचन त्यांनी यावेळी दिले. अध्यक्षीय भाषणात के.पी. प्रधान यांनी प्रधान जमातीचा इतिहास आणि संस्कृतीवर प्रकाश टाकला. संगीत गुरू हिरामण सुका लिंगो हे समाजाचे आद्य गुरू असून कचारगड ही त्यांची शहीद भूमी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'वधू-वर परिचय स्मरणिके'चे आणि प्रब्रह्मानंद मडावी लिखित गोंडी चित्रकार 'जन गण सिंह श्याम - गोंडी पेंटिंगचे जनक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या मेळाव्याला छत्तीसगड जनजाती आयोगाचे अध्यक्ष रूपसिंग मंडावी, राधेश्याम काकोडिया, प्रा. डॉ. प्रदीप गेडाम, वंदना कुळमते, दशरथ मडावी, नरेंद्र पोयाम, महेश सिडाम, मनोज गेडाम, शंकर मडावी, विद्या आत्राम (नगराध्यक्षा, वणी) यांच्यासह अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक उपशिक्षणाधिकारी राजू मडावी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तुषार आत्राम व सौ. प्रतिभा राजू किनके यांनी केले, तर आभार प्रा. प्रफुल्ल आडे यांनी मानले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी बंडू मेश्राम, नंदूभाऊ अरके, राजेश गेडाम, अशोक गेडाम, अरुण पोयाम, पुरुषोत्तम घोडांम, राजू किनके आणि संगीत गुरू हिरामण सुका लिंगो समितीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### नीलेश हेलोंडे यांचा जिल्हा दौरा



**यवतमाळ :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील हे बुधवारी, (दि. २५) जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते प्रामुख्याने पुसद उपविभागातील शेती आणि शेतकरी प्रश्नांचा आढावा घेणार आहेत. नियोजनानुसार, दुपारी २.३० वाजता त्यांचे पुसद येथे आगमन होईल. यावेळी ते तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांसोबत महत्वाची बैठक घेतील. या बैठकीत तालुक्यातील शेतकरी आत्महत्यांची स्थिती आणि शासकीय जमिनीवर चारा लागवड या विषयावर सविस्तर चर्चा केली जाईल. तसेच, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांसोबत आदिवासी शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा आढावा घेतला जाईल. दुपारी ३.३० वाजता ते आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतील. त्यानंतर सायंकाळी ४.३० वाजता ते काटोलकडे प्रयाण करतील.

### सावळी-सदोबा परिसरात गॅसचा तुटवडा

**सावळी-सदोबा :** आर्णी तालुक्यातील सावळी-सदोबा परिसरात घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा झाला आहे. यामुळे गृहिणींचा मोठ्या मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. ऑनलाइन बुकिंग करूनही वेळेवर गॅस सिलिंडर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांचे स्वयंपाकघर विस्कळीत झाले आहे. गॅसअभावी गृहिणींना पुन्हा चुलीचा किंवा जळतनाचा आधार घ्यावा लागत आहे. उज्ज्वला योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची टीका होत आहे. नागरिकांनी गॅस एजन्सीशी वारंवार संपर्क साधूनही त्यांना समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. 'बुकिंग होऊन अनेक दिवस उलटले तरी सिलिंडर कधी मिळेल याची स्पष्ट माहिती दिली जात नाही,' अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

### डोके फोडले

**आर्णी:** गणगाव येथे विनाकारण चापट मारल्याचा जाब विचारणाऱ्या तरुणाचे डोके लाकडी काठीने फोडल्याची घटना घडली. २० मार्च रोजी संध्याकाळी फिर्यादी राजेश अवझाडे (३५) यांना आरोपी गजानन मारबते याने विनाकारण कानशिलात लगावली. "मला का मारले?" असे विचारले असता आरोपीने राजेश यांच्याशी वाद घालून त्यांच्या डोक्यावर लाकडी काठीने वार केला. यात राजेश जखमी झाले असून, आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. आर्णी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# भांडेगाव टोल नाका बंदसाठी 'मविआ'चे पुन्हा आंदोलन

## पोलिसांची प्रचंड दडपशाही; आंदोलकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दारव्हा, दि. २३ :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) दिग्रस-दारव्हा-कारंजा या महामार्ग क्र. ३६२ (सी) वर भांडेगाव येथे 'टोल प्लाझा' उभारला आहे. १८ फेब्रुवारीपासून या रस्त्याचे काम पूर्ण नसतानाही टोल वसुली सुरू करण्यात आली. या बेकायदेशीर वसुलीविरोधात आज सोमवारी (२३ मार्च) महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. मात्र, पोलिसांनी आंदोलकांवर प्रचंड दडपशाही करत अनेकांना ताब्यात घेतले आहे.

भांडेगाव येथील टोल नाक्याचे लोकेशन अत्यंत चुकीचे असल्याचे खुद्द प्रशासनाच्या बैठकीतून समोर आले आहे. यापूर्वी काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे व मविआच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक आंदोलन करत टोल नाक्यावर तोडफोड केली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आंदोलकांशी चर्चा करून, 'व्यावसायिक वाहने वगळता इतर वाहनांकडून टोल घेऊ नये' अशी सूचना दिली होती. मात्र, या सूचनेनंतरही टोल वसुली सुरूच राहिल्याने आज आंदोलक पुन्हा रस्त्यावर उतरले. आंदोलनाच्या पार्श्वभीवर पोलिसांनी बॅरिकेट्स लावून तगडा बंदोबस्त ठेवला होता. राखीव दलाच्या तुकड्याही तैनात करण्यात आल्या होत्या. एसडीपीओ डॉ. सिद्धेश्वर भोरे आणि ठाणेदार श्री. मुळे हे आंदोलकांशी सभ्यतेने वागत असताना, एपीआय पंकज दाभाडे यांनी मात्र विनाकारण आंदोलकांना ढकलाढकली करण्यास सुरुवात केली. दाभाडे यांची भाषा आणि वागणूक अत्यंत असभ्य असल्याची टीका आंदोलकांनी केली. दोन तास उन्हात उभ्या असलेल्या आंदोलकांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला एकही वरिष्ठ अधिकारी तयार नव्हता. जिल्हाधिकारी विकास मीना सध्या प्रशिक्षणासाठी दिल्लीला असल्याने त्यांच्याशी फोनवर संपर्क साधण्यात आला. त्यांनी दारव्हा 'एसडीओ'ना काही निर्देश दिले. मात्र, 'टोल नाका बंद करण्याचे अधिकार मला नाहीत,' असे सांगत 'एसडीओ' यांनी हात वर केले. यामुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी बॅरिकेट्स तोडून टोल नाक्याच्या दिशेने धाव घेतली, मात्र पोलिसांनी सर्वांची धरपकड केली.




### कार्यकर्त्यांची धरपकड

**एसडीओनी अधिकार नसल्याचे सांगताच ५० ते ६० कार्यकर्त्यांनी बॅरिकेट्स ओलांडून टोल नाक्याकडे धाव घेतली. मात्र, आधीच तैनात असलेल्या पोलिसांनी प्रत्येकाला पकडून पोलिस वाहनात टाकले. आंदोलनाच्या ठिकाणी छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.**




### अकोला पीडब्ल्यूडीचे आंदोलकांना पत्र

**मविआच्या आंदोलनानंतर २२ मार्च रोजी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे (अकोला) कार्यकारी अभियंता अश्विन के. चव्हाण यांनी काँग्रेस तालुकाध्यक्षांना लेखी पत्र पाठवले. टोल प्लाझा रद्द करणे किंवा सवलत देणे हे अधिकार या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत, तर तो निर्णय केंद्र सरकारचा आहे, असे त्यांनी पत्रात स्पष्ट केले. तसेच, सवलतीबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवल्याचेही नमूद केले आहे.**

# कोलाम बांधवांच्या 'लाँग मार्च'ची पालकमंत्र्यांच्या कार्यालयात सांगता

## प्रलंबित मागण्यांबाबत मुंबईत बैठकीचे आश्वासन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २३ :** कोलाम समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उत्थानासाठी, तसेच 'शामा दादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' स्थापन करण्याच्या मुख्य मागणीसाठी काढण्यात आलेल्या 'पायदळ लाँग मार्च'ची सांगता सोमवारी (दि. २३) यवतमाळ येथे झाली. पालकमंत्री संजय राठोड यांच्या यवतमाळ येथील कार्यालयात आंदोलकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

आदिवासी युवा नेते अतुल आत्राम यांच्या नेतृत्वात आणि 'शामादादा कोलाम ब्रिगेड'च्या प्रदेशाध्यक्षा इंदिरा बोंदरे यांच्या पुढाकाराने हा मोर्चा काढण्यात आला होता. पांढरकवडा ते यवतमाळ असा तीन दिवसांचा खडतर प्रवास करून हे आंदोलक शहरात पोहोचले. राज्य मंत्रिमंडळाचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड सध्या अधिवेशनानिमित्त मुंबईत असल्याने, त्यांच्यावतीने विशेष कार्य अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी मोहन जोशी यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. 'कोलाम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. तुमच्या सर्व रास्त मागण्यांची मला पूर्ण जाणीव आहे. लवकरच मुंबई किंवा यवतमाळ येथे शिष्टमंडळासह प्रशासकीय बैठक आयोजित करून सर्व प्रश्न मार्गी लावले जातील,' असे आश्वासन पालकमंत्री राठोड यांनी दिले. यावेळी कोलाम समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी 'शामा दादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' स्थापन करावा, प्रत्येक कुटुंबाला 'पीएम जनमन' किंवा 'आदिम आवास' योजनेतून पक्के घर मिळावे, कोलाम पोडांपर्यंत बारमाही रस्ते, पाणी व वीज पोहोचवावी, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'शामा दादा कोलाम शिष्यवृत्ती' सुरू करावी, कोलामी बोलीभाषेच्या संवर्धनासाठी 'कोलामी साहित्य अकादमी' स्थापन करावी, यवतमाळ येथे क्रांतिवीर शामा दादा कोलाम यांचे भव्य स्मारक उभावे, महिला बचत गटांना शून्य टक्के व्याजाने कर्ज आणि वनोपज प्रक्रिया केंद्रांच्या माध्यमातून रोजगार द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, गजानन डोमाळे, प्रद्युम्न जवेळकर, दर्शन इंगोले आणि संजय हातगावकर उपस्थित होते. यावेळी मंत्री संजय राठोड यांनी आंदोलकांशी दूरध्वनीवरून थेट संवाद साधला.

# व्हॅगनार आणि ट्रॅव्हल्सची भीषण धडक

## ओव्हरटेकच्या नादात चालक गंभीर जखमी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २३ :** यवतमाळच्या एमआयडीसी परिसरातील दारव्हा रोडवर सोमवारी (दि. २३) ओव्हरटेक करण्याच्या नादात व्हॅगनार कार आणि ट्रॅव्हल्सची समोरासमोर भीषण धडक झाली. यवतमाळवरून दारव्हाकडे जाणारी कार आणि विरुद्ध दिशेने येणारी ट्रॅव्हल्स एकमेकांना जोरात धडकल्याने कारचालक गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या अपघातात व्हॅगनार (क्र. एमएच १४ वीसी २५९८) आणि ट्रॅव्हल्स (क्र. एमएच १८ बीए ८६३४) या दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र कारचा दर्शनी भाग पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात हा अपघात घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून, जखमी चालकाची प्रकृती चिंताजनक आहे. पोलिस या प्रकरणाचा पुढील तपास करीत असून भरधाव वेगावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# 'जागतिक दृष्टीमिती दिन' उत्साहात

## रोटरी क्लब ऑफ यवतमाळ आणि जगदीश ऑप्टिकल्स यांच्या संयुक्त उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.२३ :** रोटरी क्लब ऑफ यवतमाळ आणि जगदीश ऑप्टिकल्स यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. २३ मार्च रोजी 'जागतिक दृष्टीमिती दिन' (वर्ल्ड ऑप्टोमेट्री डे) निमित्त शहरातील नामवंत नेत्रतज्ज्ञ आणि ऑप्टोमेट्रिस्ट यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. स्थानिक डी.एम.एम. आयुर्वेद महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ दंतवैद्य डॉ. सुरेंद्र पद्मावार होते. त्यांनी आरोग्य सेवा आणि सामाजिक कार्याची सांगड घालत नेत्रतज्ज्ञांच्या कार्याचे कौतुक केले. विशेष अतिथी म्हणून डी.एम.एम. आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजीव मुंदाने आणि रोटरी जिल्हा ३०३० चे सचिव रो. राजेश गढीकर यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी यवतमाळ शहरातील सर्व नेत्रतज्ज्ञ आणि ऑप्टोमेट्रिस्ट यांना रोटरी क्लब आणि जगदीश ऑप्टिकल्सच्या वतीने स्मृतिचिन्ह, पर्यावरणपूरक रोपटे आणि विशेष भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. समाजाला दृष्टी देणाऱ्या या 'दृष्टीदूतांचा'सत्कार करणे हा रोटरीचा अभिमानास्पद उपक्रम असल्याचे यावेळी प्रतिपादन करण्यात आले. या सोहळ्याला रोटरी क्लबचे अध्यक्ष, प्रशासन सचिव, प्रकल्प सचिव आणि सर्व सदस्य उपस्थित होते. जगदीश ऑप्टिकल्सच्या संचालकांनी आभार मानले.

# आशा स्वयंसेविकांची जिल्हा परिषदेवर धडक

## २२ महिन्यांचा कोरोना भत्ता देण्याची मागणी; शहीद दिनानिमित्त 'आयटक'चा एल्गार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.२३ :** कोरोना काळा जिवाची पर्वा न करता सेवा देणाऱ्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांच्या न्याय्य हक्कासाठी आज, २३ मार्च रोजी 'आयटक'संलग्न संघटनेने यवतमाळ जिल्हा परिषदेवर विराट मोर्चा काढला. शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून काढलेल्या या मोर्चाद्वारे प्रशासकीय दिरंगाईचा निषेध करण्यात आला आणि प्रलंबित मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले.

कॉम्रेड दिवाकर नागपुरे यांच्या नेतृत्वात निघालेल्या या मोर्चात आशा स्वयंसेविकांनी प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. शासनाच्या निर्णयानुसार कोरोना काळातील दरमहा १००० रुपये प्रमाणे २२ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता अद्याप मिळालेला नाही. जिल्हा परिषद प्रशासनाने शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून केवळ १००० रुपये देऊन बोळवण केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. ग्रामपंचायत कर्मचारी आणि अंगणवाडी सेविकांना २२हजार रुपये अदा केले असताना आशा स्वयंसेविकांनाच डावलले जात असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. मोर्चाच्या प्रमुख मागण्यांमध्ये ऑक्टोबर २०२५ पासूनचे थकीत मानधन त्वरित देणे, ऑनलाईन कामासाठी ५जी मोबाईल व डेटा पॅक पुरवणे, अंगणवाडी सेविकांप्रमाणे ५००० रुपये दिवाळी भेट देणे आणि निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करणे यांचा समावेश आहे. तसेच आशा स्वयंसेविकांना शासकीय सेवेत कायम करून चतुर्थ श्रेणीचे वेतन मिळेपर्यंत किमान २५ हजार रुपये मानधन द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनात सुनीता कुंभारे, विजया आत्राम, माया मरास्कोल्हे यांच्यासह जिल्ह्यातील शेकडो आशा स्वयंसेविका सहभागी झाल्या होत्या.

# रामनवमीला यवतमाळात भव्य शोभायात्रेचे आयोजन

## राम लोखंडे यांची माहिती; विविध देखाव्यांमधून संस्कृती, लोकसभ्यता आणि सामाजिक संदेश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.२३ :** श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने यवतमाळ शहरात गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी रामनवमीनिमित्त भव्य आणि अनोख्या अशा शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेतून भारतीय संस्कृती, लोकसभ्यता आणि विविध सामाजिक विषयांवर नागरिकांचे प्रबोधन केले जाणार आहे, अशी माहिती सोमवारी, दि. २३ मार्च २०२६ रोजी संघ येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत राम लोखंडे यांनी दिली.

यवतमाळच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक वैभवात भर घालणारी रामनवमी शोभायात्रा यवतमाळचा लोकोत्सव झाला आहे. त्या दृष्टीने आयोजन समितीने नियोजन केले आहे. शोभायात्रा आकर्षक व्हावी म्हणून विविध समित्यांचे गठण करण्यात आले आहे. स्थानिक जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरातून श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मणाच्या मूर्तींचे विविधत पूजन करून शोभायात्रेला गुरुवारी (दि.२६) दुपारी ३ वाजता प्रारंभ होईल. यंदाचे मुख्य आकर्षण दाक्षिणात्य शैलीत साकारलेला भव्य रामरथ असेल, जो रामभक्त स्वतः हाताने ओढतील. तसेच गोवा राज्याचा प्रथम क्रमांक प्राप्त चित्ररथ ज्यामध्ये दुर्गासूर वध, गणपती व कार्तिकेय युद्ध दाखवले जाईल, यासोबतच पुलिकाली वाघनृत्य आणि कर्नाटकचे सुप्रसिद्ध बावली नृत्य ही या शोभायात्रेची खूप मोठी शान वाढवतील. पांढरकवडा येथील पारंपरिक आदिवासी दंडार नृत्य करणारे २० जणांचे कलापथक, दारव्हा तालुक्यातील शंभर जणांचे लक्षवेधी भजनी मंडळ आणि कोलाम पोड्यावरील डफ वाजवणारे पथक यात आवर्जून सहभागी होतील. याशिवाय रामायणकालीन व सामाजिक प्रबोधन करणाऱ्या शंभरहून अधिक आकर्षक झाँक्या आणि स्थानिक आखाड्यांमधील बलदंड युवकांची प्रात्यक्षिके नागरिकांना पाहायला मिळतील. संपूर्ण शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी सुंदर रांगोळी, भगवे ध्वज व पताका लावून स्वागताची अत्यंत जय्यत तयारी यवतमाळकरांनी आतापासूनच केली आहे. या यात्रेच्या सुरक्षेसाठी बजरंग दलाचे तब्बल ५०० सुरक्षा रक्षक तैनात असतील. संत सेना चौकात महाआरतीने यात्रेचा समारोप होईल. उत्कृष्ट चित्ररथांना पारितोषिके दिली जातील. या पत्रकार परिषदेत मनोज अवतारे, अभिजित डोंगरे, अंकुश बगमारे, संतोष हरणखेडे, लाला शहा आणि विवेक सज्जनवार व अभिजित डोंगरे प्रामुख्याने उपस्थित होते. यवतमाळकर नागरिकांनी या ऐतिहासिक शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

### मोटारसायकल रॅलीचे आयोजन

**रामनवमीनिमित्त समितीच्या वतीने गुरुवारी (दि२६) सकाळी ७ वाजता दत्त चौक येथील श्री दत्त मंदिरातून भव्य दुचाकी प्रभातफेरीला सुरुवात होईल. श्रीराम नामाचा गजर करत शहराच्या विविध भागांतून जाणारी ही फेरी जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरात पोहोचेल आणि तेथेच या प्रभातफेरीचा समारोप करण्यात येईल, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.**

# शॉर्टसर्किटमुळे घरासह अ‍ॅक्वा प्लांट जळून खाक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दारव्हा, दि.२३ :** येथील लड्डानगरमध्ये २१ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे आशिष सतीश गिरी यांच्या घराला भीषण आग लागली. या आगीत त्यांचा नवनिर्मित 'जलगंगा एक्वा प्लांट' पूर्णपणे जळून खाक झाला असून आशिष गिरी गंभीर जखमी झाले आहेत. सुमारे २५ ते २६ लाख रुपयांचे साहित्य नष्ट झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आशिष गिरी यांनी कर्ज काढून मोठ्या कष्टाने एक्वा प्लांटची उभारणी केली होती. मात्र, शनिवारी मध्यरात्री लागलेल्या आगीने संपूर्ण मशिनरी, धान्य, रोकड आणि साहित्याची राखरांगोळी केली. स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली, परंतु नगरपरिषदेचे अग्निशमन दल पोहोचण्यास विलंब झाल्याने नुकसान वाढले. आगीत गंभीर जखमी झालेल्या आशिष गिरी यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे विद्युत उपकरणांच्या सुरक्षेबाबत सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे. स्वप्नांचा चुराडा झाल्याने गिरी कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले असून प्रशासनाने तात्काळ मदत देण्याची मागणी नागरिक करत आहेत.